

साप्ताहिक
माणूस
९ जुलै ८३ / २ रुपये

# विजय
## थरारक, अनपेक्षित!







"आता फक्त एवढंच वाटतं- लोकांनी म्हणावं, नाना हा एक चांगला माणूस होता"

## एक रंगलेली मैफिल नाना पळशीकरांबरोबर

साप्ताहिक
# माणूस
¤
वर्ष : तेविसावे
अंक : सहावा
¤
९ जुलै १९८३
किंमत : दोन रुपये
¤
संपादक
श्री. ग. माजगावकर
¤
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस
¤
वार्षिक वर्गणी
पन्नास रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०
दूरध्वनी : ४४३४५९
¤
मुखपृष्ठ
संजय पवार

# इथून–तिथून

## सलामी सोन्याची

इराण–इराक युद्धात इराकी महिलांनी बजावलेल्या कामगिरीचा सन्मान म्हणून इराकी स्त्रीचा सोन्याचा पुतळा उभारण्याचा निर्णय इराक सरकारने घेतला आहे.

इराकी महिलेच्या नेहमीच्या स्वरूपात हा पुतळा बनवला जाईल. या पुतळ्यासाठी इराकी स्त्रियांकडूनच सोने जमवले जाणार आहे. इराकी स्त्रिया सोन्याला चाहणाऱ्या आहेत. मात्र इराकचे अध्यक्ष सद्दाम हुसेन यांनी आवाहन केल्यानंतर इराकी स्त्रियांनी पुतळ्याला दागिन्याचे सहाय्य देण्यासाठी रांगा लावल्या आहेत. जमा झालेल्या सोन्याचे वजन अनेक टन वजनात होईल असा अंदाज असल्याचे इराकी न्यूज एजन्सीच्या बातमीत म्हटले आहे.

## कॉंग्रेसभवन

पुण्याच्या शिवाजीनगर भागात असलेल्या कॉंग्रेसभवनकडून गेल्या चार वर्षांत विजेचे बिल भरले गेलेले नाही ! या चार वर्षांतली दोन वर्षे ते होते सध्याच्या कॉंग्रेस (एस)-च्या ताब्यात आणि अलीकडची दोन वर्षे आहे कॉंग्रेस (आय) च्या ताब्यात.

वीजमंडळाने थकबाकीची मागणी केली असली तरी अद्याप घोंगडे भिजत पडले आहे ! तुम्ही–आम्ही तीन महिने विजेचे बिल भरले नाही तर वीजमंडळ वीज तोडते; पण १०० हून टयूबलाटस्च्या प्रकाशाने झगमगणारे कॉंग्रेसभवन या नियमाला अपवाद आहे असे दिसते !

## हाज : दिल्लीहून विमाने

यंदाच्या हाजयात्रेसाठी दिल्लीहून प्रथमच थेट विमानसेवा सुरू होणार आहे. एका पत्रकारपरिषदेत ही घोषणा करताना नागरी हवाई वाहतूकमंत्री खुर्शिद आलम खान यांनी सांगितले की, हाजयात्रेसाठी जेद्दाहला जाणारे पहिले विमान १३ ऑगस्ट रोजी दिल्लीहून सुटेल. हाजयात्रेकरूंसाठी दिल्लीहून एअरइंडिया ८ विमाने सोडणार आहे.

जम्मू–काश्मिर, हरयाना, राजस्थान, मध्यप्रदेश या भागातून हाजला जाणाऱ्या यात्रेकरूंना यामुळे पर्वणीच लाभली आहे. कारण या प्रदेशातल्या यात्रेकरूंना दरवर्षी विमानातून जाण्यासाठी मुंबईला यावे लागत असे. दिल्लीवरून सुमारे ३२०० यात्रेकरू हाजला जातील असा अंदाज आहे.

मुंबईहून पहिले हाज स्पेशल विमान १४ ऑगस्टला सुटणार आहे. अशी २१ विमाने मुंबईतून सुटतील.

हाजयात्रेसाठी जेद्दाहला दरवर्षी भारतातून सुमारे २० हजार यात्रेकरू जातात.

## चार वर्षांनी मूल....

उत्तर फिलिपाइन्सच्या कोपऱ्यात असलेल्या भटक्या टोळ्यांनी कुटुंबनियोजनाची स्वत:ची खास पद्धत शोधली असल्याचे तिथल्या जनगणना सर्वेक्षण पथकाला आढळून आले आहे.

एका विशिष्ट प्रकारच्या कंदमुळाचा रस देऊन या टोळ्यातल्या स्त्रिया आपली गर्भधारणा थांबवू शकतात. कंदमुळाच्या रसाचा छोटासा डोस घेतल्यास स्त्रीला चार वर्षे गर्भधारणा होत नाही. हा डोस मोठ्या प्रमाणावर घेतला तर जन्मभर गर्भधारणा होत नाही असे या पथकाने म्हटले आहे.

तिथली एक स्त्री म्हणाली की, एका छोट्याशा डोसाशिवाय दोन महिन्यात आणखी दोन डोस घेतले की जन्मभर गर्भधारणा होत नाही.

ज्या विशिष्ट मुळ्याचा रस यासाठी वापरला जातो, त्या मुळ्या पूर्वीच्या काळी या टोळ्या आपल्या प्रतिस्पर्धी टोळ्यांची संख्या घटावी म्हणून वापरीत असत. प्रतिस्पर्ध्यांच्या बायकांना अन्न देताना त्यात या मुळ्या चेचाळून मिसळून देत असत. साहजिकच त्या बायका वांझ रहात असत. □

# मुंबापुरी....

मंडळी, जवळजवळ महिना–दीड महिन्यानंतर आपली भेट होतेय. गेले चार–सहा आठवडे विश्रातीत घालवले जगातले सगळे थोर–थोर लोक अधून–मधून विश्रांती–रजा वगैरे घेत असतात. आता विश्राती म्हजे डाराडूर झोपणे नव्हे, तर अंतर्मुख होऊन विचार करणे, आत्मचिंतन करणे, लोकाना भेटणे, थंड हवेच्या ठिकाणी जाऊन राहणे इत्यादि इत्यादि म्हणजे विश्राती.

ही अशी विश्राती घेतली की, माणूस तरतरीत, प्रसन्न आणि चैतन्यदायी होतो. आता आमच्या नाशिकराव तिरपुड्याचंच पहा. जवळजवळ वर्ष–दोन वर्षं त्यानी भरपूर विश्राती घेतली (वार्ताहर–पत्रकार मंडळी याला विजनवास म्हणतात. म्हणू देत. या पत्रकाराना सालस, कष्टाळू आणि गरीब लोकाना छळण्याची सवयच आहे. आसीर–आदिकना विचारा.) आणि आता पुन्हा रिंगणात उतरले आहेत. एकदम लोकनेते झाले आहेत !

मनापासून सागायच तर आम्हाला रजेवर जायच नव्हतं; पण नतर बेत बदलला. ऊठ पाय जो तो मुबईबाहेर जातोय. मग आपणही कानाला बोरू लावून जरा फेरफटका मारला तर बिघडतं काय ? चार दिवस तेवढेच सुखाचे जातील.

आता, अतुले, परवीन बाबी आणि डॉ. राम जोशी (कृपया जोडया लावू नयेत) जसे लडनला गेले तसं काही आम्ही जाऊ शकत नाही. अन गेलो, तर इथल्या वाणी, विचार आणि लेखनस्वातत्र्याचं काय ? (तेंडुलकर, विनोद मेहता, डॉ लागू यांना आमच्या धगधगत्या, ज्वलत निष्ठेची खात्री असत'नासुद्धा आम्हाला पत्रकावर सह्या करायला बोलवत नाहीत.) असो

मंडळी, मुबईत दिवस सध्या भल्यांचे नाहीत हेच खर. मागं फ्लोरा फाउंटनच्या नव्या ट्रॅफिक-प्लॅनबद्दल आम्ही याच सदरात लिहिलं होत. हा नवा प्लॅन म्हणजे ' झनक झनक पायल बाजे 'चा नाच आहे, असं आम्ही म्हटलं होतं. आता तर तिथे चक्क ' खम्मा मारा नंदजीनो लाल, मोरली क्यारे वगाडी '–टाइप गरवा–रास सुरू आहे. फ्लोरा फाउंटनच्या अजरामर हुतात्मा स्मारकापाशी बसखाली चिरडून ठार होणं आता सहज शक्य आहे !

बाकी सगळ ठीक. दादा दुष्काळी दौऱ्यावर असतात. कारभारात सगळा आनदी–आनद आहे. दादा–आदिकाचे रोज ' मानापमान ', ' सशयकल्लोळ ', ' रणदुदुभि ' वगैरे खेळ होत असतात आता शेवटचा फर्मास ' वस्त्रहरण ' हा वग कधी होणार हे पाहायचं.

शरद पवार तिकडे दिल्लीत बहुगुणा–अदाणीबरोबर कॉंग्रेसचा नवा खटारा जोडण्यात गुतले आहेत.

पावसाने मुबईत आटयापाटया हा खेळ सुरू केला आहे. गेल्या आठवड्यात झूम पडला. पुन्हा थडावला. मुबईतल्या पावसाच काही खर नाहीये बुवा !

### ॲडमिशन्स

एस एस. सी.ला ८७ टक्के मार्क्स मिळालेल्या जवळजवळ दहा हजार मुलाना अजून रुपारेल, रुईया, झेवियर्स, जयहिंद आणि सिडनेहॅम या कॉलेजामध्ये प्रवेश मिळालेला नाही असे ऐकले आहे. एस. एस. सी चा एकूण निकाल पहाता हे खरेही असेल. नवीन अभ्यासक्रम सुरू झाल्यापासून गेली चार–पाच वर्षे मला ५७ टक्के मार्क मिळालेल्या मुलाला भेटायची इच्छा आहे.

मुबापुरीत ॲडमिशनचा गोंधळ पावसापेक्षाही नियमित आहे. हकनाक अशिक्षित रहायला नको म्हणून प्रत्येकाने चार–पाच कॉलेजाना अर्ज करून ठेवले आहेत. त्यामुळे दररोज लिस्टवरती नाव आहे का हे पहायला कॉलेजला जायचे.

ज्यांना डॉक्टर आणि इंजिनिअर व्हायचे आहे त्यानी सायन्सला प्रवेश घेतला असून, ज्याना सी. ए. व्हावयाचे आहे त्यानी कॉमर्सला ॲडमिशन घेतली आहे. उरलेल्यानी अदमानला पाठविल्याप्रमाणे आर्टस्ला प्रवेश मिळविला आहे ते बी. ए. झाल्यावर लॉ-ला ॲडमिशन मिळवतील.

सालाबादप्रमाणे पार्ले टिळकमधून तेरा आणि बालमोहनमधून दहा मुले गुणवत्तायादीत आलेली आहेत. त्यापैकी मुलाना इजिनिअर व्हावयाचे असून मुलीना डॉक्टर व्हावयाचे आहे.

पार्ले टिळकची एक मुलगी म्हणाली, तिला ॲस्ट्रॉफिजिक्सचा अभ्यास करायचा आहे. ॲस्ट्रॉफिजिक्स म्हणजे काय ? तर ती म्हणाली, ॲस्ट्रॉफिजिक्स म्हणजे ॲस्ट्रॉफिजिक्स. बरोबर आहे. सायबरनेटिक्स म्हणजे जसे सायबरनेटिक्स तसे ॲस्ट्रॉफिजिक्स म्हणजे ॲस्ट्रॉफिजिक्स ! असो.

अजूनही एक आठवडा हा गोंधळ चालू राहील. मुलांबरोबर पालकाचीही धावपळ चाललेली आहे. मंत्र्यानी, आमदारानी ॲडमिशनसाठी चिठ्ठ्या देण्याचे काम चालूच ठेवलेले आहे. या निमित्ताने तरी मुलाचे शिक्षण म्हणजे खायचे काम नाही हे पालकांना कळेल.

मुबई विद्यापीठाने मात्र या वेळी चमत्कार केला. दोनशेपैकी एकशेपधरा परीक्षाचे निकाल लागलेले आहेत. म्हणजे गाडी व्यवस्थित रुळावर आलेली आहे माजी उप–कुलगुरु राम जोशीनी सपत्नीक लडनला प्रयाण केले असून, त्यांच्या जागी टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सचे माजी प्रमुख डॉ. एम एस. गोरे आलेले आहेत.

या विद्यापीठाचा कारभार सुधरवून सोडायचा सरकारने चग बाधलेला दिसतोय. कारण गेल्या वर्षी परीक्षा वेळेवर घेण्यासाठी मत्रालयातून जोसेफ ह्या आय. ए. एस. अधिकाऱ्याची ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी म्हणून नेमणूक झाली आणि आता नुकताच राज्यपालानी वटहुकूम काढून प्रोव्हाइस–चान्सेलरच्या पदाला मान्यता दिली. आता हा माणूस प्रोयुनिव्हर्सिटीसुद्धा निघतो की नाही ते पहायचे !

### फावला वेळ

फावल्या वेळात कोण काय काय करतं त्याचा आम्ही ( फावल्या वेळात ) हिशेब काढलाय वाचून बघा ! फावल्या वेळात नाही तरी दुसरं काय करणार ?

रामराव आदिक : हेलिकॉप्टरमधून एक तर उतरतात किंवा चढतात.

गोविंदराव आदिक बाराखडी गिरवतात.

अमिताभ बच्चन दुकानाची–शोरूमची उद्घाटनं करतात. ही पहिली पायरी.

डॉ दत्ता सामंत : तर्खडकर भाषातर पाठमालेतला अनसर्टन फ्यूचर टेन्स पुन्हा पुन्हा वाचतात.

सुशिलकुमार शिंदे : हल्ली ' कशी त्यजू मी त्या पदाला ' हे गीत नव्या सुरावटीत गातात. ठेका–सावरकरी.

बाबासाहेब भोसले : सहस्रभोजनं घालण्यात इतके गुतलेत की, फावला वेळच नाही !

–विष्णू जयदेव

आंबिटघर गावात एका तान्हुल्याच्या मृत्यूने भुताटकी करणाऱ्याचा शोध सुरू झाला..सहा भुताळचांना तापल्या तारेनं डागण्यात आलं. एकीला तर चुलीवर ठेवलेल्या तव्यावरच उभं केलं. 'माणूस'च्या २ जुलै अंकात या अमानुष कृत्याचा वृत्तांत विष्णु-जयदेव यांनी दिला होता; पण केवळ अधश्रद्धेतून हे छळनाटच झालेल नाही. त्यामागे आर्थिक संघर्ष आणि राजकीय वाद आहे तर वैयक्तिक हेव्यादाव्यांची उपकथानकंही आहेत !

## आंबिटघरची भुताटकी

# एक पूर्वनियोजित सूडनाट्य

कपिल पाटील

दि. ५ जून ८३. सायंकाळी सातचा सुमार. आंबिटघरच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानात हजाराच्या आसपास लोकांचा जमाव जमला होता. आजूबाजूच्या पाच-सहा गावातले आणि पाड्यातले गावकरीही जमले होते. थोडंफार भीतीचं, अस्वस्थतेचं आणि प्रचंड कुतूहलाचं वातावरण. आंबिटघरातल्या आठ भुताळ्या आणि एक भुताळा भगताने शोधून काढले होते ! भुताटकी, करणी करून गावाला त्रास देणाऱ्या या कथित भुताळ्याना भगत सर्वांसमक्ष आता 'शासन' देणार होता !

¤

शेवटची पाळी होती पार्वती जानू वाघ हिची. तिच्या नावाचा पुकारा झाला. समोर आलेल्या पार्वतीबाईच्या केसाची बट भगताने कापून घेतली आणि बेलपत्रासह पुन्हा तिच्या हातात दिली. त्यावर पाणी शिंपून खाली ठेवलेल्या पातेल्यात ते ओतण्यास सांगितले. नंतर चांभारकुंडातले अर्धा ग्लास पाणी भगताने तिला प्यावयास दिले. ( चामडे कमावण्यासाठी वापरलेले पाणी ) पार्वतीबाईने ते रिचवल्यावर भगताने तिचा दंड एका हाताने पकडला आणि दुसऱ्या हाताने चुलीत तापत असलेली छत्रीची तार बाहेर काढली 'जीभ बाहेर काढ !' भगत म्हणाला आणि तिच्या थरथरत्या जिभेवर लाल भडक तापत्या तारेचा डाग दिला गेला. पार्वतीबाई विव्हळली; पण शिक्षा संपली म्हणून तिला हायसही वाटलं; पण भगताच 'शासन' संपलं नव्हतं. चुलीवर लोखंडी तवा केव्हाचा तापत होता. भगताने पार्वतीला तव्यावर उभे राहण्यास फर्मावले. आता मात्र पार्वती हादरली. तिने स्पष्ट नकार दिला. तसे भगत डिंगारे आणि भारत गोमा पाटील पुढे आले. दोघांनी मिळून वृद्ध पार्वतीला तव्याकडे खेचले आणि तव्यावर उभे केले. पार्वतीने आकांताने किंकाळी फोडली! मघापासून हे सारे मुकाट पाहत असलेल्या पार्वतीचा नवरा जानू वाघ याला आता राहवले नाही; पण आरडाओरड आणि किंकाळ्या फोडण्यापलीकडे तो काही करू शकला नाही. भोवतालचे लोक त्याच्यावरच धावून आले आणि जानू जागीच थिजून राहिला. तिथे पार्वती निकराने प्रतिकार करीत होती आणि भगत व इतर तिला पुन्हा पुन्हा तव्यावर उभे करीत होते. किंकाळ्याबरोबरच तव्यावरून धूर निघाला आणि मास जळल्याचा वास भणभणला.

¤

पार्वतीच्या आधी पाच जणांना 'शासन' झालं होतं; पण त्यांची शिक्षा जिभेवर किंवा जिभेवर व कपाळावर, जखम होईस्तोवर डागण्यापुरतीच मर्यादित राहिली. पार्वती ही एकच आदिवासी स्त्री. बाकीचे सर्व कुणबी-पाटील. नऊ कथित भुताळ्यामध्ये अनंता कृष्णा भोईर या एकाच पुरुषाचा समावेश होता. त्याच्या पत्नीलाही जिभेवर व कपाळावर डागण्यात आलं. त्यांच्यासह सहा जणींना डागण्यात आलं तर तीन स्त्रियांना चांभारकुंडातले पाणी देऊन सोडून देण्यात आलं.

बहुतेकांची वयं पन्नास-साठीतली किंवा त्याही पुढची. त्याना देण्यात येणारी शिक्षा जेव्हा जाहीर करण्यात आली. तेव्हा अनंता भोईराने धिटाईने विचारले, 'भगत त्याच्या विद्येच्या बळावर जी शिक्षा देईल तो ती देऊ शकतो; पण इतर शिक्षेने जो, जी भुताळा, भुताळी नाही त्यास जखम होईल त्याचे काय ?' 'त्याची जबाबदारी आमची गावकीची.' या अनेकांच्या उत्तराने अनतास गप्प बसावे लागले.

### वीस दिवसांनंतर

पाच जूनला घडलेल्या या घटनेची बातमी वाडा पोलीसठाण्याला चार दिवसानी मिळाली. ज्या घरात भुताळ्या सापडल्या त्यापैकी एक कुटुंब होतं प्रतिष्ठित आणि उच्च शिक्षित. वाडा तालुका पचायत समितीचे माजी आणि पहिले सभापती शंकर फकीरा पाटील याच ते घर त्याच्या ८५ वर्षांच्या आईलाच भुताळी ठरविण्यात आल होतं. त्या प्रतिष्ठित आणि उच्च शिक्षण घेतलेल्या मुलाच्या घराला हा मोठाच धक्का होता. त्याच्या आईला भिमाबाई फकीरा पाटील याना भगताने 'शासन' मात्र दिलं नव्हत; परतु झाल्या प्रकाराने ते अस्वस्थ होते. तरीही ते पोलिसात जाऊ शकले नाहीत. त्यांनी जानू वाघ या आदिवासीस आणि अनंता भोईर यास सुचवल. जानू वाघ हा गावातल्या मजुराचा पुढारी आणि किसानसभेचा कार्यकर्ता. त्याने धिटाई केली आणि बायकोला (पार्वतीला) उपचारासाठी वाड्याला नेतो असं सांगून तो बाहेर पडला. वाड्यातले कम्युनिस्ट कार्यकर्ते श्री मालवणकर याना तो भेटला. मालवणकरानी त्वरित केस नोंदायला लावली आठ तारखेला गावातल्या चौदा प्रतिष्ठितांना अटक झाली. नऊ तारखेला त्याना कोर्टात उभं करण्यात आलं. पाच दिवसाच्या रिमांडनंतर सर्व आरोपींना जामिनावर सोडण्यात आलं तेरा तारखेला; पण तोवर मुंबईच्या वृत्तपत्राना वाडा तालुक्यात काही घडल्याची साधी बातमीही मिळाली नव्हती. मुंबईच्या वृत्तपत्राना ही बातमी मिळायला उजाडली २० व २१ जून ही तारीख. तब्बल वीस दिवसानी !

जानू वाघ किसानसभेचा कार्यकर्ता असल्यानेच ही बातमी बाहेर येऊ शकली. अन्यथा भयग्रस्तता आणि काहींचा प्रतिष्ठेचा प्रश्न यामुळे भुताटकीच्या नावावर झालेला हा अमानुष छळ कधीच प्रकाशात आला नसता! माजी पंचायत सभापती शंकर पाटील, ज्यांच्या आईला भुताळी ठरविण्यात आले होते त्यांचा एक मुलगा प्रकाश पाटील हे ठाणा कोर्टात वकिली करतात; पण आज ते आपल्या आजीसाठी कोर्टात उभे राहण्यास तयार दिसत नाहीत. घडल्या घटनेनंतर २०-२२ दिवसानी जेव्हा मी गावात गेलो, तेव्हा त्याच्या आजीची भेट होऊ शकली नाही. त्याना त्याच्या मुलीकडे पाठविण्यात आले होते. आणखी एक-दोन घरी ज्याचे कुटुंब थोडे-फार सुशिक्षित, प्रतिष्ठितात जमा आहे त्याच्या आईलाही तिच्या माहेरी किंवा अन्य नातेवाइकाकडे पाठवून देण्यात आलं आहे. तर दुसरीकडे सुटलेले आरोपी गावात कुणी चौकशीसाठी (सरकारी अधिकारी, पत्रकार वा कार्यकर्ते) आले तर गायब होतात, तर त्याच्या कुटुंबियाना घटना घडल्याचेच माहीत नसतं!

¤

आंबिटघर. ठाणे जिल्ह्याच्या वाडा तालुक्यातील एक गाव. एकशेपाच कुटुंबांचं. मुंबईपासून ४-४॥ तासांच्या एस. टी. प्रवासाच्या अंतरावर. गावतली वस्ती कातकरी, आदिवासी आणि कुणबी-पाटील याचीच. आदिवासी कातकरी बहुतेक मजुरी करणारे, भूमिहीन. आता काहींना सरकारकडून जमीन मिळाली आहे; पण अगदी अपुरी. कुणबीसमाज मात्र थोडीबहुत शेती बाळगून आहे. अगदी थोड्याकडे ४०-५० एकर जमीन. बहुतेक कुणबी आदिवासी-इतके नसले तरी अल्प उत्पन्नगटातलेच; पण बहुतेकाकडे शिक्षण पोचले आहे. गावात सातवीपर्यंत शाळा आहे. कुटुंबनियोजनाचे आणि पशुसंवर्धनाचे एकेक उपकेंद्र आहे. सायकाळचा दवाखाना (सरकारी) आहे.

गावात तीन चार पक्ष पाट्यापुरतेच आहेत. किसानसभेचं मात्र थोडबहुत काम आहे. बाकी सारं गाव कॉंग्रेसचंच. मात्र त्यात दोन गट आहेत. एक-दोन वर्षांपूर्वी ग्रामपचायतीत सत्ताधारी झालेला; दुसरा-पराभूत झालेला. पराभूत गट त्या आधी २० वर्षे सत्तेवर होता. म्हणजे शंकर फकीरा पाटील यांच्या घरीच वीस वर्षे सरपंच-पद होतं शंकर पाटील आणि त्याचा मुलगा कृष्णा पाटील हे माजी सरपंच. आता हे पद प्रत्यक्ष गावापासून दीड मैलावर असलेल्या लहूच्या पाड्यावर गेलं आहे. वैशाली विजयकुमार पाटील ही तलाठ्याची तरुण पत्नी गावची सरपंच आहे; पण ती फारशी गावात नसतेच. ती नवऱ्याबरोबर दुसऱ्या गावात राहते. गाव-पचायतीचं खरं म्होरकेपण आहे ते - उपसरपच दुदाराम पाटील यांच्याकडेच. शकर पाटलाचा नातू, कृष्णा पाटील याचा मुलगा सुहास पाटील हा ग्रामपचायतीचा सदस्य आहे. त्यालाच सरपच करायची त्याची इच्छा होती; परंतु त्यांच्याच गटात आधी असलेल्या वैशाली पाटील याना सरपंचपद देऊन दुदाराम पाटील यानी उपसरपंचपद मिळवलं आणि कुरघोडी केली. या दोन गटातील धुसपुस वगळता गावात राजकीय तणाव नाही. गावही शांत होतं. वाडा तालुका मागासलेला मानला जातो. अंधश्रद्धा-देव-देवस्की-भूत भगत यांच प्रस्थ असलेल्या या तालुक्यात आंबिटघरही अपवाद नव्हत.

## मूल मेल्याचं निमित्त

एप्रिलच्या २७ तारखेला, हनुमानजयंतीला गावातल्याच नारायण नागू खाडे याच्या घरात सात महिन्याचं मूल मेलं आणि हे मूल करणीनं गेल्याची अफवा पसरली. घरवाली लक्ष्मीबाई पहाटे जागी झाली आणि गोठावजा पडवीतल्या खोलीत आली तेव्हा तिथे तोडगा मांडलेला पाहून ती चरकली! पळसाच्या पानात भिजल्या कणकेचे पाच दिवे जळत होते. बाजूला हळद पिंजारलेली मूद आणि पिठाने दोन बाहुल्या काढल्या होत्या. घाबरलेल्या दापत्याने शेजारपाजाऱ्याना उठवलं. सूर्य वर येत असतानाच सात महिन्याचा नामदेव रडू लागला आणि सूर्य डोक्यावर येण्यापूर्वीच ते पोर मरून गेलं! आख्खा गाव गोळा झाला. साऱ्याची पक्की समजूत झाली होती, कुणी तरी करणी केली! रात्री खाडेच्या घरी बसायला आलेल्या गावकऱ्याच्या बैठकीतच निर्णय झाला, आता गावातल्या भुताटक्याचा पुरता बदोबस्त करायचा! 'गावातले वा आसपासचे भगत कामाचे नाहीत दूरचा मोठा भगत आणू आणि सर्व भुतावळयाना शोधून काढू' - या पोलीसपाटील आणि उपसरपंचाच्या सूचनेला होकार मिळण्यास वेळ लागला नाही. मूल मेल्याच निमित्त झाल आणि भुताटक्याचा शोध सुरू झाला. बाहेरचा भगत आणायचा ठरलं त्याच वेळी एक कट शिजू लागला...

¤

शहापूर तालुक्यातील गोठेकर गावच्या डिंगोरे भगताला १२००/- रुपयाची सुपारी देऊन गावात आणण्याचं ठरलं. त्याच्या पूर्वतयारी-साठी पोलीसपाटील, लडकूराम पाटील आणि उपसरपच दुदाराम पाटील यांच्याकडे दोन-तीन खाजगी बैठका झाल्या. पाच जूनची तारीख निश्चित करण्यात आली आणि तीस मेपासून भगताला द्यावयाच्या सुपारीसाठी वर्गणी गोळा करणे सुरू झाले. वर्गणीसाठी निमित्त होतं गावसण साजरा करण्याचं. खरं कारण मात्र काही-पासून लपविण्यात येत होतं. दरसाल लावणीपूर्वी देवाला बोकड कापून हा सण साजरा केला जातो. चार जूनपर्यंत वर्गणी गोळा करण्यात येत होती. चार जूनलाच भगत आपल्या दोन सहकाऱ्यासह गावात आला शाळेची खोली त्याला उघडून देण्यात आली. रात्री ८-९ च्या दरम्यान गावसभा बोलाविण्यात आली. उपसरपंच दुदाराम पाटलाने प्रास्ताविक केलं. 'गावात भुताळ्या फार झाल्या आहेत. त्याना शुद्ध करून घेण्यासाठी आम्ही भगत आणला आहे!' भुताळ्याना शुद्ध करण्याचा निर्णय गावकीचा आहे, हे दाखविण्या-साठी पाच रुपयाच्या स्टॅंपपेपरवर उपस्थिताच्या सह्या घेण्यात आल्या. अनंता भोईर आणि अन्य काहीनी त्यावर सही देण्यास नकार दिला. तेव्हा सह्या न करणाऱ्याना ५१/- रुपये दंड केला जाईल आणि त्याच्या घरात भुताळ्या असल्याचे सिद्ध केले जाईल, अशी धमकी देण्यात आली. 'या धाकानेच आम्ही सह्या केल्या' असे अनंता भोईर सांगतो.

खऱ्या नाट्याला सुरुवात झाली दुसऱ्या दिवशी रविवारी सकाळी. सकाळी८ वाजता शाळेच्या पटागणात गाव जमला. भगताने एक पितळी वाटी खाली ठेवून त्यात मतरलेली तीन लिंबे ठेवली आणि वाटीच्या तोंडावर कोणीही एकाने हात ठेवावा असे सागितले. हात ठेवला की, वाटी चालू लागणार होती. अनेकानी हात ठेवला पण उपयोग झाला नाही गावातल्या सगळ्या भुतानी आपली शक्ती त्या वाटीवर लावली असावी असे सागण्यात आले. म्हणून ती शक्ती घालविण्या-साठी वाटी देवळात नेण्यात आली. तिथे दशरथ पाटील नावाच्या तरुण मुलाने वाटीवर हात ठेवताच काय आश्चर्य, वाटी चालू लागली. ज्या घरात भुताळ्या असतील, त्यांच्या घरात ही वाटी शिरणार होती! सर्वप्रथम वाटी शिरली सरस्वती बागो पाटील याच्या घरात. वाटी घरात शिरताच ती सरस्वतीबाईंच्या पायावर जाऊन आपटली. पंचांनी तिचे नाव लिहून घेतले. या क्रमाने वाटी ज्या घरी भुताळ्या होत्या तिथे तिथे गेली. अनंता भोईर आणि त्याची

पत्नी दोघेही भुताळे ठरले. त्याचं घर ज्या नारायण नागू पाटलाचं मूल मेल त्याच्या अगदी घरासमोरच होत. शंकर पाटलाच्या घरात आणि माजी उपसरपंच पाडुरग पाटील यांच्या घरातही भुताळघा निघाल्या तेव्हा गावाला आश्चर्याचा धक्काच बसला आणि त्याच-बरोबर भगतावरचा विश्वासही दुणावला. वाटी चालत होती म्हणजे कशी असं जेव्हा अनंता भोईर आणि इतर छळग्रस्तांना विचारलं तेव्हा सर्वांच उत्तर सारखच होतं– वाटी दशरथ पाटील लोटीतच नेत होता आणि नेमक्या घरी. जिथे उचवटे, पायऱ्या, खड्डे असतील तिथे वाटी हातात उचलून अडथळा ओलाडून पुन्हा खाली ठेवली जात होती तर दुसऱ्या बाजूला इतराकडून त्या प्रश्नाला अजिबात प्रतिसाद मिळत नव्हता. आम्ही गावातच नव्हतो, आम्ही पाहिलंच नाही असं ठरलेलं उत्तर कोणत्याही प्रश्नाला येत असे. अपवाद फक्त तीन-चार व्यक्तीचा. सरकारी कर्मचारी किंवा शिक्षक याचा.

वाटी आपोआप चालणं शक्यच नाही. त्यातल्या लिबानं किंवा हाताच्या उष्णतेनं वाटी गावभर हिंडण अशक्यच. वाटी विशिष्ट घरातच जात होती, याचाच अर्थ वाटी विशिष्ट पूर्वनियोजित घरात नेली जात होती हे स्पष्ट आहे. ' भगताला देण्यासाठी गोळा करण्यात आलेली वर्गणी घेताना देवाच्या नावानं (गावसणासाठी) आमच्या-कडून घेण्यात आली. खरं कारण आमच्यापासून लपविण्यात आलं, हे अनंता भोईरच उत्तर या शंकेस दुजोराच देतं. मूल मेल्याचं केवळ निमित्त होतं. या निमित्तानं भगताला आणून हितसंबंधीयानी आपला कार्यभाग साधल्याचं स्पष्टपणे जाणवतं हे हितसंबंध आजवर प्रसिद्ध झालेल्या वृत्तातून स्पष्ट झालेले दिसत नाहीत. केवळ अंध-श्रद्धेतूनच ही घटना घडल्याचा समज करून घेणं एक तर भोळसट-पणा ठरेल किंवा जाणूनबुजून दुर्लक्ष !

## पूर्वनियोजित कट

५ जूनच्या प्रकारामागे पूर्वनियोजित कट निश्चित होता याला केवळ छळग्रस्ताच्या म्हणण्याचाच आधार आहे असं नव्हे तर गावाशी सबंधित सरकारी कर्मचारी, शिक्षक, गावाबाहेरील काही व्यक्ती ज्याच्याकडे हे प्रकरण सोपविले आहे ते इन्स्पेक्टर माळवे याच्याशी केलेल्या चर्चेतूनही त्यास दुजोरा मिळाला, तर दुसऱ्या बाजूला हे प्रकरण वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाल्यानतर निर्माण झालेल्या स्थितीतूनही घडल्या प्रकाराची कारण आता स्पष्ट व्हायला लागली आहेत.

जानू वाघ आणि अनता भोईर यांनी केस नोंदविल्यानतर ज्या चौदाना अटक झाली त्यातील म्होरक्यांची नावे प्रथम सागायला हवीत. अटक झालेल्यामध्ये उपसरपंच दुदाराम पाटील, पोलीस-पाटील लडकूराम पाटील, सरपच वैशाली पाटील याचा दीर केशव पाटील, ग्रा. पं. सदस्य लोडू बडू पाटील आणि श्रीपत लडू पाटील व गणपत शिडू पाटील हे दुदारामचे साथीदार. गावचा कोतवाल असलेल्या पोटघा काटेस्कर या आदिवासीचा उगाच बळी गेलाय. ग्रा. पं. सदस्य, सरकारी अधिकारी सागतील ती कामे करणारा हा कोतवाल तेवढयाच अर्थाने पाच जूनचा भागिदार होता.

ज्याचा जास्त छळ झाला ते आणि ज्याना अटक झाली ते यांचे संबध तपासले तर महत्त्वाची कारणे हाती लागतात. अनंता भोईर झाला प्रकार ग्रामपंचायतीतल्या दोन गटातील सत्तास्पर्धेतून घडल्याचं सागतो. पराभूत गटाला आणि त्याच्या माणसाना बदनाम करण्यासाठी सत्ताधारी असलेल्या दुदाराम आणि त्याच्या सहकाऱ्यानी हा डाव रचला असं त्याचं म्हणणं आहे कृष्णा, शकर पाटील याचा गट आणि दुदाराम यांचा गट यातील वाद पाच जूनच्या घटनेमागे असावा याला शिक्षकाच्या बोलण्यातूनही दुजोरा मिळतो; पण हे कारण पुरेसं ठरत नाही. जर भगतानं दिलेल्या शिक्षेच स्वरूप पाहिलं तर नऊ कथित भुतावळघाना एकच शिक्षा देण्यात आलेली नाही. पैकी तिघीना काहीही न करता सोडून देण्यात आलं आहे. केवळ चाभार-कुडातलं पाणी प्यायला देऊन त्यांना शुद्ध (?) करण्यात आलं आहे यामागं एक कारण संभवत. त्या प्रतिष्ठित, सधन घरातील आहेत. शंकर फकीरा पाटील याची ८५ वर्षांची आई भिमाबाई फकीरा, शेवतीबाई सिताराम भोईर आणि जिजाबाई तुकाराम पाटील याना डाग न देता सोडून देण्यात आल, तर सरस्वती बागो पाटील, सकवार बापू पाटील ( माजी उपसरपच पाडु पाटील याची आई ) आणि अनुसयाबाई शातारान जाधव याना केवळ जिभेवर डाग देण्यात आला. माजी उपसरपंचाच्या आईला दिलेली शिक्षा हा राजकीय सूडच दिसतो, तर इतराच्याबाबत तेच कारण आहे. मात्र त्या दोघीही परिस्थितीनं तशा गरीबच किंवा मध्यमवर्गीय म्हणता येतील. मात्र त्याच्याबाबत राजकीय हेव्यादाव्यापेक्षा वैयक्तिक हेवेदावे दिसतात

दुसऱ्या बाजूला जानू वाघ या किसानसभेच्या कार्यकर्त्याच्या पत्नीला सर्वात मोठी शिक्षा देण्यात आली आहे जानू वाघ हा आदिवासी मजुरांचा गावातला पुढारी त्याच्या मुलाच्या लग्नासाठी २०० रुपयांचे कर्ज त्याने उपसरपचाकडून घेतले होते. ते कर्ज फेडण्यासाठी त्याचा मुलगा अनंत जानू व त्याची पत्नी दुंदारामकडे जवळजवळ लगीनगडी म्हणूनच गेली चार वर्षे खपत होते. संपूर्ण कर्ज फेडण्यासाठी त्या दोघाना दहा वर्षे शेतीच्या कामात दुदारामकडे राबावे लागणार होते दरवर्षी २० रुपये फेडले जाणार होते, या हिशेबाने दहा वर्षे. आदिवासी मजुराच नेतृत्व करणाऱ्या जानू वाघला आपला मुलगा मात्र लगीनगडी म्हणून राबावा याच वैषम्य वाटत होत. चार वर्षांत त्याने शभर रुपये जमवून ते मुलाकडे मालकास कर्जफेड म्हणून दिले आणि वेठबिगारीतून मोकळे होण्यास सागितले. ४ वर्षांत ८० रुपये फिटले होते. शिवाय शेतीचे काम करण्याचा मोबदला म्हणून १० रुपयाच्या रोख रकमेव्यतिरिक्त १२ पायल्या म्हणजे सुमारे २४–२५ किलो भात वर्षाकाठी मिळतं. त्याचा हिशेबही जानू वाघने मागितला. यामुळे उपसरपच दुदाराम भडकला होता. ही घटना गेल्या वर्षीच्या दिवाळीनतरची. दुदारामने गेल्या ४ वर्षात ४० रुपयेच फिटल्याचे सागितले. तेव्हा जानूने आपल्या पोराला आणि सुनेला दुदारामकडे कोणत्याही स्थितीत कामासाठी पाठविण्यास स्पष्ट नकार कळवला. यामुळे चिडलेला दुदाराम त्यावर सूड उगविण्याची संधीच पहात होता.

अनंत भोईर हा कुणबी–पाटील; पण सघटित होत असलेल्या आदिवासीशी चागले सबध राखून असलेला. अडीअडचणीत त्याना उपयोगी पडणारा यंदाच्या आवणीत (लावणीत) सात रुपये रोजी-शिवाय काम न करण्याचे किसानसभेने ठरविले होते. जानू वाघनेही आपल्या आदिवासीना त्यासाठी तयार केले होते. गावात सगळघा लावणीच्या कामाचा (२०–२५ दिवस) मोबदला म्हणून १२ पायल्या तादूळ आणि ५ ते १० रुपये मिळतात. ही एक प्रकारची वेठबिगारीच होती. जानू त्याविरुद्ध आदिवासी मजुरांना संघटित करीत होता. त्यामुळे गावातल्या सधन वर्गाचा त्याच्यावर राग होताच, तर दुसऱ्या बाजूला त्यांच्याशी चागले सबध ठेवून असलेला अनत भोईरही त्याच्या डोळघात खुपत होता. त्याना धडा शिकवायला हवा कधी तरी हे दुदारामच्या गटात नेहमीच घाटत होत. मूलं मेल्याची संधी त्यानी घेतली इतकच. एका विश्वसनीय सूत्राच्या म्हणण्यानुसार जानूला आणि अनंताला भुतळा ठरवून शिक्षा देण्याचे त्यांचे सहा महिन्यांपूर्वीपासूनच घाटत होते.

## उपकथानक

हा आर्थिक संबंध राजकीय वादापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. म्हणूनच जानूच्या पत्नीला तापल्या तव्यावर उभे करण्यात आलं तर अनंताची शेंडी कापून त्याच्या जिभेवर डागण्यात आलं.

त्याच्या पत्नीला अंजनीबाईला जिभेवर आणि कपाळावरही डागण्यात आलं.

इतर छळग्रस्ताबाबत वैयक्तिक हेवेदावे अधिक दिसतात. एकूण या छळनाटचाचं कथानक एक नाही राजकीय, आर्थिक संघर्ष त्यात आहेच; पण वैयक्तिक भांडणाची उपकथानकेही आहेत !

प्रत्यक्ष गावापासून दीड मैलाच्या अंतरावर असलेल्या पाड्यावर राहणाऱ्या अनुसयाबाईलाही भुताळी ठरवून शिक्षा देण्यात आली. ती का ? त्याचा शोध घेतला तेव्हा आणखी एक उपकथानक उलगडलं. पाड्यावरच्या बायाना सकाळी गावात बोलावून घेण्यात आलं होत. पाड्यातल्या २०–२२ बायाना रांगेने उभं करून त्यांच्या पुढून वाटी फिरविण्यात आली होती; पण वाटीनं एकीलाही 'ठोका' दिला नव्हता. दुपारनतर जेव्हा गावातल्या भुताळ्या शोधून झाल्या तेव्हा एस टी. ड्रायव्हर असलेल्या केशव पाटलाने (सरपंचबाईचा दीर) भगताकडे पाड्यावरही एक भुताळी असल्याचा आपला संशय असल्याचे सांगितले त्याच्या आग्रहावरून लिंबाची वाटी पाड्यावर दुपारी तीन वाजता नेण्यात आली. तिथे ती थेट अनुसयाबाईच्या घरात ढकलत नेण्यात आली आणि तिचंही नाव टिपून घेण्यात आलं. केशव पाटलाशी गेल्या वर्षीच्या गणपतीत शांताबाई जाधवच्या कुटुंबाचे भांडण झाले होते. त्यानंतर केशव पाटील वारंवार त्याना त्रास देत असे, असं जाधव कुटुंबानं सांगितलं. केशवच्या घरासमोरच त्याचं घर आहे. केशवलाही अटक झाली होती. तो सुटल्यानंतर पुन्हा धमकावू लागल्यानं जाधव कुटुंबानं आपलं घर सोडून थोड्या दूर असलेल्या गोठ्यात आपला संसार हलवला आहे.

भिवंडी डेपोत काम करणारा हा केशव पाटील ठाणा एस. टी. डेपोत आबिटघरला कसे जायचे याची चौकशी मी करत असताना त्यानेच हटकले आणि आपली ओळख करून दिली. 'त्या दिवशी आपण कामावर होतो. फक्त सकाळी अर्धा तास एस. टी. थांबवून आपण वाटी फिरण्याचा कार्यक्रम पाहिला' अशी बतावणी तो करीत होता. बहुतेक छळग्रस्तांनी केशव शनिवार–रविवार दोन्ही दिवशी गावात होता हे सांगितलंच; पण त्याच्या घरी जाऊन चौकशी केली असता रविवारी त्याला सुट्टीच असल्याने तो गावातच होता यास दुजोरा मिळाला. केशवची बतावणी त्याच्या कुटुंबियानीच खोटी ठरवली.

## आणखी गुंतागुंत

छळनाटच आणि त्यानंतरच्या अटका इथेच हे प्रकरण संपत नाही. प्रकरण कोर्टात गेल्याने नवे नाटच आता सुरू झाले आहे. जानू वाघ आणि अनंता भोईर यांचं नीतिधैर्य मोठं आहे. गावात दडपण असूनही आज तरी त्यांचा निर्धार कायम आहे, तर दुसऱ्या बाजूला शंकर पाटील यांचं उच्च शिक्षित-प्रतिष्ठित कुटुंब या प्रकरणापासूनच दूर राहण्याचा प्रयत्न करीत आहे शंकर पाटील यांचा मुलगा प्रकाश पाटील स्वत' ठाणा कोर्टात वकील असूनही ते अलिप्त राहू पहात आहेत. केशव पाटील माझ्याशी बोलताना वेगळंच म्हणाला. प्रकाश वकील याना आता गावातल्या प्रतिष्ठित नागरिकाना झालेल्या अटकांनी खेद वाटत असून ते गावाच्या बाजूने केस लढविण्यास तयार आहेत, असं तो म्हणाला. पोलीसइन्स्पेक्टर श्री. माळवे यानीही केशवच्या म्हणण्यास अप्रत्यक्ष दुजोरा दिला. शंकर पाटील यांच्या कुटुंबाने आरोपी विरुद्ध कोणतीही तक्रार नोंदवलेली नाही. तर दुसऱ्या बाजूला आरोपींना अटक होताच त्यानी कृष्णा पाटील, शंकर पाटील यानाही अटक करावी अशी मागणी केली असल्याचे इन्स्पेक्टर माळवे यांनी सांगितले. इन्स्पेक्टर माळवे यांनी दिलेली ही माहिती या प्रकरणाची गुंतागुंत वाढविणारी आहे.

छळनाटचाच्या कटाशी कृष्णा पाटील याचा संबंध होता काय ? हा नवा प्रश्न इथे निर्माण होतो आरोपींनी भुताटकीच्या शोधाच्या योजनेत कृष्णा पाटील याना सामील करून त्याच्यावरही राजकीय सूड उगवला असावा काय, अशी शंका निर्माण होते. पाच जूनचं छळनाटच पूर्वनियोजित कटाचा भाग होता आणि हा कट मुळात जानू वाघ आणि अनंता भोईर याना दहशत दाखविण्यासाठीच होता असे गावातील एका अत्यंत विश्वसनीय सूत्राने सांगितले. बाकीचे पदर नंतर जोडले गेलेत.

या सूत्राने हे गुंतागुंतीचे पदर स्पष्ट करणारी बरीच माहिती दिली; परंतु हे प्रकरण आता कोर्टात असल्याने त्याबाबत काही लिहिणे अयोग्य ठरेल.

ज्या सात महिन्याच्या मुलाच्या मृत्यूचे निमित्त या छळनाटचासाठी झाले, त्या मुलाचा मृत्यू अपेक्षितच होता असे त्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितले. गावातील वैद्यकीय अधिकारी डॉ. मथे (वडा)यानी या मुलास तज्ज्ञाकडे आणि शक्यतो मुंबईतील इस्पितळात हलविण्याचा सल्ला दिला होता. या मुलाला रिकेटस, क्रोमॅटिक्स, डायरिया अशा अनेक रोगांनी बेजार केलं होत. डॉक्टरांनी सांगितलेली औषधे नीट न देण्याने त्याच्या रोगांची गुंतागुंतही वाढत होती असे डॉक्टरांनी सांगितले.

भगताला १२०० रुपयाची सुपारी देण्याचे ठरले होते. गाववर्गणी त्यासाठी जमा करण्यात आली; परंतु पैसे अपुरे पडल्याने गावात वाचनालयासाठी नाटक करून जमविण्यात आलेला निधी भक्ताची सुपारी पूर्ण करण्यासाठी वापरण्यात आला. या निधीपैकी ५०१।– शिल्लक रक्कम शाळेचे मुख्य शिक्षक लक्ष्मण जगन्नाथ राऊत यांच्याकडे ठेवण्यात आली होती. ते पैसे तीन जून रोजी केशव पाटीलने मागून घेतले असे राऊत गुरुजींनी स्वत. सांगितले. या छळासाठी आपण शाळा कशी वापरू दिलीत असं विचारता गुरुजींनी आपण नकार दिल्याचं स्पष्ट केलं. राऊत गुरुजी शनिवारीच आपल्या गावी पालघरला निघून गेले तर गावकऱ्यांनी शाळेची चावी त्यांच्या कुटुंबियाकडून घेतली.

ज्याचा मृत्यू अपेक्षित होता त्या अर्भकाचा मृत्यू करणीमुळे झाल्याचे हितसंबंधियांनी पसरवले आणि आपल्या हक्काविषयी आदिवासी मजुराना जागरूक करणाऱ्याना दहशत घालण्यासाठी ते निमित्त साधल, तर गावकऱ्यांनी घडलेलं छळनाटच अंधश्रद्धेमुळं मुकाट सहन केलं. आजही त्याना वाटतंय भुताटकी घालविण्यासाठी आपण या कृत्यास संमती दिली हे बरोबरच; पण सरकारी नियमात हे बसत नाही एवढीच चूक ! जिथं मूल मेलं त्या लक्ष्मीबाईला विचारलं, 'भुताळ्या समजून त्यांचा अमानुष छळ नाही का झाला ?'

त्यावर ती हुंदका देऊन उत्तरली, 'त्याचे चटके बरे होतील; पण माझं मूल थोडंच परत मिळणार आहे ?'

त्या क्षणी तिच्या प्रश्नाला माझ्याकडे उत्तर नव्हतं ! □

ह्या ना त्या निमित्ताने...

# जन्मशताब्दी स्वातंत्र्यवीरांची

फिरोज रानडे

श्याम व राधा आज मोठ्या उत्साहानं दादरच्या शिवाजीउद्यानाकडे जायला निघाले होते. राधा तर खूप गर्दी होईल, मग लांब बसून कार्यक्रम नीट पहाता येणार नाही म्हणून लवकर निघू या म्हणाली होती. त्याप्रमाणे ती दोघे लवकर निघाली पण होती.

शिवाजी-उद्यानाकडे तसे उत्साहाने जाण्याचे कारणही तसेच उत्साहवर्धक होते. स्वातंत्र्यवीर सावरकराच्या जन्म-शताब्दीचा आज सोहळा साजरा व्हायचा होता. ह्यापुढे वर्षभर साजरा होणाऱ्या कार्यक्रमाची सुरुवात आजपासून होणार होती.

एवढ्या मोठ्या महान क्रांतिवीराची जन्म शताब्दी ! ब्रिटिश साम्राज्यावरचा सूर्य ज्या वेळी मावळत नसे, त्या वेळी बाल-हनुमानाप्रमाणे त्या सूर्यबिंबाला गिळकृत करण्याची ईर्षा बाळगणाऱ्या वीराची जन्म-शताब्दी ! दोनदा जन्मठेपेची शिक्षा म्हणजे तब्बल पन्नास वर्षांची कारावासाची शिक्षा झालेली असताना जो डगमगला नाही त्याची जन्म शताब्दी !

अशा क्रांतिवीर सावरकराची जन्मशताब्दी शिवाजी उद्यानासारख्या प्रचंड मैदानावर व्हावी हे योग्यच होते व तेथे फार गर्दी होईल म्हणून लवकर निघू या असे राधाने म्हणणेही योग्यच होते.

शिवाजीउद्यानावर श्याम-राधा पोहोचले व त्याचा सगळा उत्साह मावळला त्या प्रचंड शिवाजीमैदानावर आणि शिवाजी महाराजाच्या भव्य पुतळ्याखाली अगदी तुटपुजा समाज जमला होता.

सभेची वेळ झाली होती; पण सभा सुरू व्हायला अजुनो थोडा अवकाश होतासा दिसले. तेथे कळले की, पलीकडच्याच बाजूला सध्या उभारत असलेल्या स्मारकवास्तूमध्ये तूर्तास एक सग्रहालय व सावरकराचा पुतळा ठेवला आहे.

अेवीतेवी सभेला वेळ आहे तर ते सग्रहालय व तो पुतळा पाहून यावा ह्या हेतूने श्याम-राधा तिकडे गेले

हे काही कायम स्वरूपाचे सग्रहालय नाही. ह्या कार्यक्रमापुरते श्री. गोरसकर वगैरे मंडळीनी सावरकराच्या जीवनातल्या महत्त्वाच्या प्रसंगाची छायाचित्रे, कागदपत्र, त्यानी व मादाम कामानी सुचवलेला राष्ट्रध्वज, सावरकराना अदमानात घातली होती ती दडा-बेडी, गळ्यात घालत असत तो पितळेचा क्रमाकाचा हार वगैरे गोष्टी जमा करून अगदी थोड्या वेळात ठीकपणे माडल्या होत्या. सावरकराबरोबर असलेल्या इतर क्रातिकारकाची छायाचित्रेही लावली होती.

हे सगळे पाहून श्याम-राधाचे मनावर जी थोडी मरगळ आली होती ती कमी झाली. मरगळ कमी होण्याचे आणखी एक कारण म्हणजे बघणाऱ्यात पुष्कळ तरुण मुले-मुली होत्या. ती मुले मोठ्या उत्साहाने सग्रहालयातल्या गोष्टी पहात होती.

सग्रहालय पाहून झाले म्हणून १५–२० पायऱ्या चढून ते सावरकाचा पुतळा पहायला पहिल्या मजल्यावर गेले

अरे, हा काय कोणा क्रातिकारकाचा, स्वातंत्र्यवीराचा पुतळा ? असा विचार त्या दोघाच्या मनात आला.

कोणा डॉक्टरांनी काही वैद्यकीय कारणाकरता बसून बोलत जा म्हणून एखाद्याला सागितले असावे तसे खुर्चीवर बसून सावरकर बोलत आहेत. उजवा हात वर केलेला व त्यातले पहिले बोट उंचावलले व बाजूला छत्री. सावरकराचे असे एक छायाचित्र आहे. बिचाऱ्या पुतळेकाराने त्या छबीबरहुकुम आपला पुतळा बनवला.

आता वय झाल्यावर सावरकर खुर्चीवर बसून बोलत असतील–नाही असे नाही; पण ही काही त्याची प्रतिमा नव्हे–हा पुतळा एका महान क्रातिकारकाचा आहे हे नव्या पिढीला जाणवावे कसे ? ते कायम छत्री बाळगत होते हे खरे; पण पुतळ्यात त्याला स्थान दिलेच पाहिजे का ?

तेव्हढ्यात सभा सुरू होत आहे कळले म्हणून श्याम व राधा सभास्थानी आले. पूर्वीच्या सख्येत पाच–पन्नासची भर पडली होती.

सभेला सुरुवात झाली. व्यासपीठावर जयंतराव टिळक, न्यायमूर्ती धर्माधिकारी, श्री. चटर्जी व मुबईचे महापौर मनमोह सिंग वेदी बसले होते.

एखाद्या गरीब माणसाच्या घरच्या लग्नाचा जसा थाट असतो तसा ह्या कार्यक्रमाचा थाट होता.

ह्याच नव्हे तर सावरकराच्या जन्म-शताब्दीनिमित्त त्या आठ-दहा दिवसात झालेला सगळा कार्यक्रम असाच ‘ गरिबी ’ थाटाचा होता.

महापौर वगैरे मडळी एके काळी जनतेचे पुढारी असत. फिरोझशहा मेहता वगैरे लोकाचे सोडा अगदी आपल्या स का पाटलापर्यंतचे महापौर कोणी तरी असत, जनतेत त्याना स्थान होते. आताचे महापौर पक्षोपपक्षाच्या देवाण–घेवाणीतून निवडून आलेले. ते सावरकरावर काय बोलणार ?

ह्याच कार्यक्रमाचे नाही तर सावरकराच्या जन्म-शताब्दीचा सगळ्या कार्यक्रमावर ही ‘ गरिबी ’ छाया पडली होती. कधी पैशाची गरिबी, कधी बुद्धीची गरिबी, कधी कल्पकतेची गरिबी !

दूरदर्शनवर झालेला कार्यक्रम असाच !

अरे, ह्या माणसाने ब्रिटिश सरकारची झोप उडवली ना ? सगळा भारत गदगदा हलवला ना ? मग कार्यक्रम फक्त मराठीत म्हणजे फक्त मराठी लोकाकरता का ? हिंदी, मद्रासी, गुजराथी, पारशी, मुसलमान ह्याना काय सावरकर माहीत नाहीत ? आणि जर माहीत नसतील तर माहीत करून देण्याची जबाबदारी कोणाची ?

बरं, कार्यक्रम मराठीत तर मराठीत मग पतित–पावन चळवळीतला रत्नागिरीचा कोणी मिळाला नाही ? ज्या हरिजनाकरता सावरकरांनी एवढे केले त्यापैकी कुणी का नाही ? कुणी स्त्री–कार्यकर्ती मिळाली नाही ?

त्या तात्पुरत्या उभारलेल्या संग्रहालयात माईंचे म्हणजे सावरकराच्या पत्नीचे एकही छाया–चित्र नसावे ? सावरकराची पन्नास

वर्षांची शिक्षा म्हणजे माईंची पण पन्नास वर्षांची शिक्षा नव्हती का? भले त्या अदमानात गेल्या नसतील. सावरकराच्या कर्तृत्वात त्याचा काहीच भाग नाही?

गांधीना बाकी काही म्हणा; पण त्यानी कस्तुरबाना बरोबरीने वागवले. आपल्या सत्याग्रहात स्त्रियांना बरोबरीचे स्थान दिले. सावरकरांच्या चळवळीत स्त्रियाना स्थान नव्हते म्हणून तर दूदवर कोणा स्त्रीला बोलावले नव्हते?

सावरकरासारख्या बुद्धिमान व तर्क-शुद्ध विचार करणाऱ्या माणसावर एक चागला लेख इंग्रजीत येऊ नये? त्या आठवड्यातली वर्तमानपत्रे वाचा. एकाही इग्रजी पत्रात त्याच्यावर लेख नव्हता! जे काय आले ते मराठी पत्रातून. कोणा मुसलमान वा दलित लेखकाने सावकरावर लिहिलेले वाचले आहेत कधी?

१८५७ सालच्या बडाला सावरकरानी स्वातंत्र्य-युद्ध म्हटले म्हणून त्याचे जे कौतुक चालले आहे ते चाललेच आहे, पण जर खरच हे स्वातत्र्ययुद्ध हिंदी लोक जिकले असते तर राज्य शिवाजीच्या वा थोरल्या बाजीरावाच्या वंशजाकडे नसते गेले, ते गेले असते औरंगजेबाच्या व जहांगिराच्या बहादूरशहा जफरकडे! ५७ सालचा फतवाच तसा होता. मग हे स्वातत्र्य-युद्ध कसे?

तसेच 'हिंदू'ची व्याख्या सावरकरांनी 'आसिंधु-सिंधुपर्यंता' म्हटले. हिंदुस्थानला पुण्यभू व पितृभू मानणाराच फक्त जर हिंदू, तर मग नेपाळचे नरेश व नेपाळी जनता कोण? किंवा मॉरिशसचे पूर्वीचे पतप्रधान रायगुलाम वा आताचे डॉ. अनिरुद्ध कोण? ते हिंदू आहेत; पण हिंदुस्थानला पितृभू मानत नाहीत. त्यांना त्यांचा देश पितृभू आहे. मग ते काय हिंदू नाहीत?

पण हा विचार करतो कोण?

असे का होते? सगळ्या भारताचा पुढारी; पण त्याची जन्म-शताब्दी फक्त मराठी माणसेच साजरी का करतात?

ज्या सावरकरानी बुद्धि-प्रामाण्य मानल त्यांचे विचार बुद्धि-प्रामाण्यावर का तपासून पाहिले जात नाहीत?

□

मुंबई वार्ता

# लोकविज्ञान संघटना

## दाट वस्त्यांचे भाग ढवळून काढले

औद्योगीकरण आणि पुढारलेपणा, तंत्रज्ञानाची प्रगती म्हणजे संपन्नता. अनेक महाविद्यालयं आणि सुशिक्षितपणा यांच्या जोड्या प्राथमिक शाळेतली मुलही लावतील; पण औद्योगीकरण म्हणजे वैज्ञानिकता, तंत्रज्ञानातली प्रगती म्हणजे संपत्तीचं समान वाटप आणि शिक्षण म्हणजे सुसंस्कृतपणा अशा जोड्या फसव्या ठरण्याचाच संभव अधिक! संभव कशाला, औद्योगीकरण म्हणजे वैज्ञानिकता नाही याच्या ठळक खुणा मुबईसारख्या देशाच्या औद्योगिक राजधानीत सापडतात. जागोजागची साईबाबाची मदिर, असंख्य लहान-मोठे दर्गे आणि या सगळ्याच्यावर अधश्रद्धेन, परंपरेनं बाटलेला समाज.

हे सगळ चित्र निराशाजनक वाटतं; पण विज्ञानाचा उद्घोष जर करावयाचा असेल तर त्यात निराशा असणार नाही. ही कोंडी फोडायला कोणी तरी सज्ज झालंच पाहिजे. विज्ञानाची कास म्हणजे सातत्यानं प्रयत्न आणि अशक्याशी टक्कर.

हे सारं सुचायचं कारण म्हणजे लोकविज्ञान संघटनेचा विज्ञानजत्रेचा कार्यक्रम. याच संघटनेनं वडाळयाला केलेल्या अधश्रद्धा विरोधी कार्यक्रमाचा वृत्तान्त दोन वर्षांपूर्वी सादर केला होता. त्यानतर लोकविज्ञान संघटनेची ग्रामीण भागातली विज्ञानजत्रा झाली. अशाच प्रकारची जत्रा मुबईतही आवश्यक वाटली.

एकूणच स्वयंस्फूर्त सामाजिक कार्याला नेमकी दिशा आणि अत्यंत ठसठशीत असा कार्यक्रम असला तर ते किती परिणामकारक होऊ शकतं याचं मूर्तिमंत उदाहरण या जत्रेत पहायला मिळालं. कारण वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार वगैरे शब्द चपखल वाटत असले तरी प्रत्यक्षात ते 'म्हणजे नेमक काय?' चं भलंमोठं प्रश्नचिन्ह सोडतात. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे देवावरचा अविश्वास का? उपास-तापास सोडणं का? की आपलं केमिस्ट्री, फिजिक्स घेऊन बी. एससी. होणं? यातनं वाट काढणं आणि वर्मावर बोट ठेवण हे सोपं नाही आणि तेच तर नेमकं आवश्यक आहे.

भारतातल्या सत्तर ते ऐंशी टक्के स्त्रियाना रक्तक्षय किंवा ॲनिमिया झालेला असतो. त्याची अनेक वैद्यकीय, भौगोलिक कारणं असू शकतील. त्याचे उपायही तितके दुरापास्त नाहीत; पण या परिस्थितीमागचं भलं मोठं भेसूर सामाजिक वास्तव म्हणजे कु-पोषण आणि त्यातही खास करून घरोघरच्या स्त्रियाना मिळणारं कमी अन्न. स्त्रियाना होणारा हा ॲनिमिया याला फक्त स्त्रीवरचा अन्याय एवढाच कारणीभूत नाही तर स्त्रीची स्वतःची आणि तिच्या कुटुंबियाची अन्न या पोषकाकडे पहाण्याची दृष्टी अवैज्ञानिक सदोष आहे.

या आशयाची अभिव्यक्ती ही सर्वसामान्यानाही समजेल, रुचेल अशी करणं हा खरा कौशल्याचा भाग आहे नाही तर काय, सरकारी परिपत्रकांतून, रेडिओ-दूरदर्शनच्या कार्यक्रमातून पुरेशी माहिती दिली जातेच, पण मुबईच्या लोकविज्ञानानं या आशयाकरता सुकन्या आगाशे यानी लिहिलेला 'रक्ताचं पाणी हिच्या झालंया' असा वग विज्ञानजत्रेमध्ये जागोजागी सादर केला. या सादर करण्याच्या जागाही जनसामान्यांना जाऊन भिडणाऱ्या होत्या. चिता कॅम्पमधल्या सरमिसळ वस्तीत बॉम्बे हिन्दीमध्ये, तर डिलाइल रोड, वेलासिस रोडसारख्या कामगारवस्तीमध्ये या कार्यक्रमाला भरपूर प्रतिसाद मिळालेला दिसला.

तमाशासारखा रागडा प्रकार, त्यातले इरसाल विनोद आणि गाणी यामुळे नेमक्या जागी दाद मिळत होती.

तमाशा रीतसर गणानं सुरू होतो; गण सुरू करणारे पेंद्या वगैरे कृष्णाचे सवगडी, आता लवकरच लचकत-मुरडत येणाऱ्या गवळणी दिसतील म्हणून अपेक्षेनं उभे रहातात. मात्र त्याना प्रत्यक्षात भेटते ती लचकणारी-मुरडणारी गवळण नव्हे, तर झब्बा-पँट घातलेली त्याची पुढारी आणि ती सांगते, लचकत-मुरडत चालणाऱ्या,

रसरशीत कायेच्या, आनदी, सुखी गवळणीचे दिवस आता संपले. आता दिसणारी गवळण म्हणजे–

फिका फिका मुखडा मरणाचा थकवा
रगताचं पाणी हिच्या झालंया
या दुखण्याचं नाव काय
बिनबोभाटयाचं हाय
घूस जशी वागते घरादारा
बाईच्या जातीला आलं बग सोबतीला
मुक्यानं कशी बग सोसतीया
गरिबीचा एक टोला सुकी रोटी तिखटाला
पैसा आणू कुठून हो औषधाला.

अर्थात हे भकास आणि अश्रृंगारिक चित्र पेंद्या आणि कंपनीला पटत नाही. हे पटवणं आणि ठसवणं हे गवळण पुन्हा–पुन्हा करत रहाते. पेंद्या आणि त्याचा मित्र ही दोघही जण प्रेक्षकात बसलेल्या, कुतूहल म्हणून आलेल्या सर्वसामान्याचं प्रतिनिधित्व करतात. तसा त्यांच्या मनात फार चांगुलपणा नसला तरी फार दुष्टावाही नाही. आपले विचार चुकीचे आहेत याची कल्पना नाही; पण जाणून-बुजून अन्याय करण्याची इच्छाही नाही. भाबडेपणा, स्वार्थ, परंपरा या साऱ्याचं एक गोंधळाचं मिश्रण त्यांच्या मनात आहे. स्त्रीबद्दलची त्याची कल्पना, नार हवी कवळी, जशी शेंग चवळी इतपतच आणि स्वतःच्या बायकोबद्दल

आपल्या पोटाला चिमटा घेऊन
घास भरवावा पिल्लाना तिनं
नवऱ्याच्या पोटात बायकोचं पोट
पोट तिचं खायला मागतं का कुठं ?

अशा उदात्त कल्पना आहेत आणि त्यामुळंच घरातलं उरलं-सुरलं शिळं पाकं खाणारी सर्वसामान्य स्त्री ॲनिमियाला बळी पडते. अर्थात हा एकूणच समाजव्यवस्थेचा, गरिबीचा परिणाम आहे मुळातच अन्नाच समान वाटप केलं तरीही प्रत्येकाच्या वाटणीला अपुरं अन्नच येईल. त्यातही स्त्रीचा वाटा अधिक अपुरा ठरेल; पण तरीही प्राप्त परिस्थितीमध्ये हे अटळ नाही. कारण वारंवारचं गरोदरपण, बाळतपण, गर्भपात, मासिक पाळीचा रक्तस्राव या दुर्दैवी घटनांना स्त्रियानाच सामोरं जावं लागतं. सुजाणपण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांनी हे टाळण्यासारखं आहे.

## स्लाइडशो–जबरदस्त प्रभाव

गरिबीच्या एका टोल्यानं रक्ताच पाणी करणाऱ्या ॲनिमियाविषयीची अधिक माहिती वगानंतरच्या स्लाइड–शोमधून दिली जाते. या स्लाइड–शोमध्ये रक्तातल्या रक्तपेशीची, फिकट झालेल्या रक्तपेशीची स्लाइड, ॲनिमियाची लक्षणं आणि त्यावरचे उपाय, अगदी घरगुती स्वरूपाचे उपाय म्हणजे हिरव्या पालेभाज्या, मोड आलेली धान्यं, गूळ इत्यादीचा आहारात समावेश असायला हवा अशी माहिती दिली जाते आणि वगामधून निर्माण झालेल्या प्रश्नाची सुलभ उत्तरं त्या स्लाइड–शोमधून मिळतात.

अशाच प्रकारची कुष्ठरोगावरची माहिती देणारा स्लाइड–शोही दाखवण्यात आला. तिथल्या तिथेच काही माणसानी आपल्या अंगावरचे रंग उडालेले डाग दाखवून आपल्या रोगाचं निदानही करून घेतल ! एकूण कार्यक्रमाचा केवढा जबरदस्त प्रभाव पडला आणि त्याचा परिणाम कसा झाला याच हे बोलकं उदाहरणच होत.

अशाच प्रकारच्या शंका–समाधानाचा कार्यक्रम वैद्यकीय गप्पामधूनही झाला. हा म्हणजे एक प्रकारचा 'डॉक्टर तुमच्या घरी' सारखा सोपा कार्यक्रमच होता. कारण सर्व कार्यक्रम ऐकून, पाहून डॉक्टरकडे जाण्याची आवश्यकता पटली, तरी घराच्या जजाळातून बाहेर पडून डॉक्टरकडे जाणं, त्याची फी देणं या साऱ्या गोष्टीनी ती एक अडथळ्याची शर्यतच होऊन बसते. सरकारी, धर्मादाय चालणारे दवाखाने असोत; पण तिथवर पोचायला तर हवं ना ! तेव्हा महमद येत नसेल तर पर्वतानंच तिकडं जायला हव. लोकविज्ञानचे कार्यकर्ते श्रोत्यात फिरून–फिरून प्रश्न गोळा करायचे. स्वतः होऊन प्रश्न न विचारणारांना प्रोत्साहन देऊन त्याचे प्रश्न काढून घेत होते. डॉक्टरांकडे येणारे प्रश्न काही वेडगळ, काही अगदी खास आणि टोकदार, काही सर्वसाधारण; पण साऱ्यातून दिसत होती ती अशा विनामूल्य सल्ल्याची आवश्यकता. कार्यक्रम संपल्यावर स्टेजच्या बाजूला पेशट आणि सल्ला विचारणारांच्या घोळक्यात डॉक्टर बुडून गेलेले दिसायचे आणि त्यातले बरेच पेशटस् स्थानिक कार्यकर्त्यांच्या सहाय्यानं दवाखान्यातही पोचायचे.

तीन दिवसाच्या जत्रेच्या कार्यक्रमात पहिल्या दिवशी वग, दुसऱ्या दिवशी शास्त्रीय उपकरणाची माहिती आणि तिसऱ्या दिवशी बहुराष्ट्रीय औषध कंपन्यांवरचा अभिरूप खटला असे भरगच्च कार्यक्रम होते आणि महिनाभर या जथ्यानी मुंबईचे निरनिराळे दाट लोकवस्तीचे भाग ढवळून काढले.

## विज्ञान आणि परिवर्तन

अशा प्रकारच्या वैज्ञानिक संघटनाची, संघटकाची गरज आपल्या समाजात आहे आणि त्या दृष्टीनं लोकविज्ञान संघटनेमधल्या कार्यकर्त्यांत टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, बी. ए. आर. सी. आय. आय. टी. अशा मातबर संस्थामधून इजिनियर, तज्ञ आले होते, हे उल्लेखनीय आहे.

केरळमध्ये अशा प्रकारे काम करणारी वैज्ञानिक सघटना आहे असं ऐकून आहे. मुबईतही वैज्ञानिक संघटना उगवताना दिसतात. त्यातली किती भूछत्रं आहेत आणि किती दीर्घ काळ टिकू शकतील हे काळच ठरवू शकेल. मुबईत राष्ट्रसेवा दलानंही गेल्या महिन्यात विज्ञानजत्रा भरवली होती; परतु जनजागरणाचं, सामाजिक दृष्टिकोन बदलण्याचं काम करणाऱ्या संस्था प्रत्यक्ष राजकारणापासून दूर रहाण हेच इष्ट. मात्र विशिष्ट राजकीय मताचा प्रचार वैज्ञानिक कार्यक्रमामधून टाळणं शक्य आहे, हे या कार्यक्रमान सिद्ध करून दाखवल; पण ही सीमारेषा कठिण आणि धूसर असते. उदाहरणार्थ रासायनिक द्रव्यानी दूषित झालेल पाणी पिणं आरोग्याला हानिकारक आहे, इतपत जागरूकता निर्माण करण हे वैज्ञानिक सघटना करू शकेल; पण इथेच तिची मर्यादा ठरेल.

इथे जाणवतं की, वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारण, बुद्धिवाद जगवणं हा सपूर्ण समाजपरिवर्तनाचा एक भाग आहे; पण हे समाजपरिवर्तनही केवळ संप आणि टाळेबदी करून साध्य होणारं नाही. त्याकरताही विशिष्ट कार्यक्रम हवा. शेतीच उत्पादन वाढवायचं असेल, तर केवळ शेतमजुराची रोजगारी वाढवून होणार नाही, तर शेतकीशास्त्राचा, ऊर्जेचा, तत्रज्ञानाचा वैज्ञानिक उपयोग हा प्रभावी मार्ग आहे म्हणूनच केवळ वैज्ञानिक दृष्टिकोन बाणवणं इतकं मर्यादित उद्दिष्ट असून भागणार नाही, तर समाजपरिवर्तनाच्या संपूर्ण प्रक्रियेकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पहाणच योग्य ठरेल. लोकविज्ञानकडून ती अपेक्षा आहे.

–ललिता बर्वे

## विश्वकरंडक स्पर्धा

# सांघिक सामर्थ्याचा रोमहर्षक अनुभव!

किरण गोखले

ज्या क्रिकेटसंघाला अलिकडच्याच पाकिस्तान व वेस्ट इंडीज दौऱ्यात सणसणीत मार खावा लागला होता, इंग्लंडमधल्या सट्टेबाजांनी ज्या संघाच्या विजयाची केवळ १/४० इतकीच शक्यता गृहीत धरली होती, ज्या संघाला मर्यादित षटकांच्या सामन्यामध्ये दुय्यम नव्हे तर तिसऱ्या दर्जाचे मानण्यात येत होते, त्याच भारतीय क्रिकेटसंघाने इंग्लंडमध्ये १९८३ च्या तिसऱ्या प्रुडेन्शिअल विश्वचषक क्रिकेटस्पर्धेत आपल्या गटात द्वितीय स्थान मिळविले नंतर उपांत्य फेरीत इंग्लंडला धूळ चारली व जेव्हा अंतिम फेरीत दोनदा विश्वचषक जिंकणाऱ्या बलाढ्य वेस्ट इंडीज संघाला चारी मुंड्या चीत करून हा चांदीचा विश्वचषक पटकाविला तेव्हा साऱ्या जगभरच्याच नव्हे तर भारतातील क्रिकेट-शौकिनानाही आश्चर्याचा धक्का बसला!

विश्वचषक-विजेत्या भारतीय संघाची ही कामगिरी भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील एक अभूतपूर्व व गौरवास्पद घटना मानली पाहिजे! आजपर्यंतचा भारतीय क्रिकेटचा इतिहास फारसा उज्ज्वल नसला तरी इंग्लंड, वेस्ट इंडीज यासारख्या क्रिकेट-धुरंधराना त्यांच्या मायभूमीत एकएकदा हरविण्याचा पराक्रम आपण गाजविला होता; पण क्रिकेट खेळणाऱ्या जगातील आठ उत्कृष्ट राष्ट्रांच्या स्पर्धेत अव्वल स्थान मिळविण्याचा पराक्रम भारत प्रथमच करीत आहे! हा पराक्रम गाजविताना भारताने ऑस्ट्रेलिया, इंग्लंड या वजनदार प्रतिस्पर्ध्यांना नमवलेच; पण जलद गोलंदाजाचा ताफा बाळगणाऱ्या विश्वविजेत्या वेस्ट इंडीज संघाला दोन वेळा पराजित केले!

भारतीय क्रिकेटपटूंचा हा चमकदार पराक्रम भारत सरकारलाही धक्का देणारा होता. विश्वचषक-स्पर्धेतील भारताची कामगिरी यथातथाच असणार या कल्पनेने आकाशवाणी व दूरदर्शननेही या सामन्यामध्ये फारसा रस दाखविला नाही भारताच्या पहिल्या तीन साखळी-सामन्याचे तर धावते समालोचनही आकाशवाणीने प्रसृत केले नाही; पण जेव्हा आपल्या पहिल्याच साखळी-सामन्यात भारताने वेस्ट इंडीजला ३४ धावांनी पराभूत केले व पुढच्याच सामन्यात झिम्बाब्वेला हरवून आपली घोडदौड कायम ठेवली तेव्हा मात्र आकाशवाणीने घाईघाईने बी. बी. सी. वरील धावते समालोचन चौथ्या सामन्यापासून प्रक्षेपित करण्यास सुरुवात केली व जेव्हा भारताने उपांत्य फेरीपर्यंत धडक मारली तेव्हा दूरदर्शननेही अधूनमधून अडथळे येणारा का होईना पण उपांत्य व अंतिम फेरीचे 'लाइव्ह टेलिकास्ट' दाखविण्यासाठी परदेशी उपग्रहाची सेवा उपलब्ध करून घेतली!

परदेशी क्रिकेटपटू व क्रीडापत्रकार भारतीय क्रिकेटबद्दल तुच्छता दाखविण्यात नेहमीच आघाडीवर असतात. भारताच्या वेस्ट इंडीजवरील पहिल्या विजयाची बहुतेक सर्व परदेशी क्रीडासमीक्षकांनी 'फ्लूक' म्हणून संभावना केली. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार किम ह्यूज व वेस्ट इंडीजचा कर्णधार क्लाइव्ह लॉइड हे दोन परदेशी क्रिकेटपटू सोडले तर बाकी सर्वांनी भारताला बादच ठरविले होते. क्लाइव्ह लॉइडने भारताला कमी लेखू नका असा इशारा दिला होता, तर किम ह्यूजने भारत हा यंदाच्या विश्वचषकस्पर्धेत 'डार्क हॉर्स' ठरण्याची शक्यता आहे असे म्हटले होते. भारताने उपांत्य फेरीत प्रवेश करताना जेव्हा ऑस्ट्रेलियावर मात केली तेव्हा इंग्लंडला उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाशी नव्हे तर भारताशी खेळावे लागणार याबद्दल ब्रिटिश क्रीडासमीक्षकांनी आनंद व्यक्त केला होता व ही घटना म्हणजे इंग्लंडला अंतिम सामन्यात पोचण्याचा परवानाच आहे असे म्हटले होते; पण भारताने उपांत्य फेरीत इंग्लंडला ६ गडी राखून आरामात हरविले व हा परवाना रद्द केला!

### विजयाचे श्रेय कोणाला ?

भारताच्या या भीमपराक्रमाचे श्रेय कोणाला जाते ? झिम्बाब्वेसारख्या नवोदित संघाने आपली ५ बाद १७ अशी केविलवाणी अवस्था केल्यानंतर स्वतःच्या नाबाद १७५ धावांनी भारताची स्थिती मजबूत करणाऱ्या कपिलदेवला ? मोहिंदर अमरनाथ, यशपाल शर्मा व संदीप पाटील यांच्या दमदार फलंदाजीला ? का ऑस्ट्रेलिया, इंग्लंड व वेस्ट इंडीज यांच्या महत्त्वाच्या फलंदाजांना बाद करून त्यांची घसरगुंडी उडविणाऱ्या बिन्नी, मदनलाल व संधू यांच्या अचूक गोलंदाजीला ? भारताच्या या ऐतिहासिक कर्तृत्वाचे श्रेय यांपैकी कोणत्याही एका किंवा दोन व्यक्तींना देता येणार नाही व यातच भारताच्या पराक्रमाची किमया सामावलेली आहे!

आपल्याकडे आतापर्यंत मर्चंट, हजारे, मांजरेकर, बोर्डे यांच्यासारखे दर्जेदार फलंदाज किंवा गुप्ते, चंद्रशेखर, बेदी, प्रसन्ना यांच्यासारखे किमयागार गोलंदाज होऊन गेले व त्यांनी वैयक्तिक पराक्रम गाजविलेही; पण साऱ्या संघाने एका विशिष्ट ध्येयासाठी सांघिक प्रयत्नांची शर्थ करण्याची ही पहिलीच वेळ! यंदाच्या विश्वचषकस्पर्धेत भारतीय संघातील प्रत्येक खेळाडू वैयक्तिक उच्चांकासाठी नव्हे तर संघाच्या विजयासाठी खेळला व त्याचे बक्षीस त्यांना तावडतोब मिळाले. आपल्या संघाने बहुतेक सर्व सामन्यात फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षण या तिन्ही प्रांतात अप्रतिम कामगिरी बजा-

वली व प्रतिस्पर्धी संघाना पेचात टाकले.

विश्वचषक स्पर्धेसाठी पाठविल्या गेलेल्या भारतीय संघाची निवड समतोल होती असेच म्हटले पाहिजे. सुनील वॉल्सन या डावखुऱ्या मध्यमगती गोलंदाजाचा अपवाद वगळता इतर सर्वांची निवड वादातीत होती. श्रीकांत, गावसकर, शर्मा, किरमाणी व वेंगसकर हे फलंदाज सोडले तर इतर सर्व खेळाडू अष्टपैलू खेळाडू होते. मर्यादित षटकांच्या सामन्यात जगातल्या कोणत्याही संघास हेवा वाटावा असे आक्रमक फलंदाज श्रीकांत, संदीप व कपिल पाच मध्यमगती गोलंदाज व चांगल्यापैकी फलंदाज कपिल, मदन, बिन्नी, संधू व मोहिंदर, दोन फिरकी गोलंदाज रवी, शास्त्री आणि कीर्ती आझाद व जगातला एक उत्कृष्ट यष्टीरक्षक किरमाणी यांचा समावेश असलेला संघ दुबळा संघ होता असे कोणीही म्हटले नसते; पण भारतीय संघामध्ये कमतरता भासत होती ती सातत्याची व जिद्दीची! कपिलदेवच्या समर्थ व आक्रमक नेतृत्वाने भारतीय संघात ही जिद्द व खेळातील साहस निर्माण केले.

श्रीकांत, संदीप व कपिल या धडाकेबाज फलंदाजांनी आपल्याबद्दलच्या अपेक्षा काही प्रमाणात तरी पूर्ण केल्या असेच म्हटले पाहिजे. श्रीकांत फटकेबाजी करण्याच्या नादात बऱ्याच वेळा उतावीळपणे बाद झाला; पण त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दोन्हीही साखळी–सामन्यांत (३९ व २४ धावा) भारताला चांगली सुरुवात करून दिली. इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात गावसकरने त्याच्या स्वैर फटकेबाजीला, त्याला वारंवार समज देऊन आळा घालण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे भारताने नाबाद ४५ पर्यंत मजल मारली व त्यात श्रीकांतचा वाटा होता १९ धावांचा. वेस्ट इंडीजविरुद्धच्या अंतिम सामन्यात तर गावसकर फार लवकर बाद झाला; पण श्रीकांतने अनेक धोकादायक पण आक्रमक फटके लगावून भारताला चांगल्यापैकी व जलद धावसंख्या रचून दिली. त्याने ८ सामन्यात १९.५ धावांच्या सरासरीने १५६ धावा जमविल्या!

झिम्बाब्वेविरुद्धचा दुसरा साखळीसामना व ऑस्ट्रेलियाविरुद्धचा पहिला सामना (१ व ० धावा) वगळता संदीप पाटीलने इतर सहाही सामन्यात चांगली फलंदाजी केली. संदीप खेळायला आला की, धावांचा वेग झपाझप वाढू लागतो हे ठरलेलेच आहे. इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात भारताला सामना जिंकण्यासाठी २१४ धावांची जरुरी होती व ती अशक्यप्राय गोष्ट नव्हती; पण मोहिंदर व यशपाल शर्माने त्या दिवशी चहापानानंतर (२५ षटकांनंतर) अत्यंत संथगतीने खेळ सुरू करून शेवटी उरलेल्या १०–१५ षटकात भारत हव्या असलेल्या ६०–६५ धावा पूर्ण करू शकेल की नाही अशी परिस्थिती निर्माण केली. अशा स्थितीत मोहिंदर धावचीत झाल्यामुळे संदीप मैदानात आला व त्याने धडाकेबाज खेळ करून सारे चित्रच पालटून टाकले! भारताने हा सामना ५ षटके व दोन चेंडू बाकी असतानाच खिशात टाकला, त्यात संदीपचा वाटा होता नाबाद ५१ धावांचा! वेस्ट इंडीजविरुद्धच्या अंतिम सामन्यातही त्याने एक षटकारासह २७ धावा फटकाविल्या; पण मोठी खेळी करून त्याने भारताच्या धावसंख्येला चांगला आकार द्यावा ही अपेक्षा मात्र तो विश्वचषकस्पर्धेत पुरी करू शकला नाही. त्याची प्रत्येक सामन्यामागे धावांची सरासरी भरली ३०.९ धावांची!



संदीप पाटील – अपेक्षाभंगही नाही, अपेक्षापूर्तीही नाही!

¤

यंदाच्या विश्वचषकस्पर्धेत कर्णधार कपिलदेव एकच मोठी खेळी खेळला; पण त्या दिवशीच्या त्याच्या खेळाने भारताला पराभवाच्या खाईतून बाहेर खेचले. उपांत्य फेरीत प्रवेश मिळविण्याच्या भारताच्या आशा जिवंत ठेवल्या व विश्वचषकस्पर्धेतील न्यूझीलंडच्या ग्लेन टर्नरचा १७१ धावांचा उच्चांक मोडला!

झिम्बाब्वेविरुद्धच्या त्या साखळीसामन्यातील त्याच्या नाबाद १७५ धावात सहा षटकार व सतरा चौकार होते, या गोष्टीच त्याच्या धावांचा झपाटा दर्शविण्यास पुरेशा आहेत. कपिलदेवने केवळ काही धावाच जमविल्या असे नाही तर बिन्नी व किरमाणी यांच्या साथीने भारताला ६० षटकांत ८ बाद २६६ ही धावसंख्या रचून दिली. तरीही शेवटी झिम्बाब्वेने २३४ पर्यंत मजल मारली व भारतीय संघाचा डाव ४०–५० धावा कमी असताना आटपला असता तर आपला विजय काही लांब नव्हता असेच दाखवून दिले!

कपिलदेवने ८ सामन्यांत भारतीय फलंदाजांमध्ये सर्वाधिक म्हणजे ३०३ धावा जमविल्या. तीन वेळा तो नाबाद राहिला व त्याने प्रत्येक डावात सरासरी ६०.६ धावा फटकाविल्या!

यशपाल शर्मा हा भारताच्या कसोटी सघातील मधल्या फळीतला भरवशाचा फलदाज. विश्वचषक सामन्यात त्याने सातत्याने फलंदाजी करून भारताच्या धावसंख्येस आकार देण्याची कामगिरी बजावली. वेस्ट इंडीजविरुद्ध पहिल्याच सामन्यात ८९, ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४० व इंग्लंडविरुद्ध ६१ धावा करून त्याने मधल्या फळीची घसरगुडी होऊ दिली नाही. सर्व प्रकारच्या जलदगती माऱ्याला त्याने धैर्याने तोड दिले; पण काही डावांत मात्र अतिशय संथ खेळ करून आपण मर्यादित षटकाच्या सामन्यात खेळत आहोत याचा आपल्याला विसर पडल्याचे त्याने दाखवून दिले.

फलंदाजापैकी सुनील गावसकरने मात्र साफ निराशा केली. ८ पैकी ६ सामन्यामध्ये तो खेळला या ६ सामन्यांमधील त्याच्या धावा आहेत १९, ४, ०, ९, २५ व २ अशा. त्याने ९.८ धावाच्या सरासरीने केवळ ५९ धावा जमविल्या. भारतातर्फे ८ सामन्यांत एकूण १३ फलंदाज खेळले. त्यापैकी गावसकरचा नंबर धावाच्या सरासरीत शेवटून दुसरा लागला! आपण जे दोन साखळी-सामने गमावले त्यात गावसकरचा समावेश नव्हता; पण इतर वेळी मात्र इंग्लंडविरुद्धचा सामना वगळल्यास त्याने दर वेळी प्रतिपक्षाला भारताचा पहिला बळी झटपट मिळवून दिला. यष्टीबाहेर जाणाऱ्या चेंडूचा पाठलाग करण्याच्या प्रयत्नात तो बऱ्याच वेळा बाद झाला व त्याने पुढील फलंदाजाचे काम अवघड करून सोडले.

---

## विश्वचषक स्पर्धांमधील भारताची कामगिरी

### ( १९७५, १९७९ व १९८३ )

#### पहिली विश्वचषक स्पर्धा (१९७५)

| | | | |
|---|---|---|---|
| इंग्लड | ३३४–४ | विजयी वि. भारत | १३२–३ |
| भारत | १२३ विनबाद | विजयी वि. पूर्व आफ्रिका | १२० |
| न्यूझीलॅण्ड | २३३–६ | विजयी वि. भारत | २३० |

( भारत साखळीस्पर्धेतच बाद )

#### दुसरी विश्वचषक स्पर्धा (१९७९)

| | | | |
|---|---|---|---|
| वेस्ट इंडीज | १९४–१ | विजयी वि. भारत | १९० |
| न्यूझीलॅण्ड | १८३–२ | विजयी वि. भारत | १८२ |
| श्रीलका | २३८–५ | विजयी वि. भारत | १९१ |

( भारत साखळीस्पर्धेत बाद )

#### तिसरी विश्वचषक स्पर्धा (१९८३)

| | | | |
|---|---|---|---|
| भारत | २६२–८ | विजयी वि. वेस्ट इडीज | २२८ |
| भारत | १५७–५ | विजयी वि. झिम्बाब्वे | १५५ |
| ऑस्ट्रेलिया | ३२०–९ | विजयी वि. भारत | १५८ |
| वेस्ट इंडीज | २८२–९ | विजयी वि. भारत | २१६ |
| भारत | २६६–८ | विजयी वि. झिम्बाब्वे | २३४ |
| भारत | २४७ | विजयी वि. ऑस्ट्रेलिया | १२९ |

उपांत्य फेरी : भारत २१७–४ विजयी वि. इंग्लंड २१३

अतिम फेरी : भारत १८३ विजयी वि. वेस्ट इंडीज १४०

---

मोहिंदर अमरनाथ, रॉजर बिन्नी, मदनलाल व संधू हे कपिलदेवनंतरचे भारताचे सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू व प्रमुख मध्यमगती गोलंदाज! या सर्वांनीच बहुतेक सर्व सामन्यामध्ये आपल्या अष्टपैलू कामगिरीने भारताला विजय प्राप्त करून दिला!

मोहिंदरने ८ सामन्यात २९.६ धावाच्या सरासरीने २३७ धावा जमविल्या व ८ बळीही मिळविले. उपात्य व अतिम या दोन्हीही सामन्यात त्याची 'मॅन ऑफ द मॅच' म्हणून निवड झाली! इंग्लंडचे गावर व गॅटिंग व अतिम सामन्यात वेस्ट इंडीजचे दुर्जा, मार्शल व होल्डिंग यांना त्याने तंबूचा रस्ता दाखविला व इंग्लंडविरुद्ध ४६ तर वेस्ट इंडीजविरुद्ध २६ धावाही फटकाविल्या. गावसकर बऱ्याच वेळा लवकर बाद झाल्यामुळे दर वेळी मोहिंदरला लवकरच मैदानात उतरावे लागले; पण त्याने अनेकदा भारताचा डाव स्थिरस्थावर करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. पाकिस्तान व वेस्ट इडीज दौऱ्यातील आपली 'लढवैय्याची' प्रतिमा त्याने विश्वचषकस्पर्धेतही कायम राखली!

रॉजर बिन्नी हा तर भारतीय सघाचे एक प्रमुख अस्त्र ठरला! ज्या ज्या वेळी प्रतिस्पर्धी फलंदाज भारताच्या हातातून सामना खेचून घेत आहेत अशी चिन्हे दिसत होती त्या त्या वेळी बिन्नीने त्यांना बाद केले व भारताला सामन्यावर पकड बसवून दिली.

उपात्य सामन्यात इंग्लंडच्या सलामीच्या जोडीने १६ षटकात ६८ धावा फटकाविल्या तेव्हा इंग्लड ३०० पर्यंत मजल मारणार असे वाटत होते; पण बिन्नीने ही जोडी फोडली व दोघाही आघाडीच्या फलंदाजाना १५ धावाच्या अंतराने बाद केले.

ऑस्ट्रेलियाविरुद्धचा शेवटचा साखळी सामना भारताच्या दृष्टीने फारच महत्त्वाचा होता. भारताने प्रथम फलंदाजी करून फक्त २४७ धावा जमविल्या होत्या; पण बिन्नीने ऑस्ट्रेलियाच्या वूड, यॅलप व किम ह्यूजच्याऐवजी कर्णधारपद सभाळणाऱ्या डेव्हिड हूक्स याना धडाधड बाद केले व ऑस्ट्रेलियाची घसरगुडी उडवून दिली. या सामन्यात ८ षटकात २९ धावाच्या मोबदल्यात त्याने ४ बळी घेऊन 'मॅन ऑफ द मॅच' किताब पटकावला!

बिन्नी हा भारतीय गोलदाजामध्ये अर्थात प्रभावी गोलंदाज ठरला त्याने सर्वाधिक म्हणजे १८ गडी बाद केले.

फलदाजीतही बिन्नीने बऱ्यापैकी कामगिरी केली. झिम्बाब्वेविरुद्धच्या साखळी-सामन्यात त्याने कपिलदेवबरोबर १४ षटकात ६० धावाची भागीदारी केली व त्यात २२ धावाचा वाटा उचलला.

मदनलालनेही आपल्या अष्टपैलू खेळाची चमक दाखवून पिली ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात ४ तर झिम्बाब्वेविरुद्धच्या दोन्ही सामन्यात त्याने प्रत्येकी ३ बळी मिळविले. त्याच्या एकूण बळीची संख्या बिन्नीच्या खालोखाल म्हणजे १७ इतकी भरली.


वेस्ट इडीजविरुद्धच्या अतिम सामन्यात त्याने हेन्स, गोम्स व जगातील एक अत्युत्कृष्ट फलदाज व्हिव्हियन रिचर्डसला बाद करून वेस्ट इंडीजचे कंबरडेच मोडले! अतिम सामन्यातील रिचर्डसची विकेट हा मदनलालच्या विश्वचषकातील कामगिरीचा कळस मानावा लागेल! संधूनेही ८ बळी घेऊन आपला वाटा उचलला.

रवी शास्त्री व कीर्ती आझाद या भारताच्या फिरकी गोल-

पृष्ठ २१ वर

# कुंपण आणि आकाश

## मंगला गोडबोले



सुखी माणसाच्या सदऱ्याविषयी आपण फार जुन्या काळापासून ऐकत आलोय. सुखी स्त्रीच्या साडीचोळीविषयी किंवा तसल्याच एखाद्या वस्त्राविषयी कुठे काही लिहिल्या-वाचल्याचं मात्र स्मरत नाही. कदाचित असं असेल की, जुन्या काळात या शोधाची गरज वाटली नसेल आणि आधुनिक काळात तितका हुरूप माणसांमध्ये राहिला नसेल. नाही तरी स्त्रीच्या सुखाच्या बाबतीतल्या विचाराचा लंबक कधी हे टोक गाठतो तर कधी ते ! बाईचं सुख ? तिला दुःख आहेच कुठे ? हा युक्तिवाद एकीकडे आणि 'आपल्या सांस्कृतिक सामाजिक संदर्भात बाईला सुख मिळणे मुळी शक्यच नाही' ही नकारघंटा दुसरीकडे. खरं म्हणजे या दोन टोकांमध्येच स्त्री-जीवनाच्या अमर्याद शक्यता, संदर्भ, सामर्थ्य आणि मर्यादाही वसती करून असतील. थोडक्या सहानुभूतीनं, समजूतदारपणानं त्या शोधायला मात्र हव्यात.

वास्तविक पाहता मानवी सुखदुःखांचे ठोकताळे, गणिती पद्धतीनं मांडता येत नाहीत, तसे ते मांडूही नयेत. तरी सुद्धा शक्य तितक्या पूर्वग्रहविरहित दृष्टीनं स्त्रियांच्या जीवनाकडे बघताना जाणवलेल्या काही व्यक्ती आणि वृत्ती पंधरा दिवसांनी येणाऱ्या या सदरात डोकावून जातील.

ती मला आवडते.

वास्तविक एकेरी उल्लेख करावा इतकी तिची–माझी जवळीक नाही. वयानंही ती माझ्यापेक्षा चांगली आठ–दहा वर्षांनी मोठी असावी; पण तिच्याबाबतीत ही अंतरं जाणवत नाहीत एवढं मात्र खरं. वयाची पुटं तिच्या देहावर आणि मनावर चढलेली नाहीत हे एक कारण आणि दुसरं याहून महत्त्वाचं म्हणजे तिनं तिचं आयुष्य, गृहिणीपण कधी लपवलंही नाही आणि कधी मिरवलंही नाही.

इकडे पुण्यात बदली होऊन ती आमच्या कॉलनीत राहायला आली त्याला जेमतेम दोन वर्षं झाली. त्यातले पहिले दोन–तीन महिने तिला तिच्या संसाराची घडी बसवायला लागले. नंतरचे दोन–तीन महिने आमच्यातल्या शहरी तुटकपणाची घडी मोडायला लागले. मग येता–जाता पुसट हसणं, मग 'कसं काय'ची तशी निरर्थक पण तरीही उबदार देवघेव, मग पोस्टमननं चुकून एकमेकींकडे टाकलेली पत्रं स्वगृही पोहोचवण्याच्या निमित्तानं पाच मिनिटं डोकावणं...या कूर्मगतीनं ओळख पटायला किती काळ लागला असता कोणास ठाऊक; पण तेवढ्यात ती घटना घडली.

आमच्या कॉलनीतल्या एका मोलकरणीला तिनं धुणंभांड्यांचं काम दिलं होतं; पण महिन्याभरातच तिनं तिला कामावरून काढलं. कारण ? ही मोलकरीण वेळी–अवेळी केव्हाही तिच्याकडे कामाला जायची. मोलकरणीला इतरही बरीच कामं होती. माझ्यासारख्याच तिच्या आणखीही चार–पाच मालकिणी नोकरी–व्यवसायानिमित्त ठराविक वेळी घराबाहेर पडणाऱ्या होत्या. मोलकरणीला त्यांच्या वेळा सांभाळाव्या लागत होत्या. त्यामानानं ही काय सर्व वेळ घरीच असणारी. हिच्याकडे कामाच्या वेळेचं बंधन का असावं ?

मोलकरणीनं माझ्याकडे येऊन पुष्कळ तणतण केली. तिचे पैसे बुडाले नव्हते, तिचा अपमान झाला नव्हता. फक्त तिच्या दृष्टीनं सर्व वेळ घरीच असणाऱ्या बाईनं कामाच्या ठराविक वेळाचा इतका आग्रह धरणं हा अन्याय होता. दिवसाकाठी केव्हा तरी काम झालं म्हणजे झालं. इतकी वर्षं इतक्या घरांमध्ये हेच नव्हतं का त्या मोलकरणीनं पाहिलेलं ? 'नव्या गावात असला आगाऊपणा करतीयास...कामाला मानूस म्हनून मिळनार न्हाई तवां समजल.' तिनं तळतळून शाप दिला.

समजायचंय काय ? दुसऱ्या दिवसापासून ही विक्षिप्त मालकीण स्वतःच भल्या सकाळी सगळी कामं करताना दिसायला लागली. तेही न कुरकुरता. सहानुभूतीनं कोणी तरी विचारलं तेव्हा म्हणाली, 'दमणूक नक्कीच होत्येय; पण निदान परावलंबित्व तरी नाही ! सबंध दिवस घरात असलं म्हणून काय झालं ? थोडा माझा, मला वेळ नको मिळायला ? दुपारी बारा ते चार मी माझी एकटीची असते. एकटीची, एकटीसाठी. नवऱ्याला, मुलांनासुद्धा त्या वेळेला धक्का लावू देत नाही, ते काय नोकराचं अतिक्रमण सोसू ?'

हे नवीन होतं किंवा फार तर नवीनपणाची सुरुवात म्हणू या. कारण पुढं अशा अनेक गोष्टी तिच्या वागण्या–बोलण्यात दिसायला लागल्या. हल्लीच्या भाषेत सांगायचं तर ती पूर्ण वेळ गृहिणी आहे. तिचं कुटुंब मोठं आहे. घरात आला–गेला बराच आहे. नवऱ्याची वरचेवर फिरती असते. त्यामुळं पोस्ट–बँक–विमा यासारख्या रूढ अर्थानं पुरुषी कामगिऱ्याही तिच्यावरच पडतात. ती हे सगळं करते; पण त्यात अडकत नाही हे सगळं आता ! एका क्षणापर्यंत तीही खूप गुंतली होती. लग्न, गर्भारपणं, बाळंतपणं, सासर–माहेरचं कौतुक, सणवार; पण यातला धोका तिला स्पष्टपणे जाणवला तो तिचं दुसरं मूल शाळेत पहिल्यांदा गेलं त्या दिवशी !

त्या दिवसाचं फार सुंदर वर्णन तिनं माझ्याजवळ केलंन्. क्वचित स्वतःबद्दल बोलणारी ती; पण ते सांगतानाही पुन्हा पहिल्यापासून जगत होती जणू काही. नवरा नोकरीत वाढत होता, मुलं वयानं–बुद्धीनं वाढत होती. वाढीच्या या आलेखात ही कुठं होती ? खूप त्रास झाला या कल्पनेचा. आत्मविश्वास लयाला गेला होता. चूल-मुलाची नाठाळ चाकोरी कंटाळवाणी वाटत होती. ती सोडवत नव्हती आणि ओढवतही नव्हती.

काय करावं ? शिक्षणाचा उपयोग म्हणजे फक्त नोकरी करणं असं मानण्याच्या

काळातही तिला नोकरी मिळत नव्हती. कारण तेव्हा तिचा नवरा एका आडगावी बिऱ्हाड थाटून होता. नोकरीखेरीज काय करावं ? लिहावं–वाचावं–शिवावं–विणावं–हस्तकला शिकाव्यात–ओरिगामी–बॉन्सॉय–चिनी खाद्यपदार्थ–तिनं पुष्कळ चाचपणी केली; पण नुसतंच करू–करू म्हणून काही होत नाही, काहीच न करता दिवसचे दिवस जातात हे तिच्या लक्षात आलं.

यासाठी मनाचं प्रशिक्षण हवं होतं. बाहेरचं कोणी जाब विचारणार नाही ना ? मग आपणच आपल्याला विचारू या. अमुक पुस्तक...? अमुक दिवसात वाचून झालंच पाहिजे ! त्यातलं काय आवडलं, काय नाही हे स्वतःपुरतं स्पष्ट झालं पाहिजे. तेच इतर गोष्टींबद्दल. गृहिणीचा फक्त स्वयंपाक वेळेवर झाला की, झालं हा प्रकार बंद. म्हणून १२ ते ४ वेळाची शिस्त.

या सगळ्याचा उघड फायदा काय ? तसं म्हटलं तर काहीच नाही. ना पाच पैशाची प्राप्ती, ना मानमरातबाची शक्यता. ऐहिक सुखसमृद्धी मोजता येते, बँकेतल्या आकड्यानिशी फुगत जाते. मनाची समृद्धी कशानं मोजायची ? अर्थात तिला अशी कुठलीच मापं, फूटपट्ट्या नको आहेत. ती उघड्या डोळ्यांनी जग बघते. कुठे खुट्ट वाजलं तरी तिचे कान टवकारलेले असतात. सगळ्या रूपरसगंधाचं आवाहन तिला जगण्याच्या प्रत्येक क्षणी होतं. शक्य तितकं ती ते आपल्या कुटुंबापर्यंत पोचवते.


वास्तविक एवढ्या बौद्धिक–मानसिक कुवतीमुळं ती कुठल्याही व्यवसायाचं सोनं करेल; पण तिला घर सोडून बाहेर पडणं कठीण आहे. ती नुसती घरात असणंसुद्धा आज तिच्या मुलांच्या दृष्टीनं अर्थपूर्ण आहे. जगात शिकण्यासारखं खूप आहे, माहिती मिळवण्यासारखं खूप आहे आणि तिच्यापाशी उदंड इच्छा आहे. पुन्हा कसलाही पोस्टल सर्टिफिकेट कोर्स, डिग्री, डिप्लोमा जिंकून घरातल्या भिंतींची शोभा वाढवायचा तिचा मानस नाही त्यामुळं एखाद्या विषयात मन रमलं तर ती दीर्घकाळ विहरू शकते, नाही रमलं तर 'इदं न मम' म्हणून पुढे सरकू शकते. मध्ये एकदा तर आश्चर्यच घडलं. दिवसभर ती नुसतीच खिडकीत बसून होती. काही न करता. विचारलं तर म्हणाली, असा पाऊस तरी कधी बघायचा ?

परवाच तिला एका नोकरीची ऑफर आली होती. कॉलनीत एक नवी शाळा निघत्येय. तिच्यासारखा लायक उमेदवार शोधूनही सापडणार नाही; पण आता तिचीच तयारी नाही. चार जास्त पैसे मिळाले तर तिलासुद्धा आनंदच वाटेल; पण त्यासाठी आज तिला जे मनःपूत स्वातंत्र्य, स्वायत्तता मिळते आहे, तिची किंमत देण्याची तिची तयारी नाही.

तिच्या घरानं हे सगळं कसं स्वीकारलं असेल ? मला जिज्ञासा होती. तिची ही वेळाची वाटणी घराच्या गैरसोयीचीच असणार; पण हळूहळू घरातली सवय झालीये म्हणे. इतकी की खुद्द तिचा नवराच अवेळी, न कळवता दौऱ्यावरून येणार असेल तर पोटपूजा करूनच घरात येतो. त्याच्या बदल्यात त्याला काय मिळतं ? तर जास्त समृद्ध सहजीवन. तो दौऱ्यावरून येतो तेव्हा त्या दोघांजवळही एकमेकांना सांगण्यासारखं खूप असतं. त्यानं खरोखरीचा प्रवास केलेला असतो, तिनं स्वतःच्या वाचनातून, प्रयोगातून निरीक्षणातून बराच फेरफटका मारलेला असतो.

आणि तिची मुलं ? एका अर्थानं ती सुखी आहेत. त्यांच्या मिनिट-सेकंदांच्या हालचालीवर नजर ठेवायला त्यांची आई रिकामी आहेच कुठे ? दुपारची ती शाळेत असली तर प्रश्नच नाही. सुट्टीत घरी असली तरी ती आपापली करमणूक स्वतः करून घेऊ शकतात. किरकोळ बाबींसाठी मुलांना आपल्यावर अवलंबून राहाण्याची सवय लावून आपलाच अहंकार फुलवणारी ती आई नाही. त्यामुळं किती लहान वयापासून तिची मुलं जबाबदारीनं छोटासा बाजारहाट करतात, महत्त्वाचे फोन–निरोप उतरवून घेतात. कधीपासूनच एकट्यानं कडेकडेनं हमरस्त्यावरून शाळेत जातात. मध्यंतरी एकदा असंच झालं, तिच्या मुलीच्या सहामाही परीक्षेत इतिहासाच्या पेपरात बाईंच्या हातून मार्कांची बेरीज चुकली होती. दुसऱ्या एखाद्या आईनं भर वर्गात जाऊन बाईंना जाब विचारला असता. मार्क बरोबर करून घेतले असते. हिनं ब्रिटिश कौन्सिलमधली इतिहासाची पुस्तकं आणून मुलीला वाचायला दिली. ती मला आवडते. ती नोकरी करणारी नाही, तरी बेकार नाही. ती अर्थार्जन करत नाही, तरी तिचं जिणं निरर्थक नाही आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या सगळ्याबद्दल तिच्या मनात कसलाही न्यूनगंड नाही. □





## आपली मुलं

पंधरा दिवसांनी येणाऱ्या या लेखमालेचा उद्देश बालमानसशास्त्र व पालक-शिक्षणात सांगितले जाणारे काही प्रयोग घराघरापर्यंत पोचवण्याचा आहे. स्वतःच्या अनुभवातून शिकत जाण्याची ही पद्धत आहे. सर्व पालकांनी यात सहभागी व्हावं अशी अपेक्षा आहे. त्याचबरोबर स्वतःच असे काही प्रयोग अवश्य कळवावेत. माणूसमधून त्याला प्रसिद्धी दिली जाईल.

# आपण मुलांशी बोलायला शिकू या !

शोभा भागवत

मुलं २।३ वर्षांची होती तेव्हाचं आठवतं. दोघं आपापसात भांडणं करून तक्रारी करायला आली की मी म्हणायची, बघू बरं, माझ्याकडे बघा दोघांनी. कोण खोटं बोलतंय मला डोळ्यात बरोबर दिसतं आणि खरं बोलणारं मूल डोळ्याला डोळा भिडवून पाहू शकायचं. खोटं बोलणारं हसू लागायचं, नाही तर गोरंमोरं व्हायचं. तो झगडा तिथेच मिटायचा. पुढे पुढे तर आपली बाजूच खरी आहे हे पटवण्याची घाई असलेलं मूल आपली चिमुकली अंगठ्याजवळची बोटं दोन्ही डोळ्यांच्या खाली ठेवून, डोळे ताणून मोठे करून म्हणायचं–'बघ माझ्या डोळ्यात मी खरं बोलतोय्.'

हा निरागसपणा नंतर मात्र रहात नाही. तो वेगवेगळी रूपं घेत जातो. आता ७।८ वर्षांची मुलं आपली बाजू हिरीरीनं मांडतात. चुकून समजण्यात चूक झाली, त्यांच्यावर आरोप केले तर दुखावतात. कधी कोण खरं कोण खोटं सांगतो आहे, कळेनासं होत. रुसवे–फुगवे होतात आणि मग मलाच म्हणावंसं वाटतं, खरं-खोटं मला ठरवता येत नाहीय्; पण माझ्या डोळ्यांत तुम्हा दोघांविषयी सारखंच प्रेम तरी दिसतंय ना तुम्हाला? रागवू नका बाबांनो!

ही आपलीच मुलं आपल्याला किती गोंधळवून टाकतात! लहानपणी वाटतं ही मोठेपणी कशी होणार आहेत, कोडंच पडतं. मोठी झाल्यावर कोडं पडतं, ही अशी का झाली? त्यांचे गुण, त्यांचे दोष हे आपल्या दोघांपैकी कोणाचे? आणि हे मिश्रण मजेशीर असतं. कधी आपण मुलगा वडलांसारखा, मुलगी आईसारखी असे शिक्के मारायला उत्सुक असतो. केवळ दिसण्याच्या बाबतीतच नाही तर स्वभावाच्या बाबतीतसुद्धा. लकबींच्या बाबतीतसुद्धा. वडलांसारखा धाडधाड पाय आपटत झपाझप इकडून–तिकडे जाणारा, धडाधड कपाटाची दारं लावणारा, वस्तू ठेवताना हमखास आवाज करणारा मुलगा मनात कुठं तरी आईसारखा हळवा असतो, प्रेमळ असतो. पुन्हा त्या प्रेमातही एखादी छटा वडलांच्या प्रकारच्या प्रेमाची असते. अर्थात आयाच प्रेमळ आणि हळव्या असतात आणि वडील धडपडे असतात असे मला शिक्के मारायचे नाहीत; पण एकदा मुलगा वडलांसारखा असं ठरवून आसपासची मंडळी त्याच्यावर विशिष्ट स्वभाव, वागणं आवडी–निवडी लादायला लागतात. तोही तसं अनुकरण करू लागतो आणि मुलाला स्वतंत्र व्यक्ती म्हणून वाढण्यात आपण अडथळे आणतो. मूल कसं आहे ते डोळसपणे शोधतच नाही.

आज आपण मुलाशी बोलतो, त्याच्याबद्दल जे बोलतो त्यातून तो स्वतःची प्रतिमा बनवत असतो. त्यामुळं आपलं मूल चांगलं व्हावं असं वाटत असेल तर फार जबाबदारीनं बोलायला आपण शिकलं पाहिजे. तसं आपण बोलत नाही.

हे समजून बोलणं, जबाबदारीनं बोलणं आपल्याला लहानपणापासून कधी शिकवलेलंच नसतं. आपल्या आजूबाजूच्या मोठ्या माणसांतसुद्धा विचारपूर्वक शब्द वापरणारी, निवडणारी माणसं क्वचितच आढळतात.

त्या अर्थानं आपण भाषा कधी नीट शिकतच नाही. काही वाक्प्रचार केवळ पुन्हापुन्हा कानावर पडले म्हणून तोंडात बसतात, काही आवडले म्हणून कुठेही वापरले जातात. अतिशयोक्तीनं बोलणारी माणसं तर हवी तेवढी असतात. हा जबाबदार बोलण्याचा परिणाम मनावर किती तरी होत असतो.

याशिवाय आपल्याला 'फणस' प्रकारच्या माणसांचंही फार कौतुक! बोलायला वाईट बोलणारा, हिडिस-फिडिस करणारा, ओरडणारा, रागावणारा माणूस मनातून मात्र फार चांगला आहे असं म्हटलं की, त्याचं बोलणं आपण माफ करून टाकतो. तो जर मनातून गोड आहे तर ती गोडी त्याच्या



जिभेवर का येत नाही ? तो एखादी कृती मधेच प्रेमळपणाची करत असेल; पण तो सगळा काही प्रेमळ नसणार. आपलं मन, आपले विचार, भावना, स्वभाव हे सगळं खरं तर चेहऱ्यावर, डोळ्यांतून दिसत असतं. मनात ओलावा नसताना गोड बोलणाऱ्या माणसाचं बोलणं मुखावत नाही. अंगावर शहारे आणतं. अत्यंत स्वार्थी माणूस वडिलकीचा आव आणून प्रेमानं बोलू लागला तर त्याचे शब्द रिकाम्या डबड्यासारखे खडखड खडखड करत मनावर चरे ओढत जातात. अप्रामाणिक माणसाची आश्वासनं वाऱ्याबरोबर उडत जाणाऱ्या कागदाच्या कपट्यासारखी दिसू लागतात. हे जर आपल्या वयाच्या निर्ढावलेल्या माणसांना चटकन् कळतं तर सगळ्या भावना, जाणिवा कोवळ्या, ताज्या टवटवीत असणाऱ्या मुलांना किती कळत असतील !


'फणस' प्रकारच्या माणसांना मुलंही मान्य करतात, सोडून देतात, समजून घेतात, माफ करतात; पण हा ताण मुलांवर का घालायचा ? मनातलं प्रेम, मनातली काळजी, आस्था, माया, स्वप्नं कधी तरी संताप, राग, जिद्द हे सारं जसंच्या तसं बोलायला आपण नाही का शिकू शकणार ? प्रयत्न केला तर जमेल हे.

पण मुलांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून वागवा हे फक्त पुस्तकात वाचतो आपण. त्याचा अर्थ कळतच नाही. मुलं तुमची गुलाम नाहीत, तुमच्या २५ वर्षांपूर्वीच्या शिळ्या लहानपणाविषयीच्या कल्पना त्यांच्यावर लादू नका, तुमची अपुरी स्वप्नं पुरी करण्याची ती माध्यमं नाहीत, तुमच्या महत्त्वाकांक्षा पुढं नेण्यासाठी ती जन्माला आलेली नाहीत. हे सारं वाचतो आपण आणि तरीही आपल्याला हवं तसंच वागतो का ?

कारण मुलं वाढवतानाच काय पण नवराबायकोनंसुद्धा एकमेकांशी वागताना स्वतःला बदलायची तयारी ठेवायची असते हे आपल्या मनात कधी रुजलेलंच नसतं. आपल्या आवडत्या माणसांसाठी स्वतःचे काही हेके सोडून देणं, मतं बदलणं, समंजस बनणं यातसुद्धा आनंद असतो. हे फार विकृतपणे फक्त बायकांवर आपण लादत गेलो; पण ते स्त्री-पुरुष सर्वांच्या मनात रुजवू शकलो नाही आपण. हे माणूसपण आहे हे आपण विसरतो म्हणूनच सून घरात येण्यापूर्वी तिच्यासाठीची चौकट घट्ट खिळे ठोकून तयार असते. त्यात ती बसली तर ठीकच, बसण्याचा प्रयत्न करण्याइतकी शहाणी, समंजस असली तर जिंकलीच; पण त्याविरुद्ध काही म्हणणारी असली तर ती वाईट !

आपल्याच मुलांच्या बाललीलांचं कौतुक करत असतानासुद्धा मुलांसाठी आपल्या काही चौकटी तयार असतात. चौकटी खुज्या असल्या तर मुलानं हातपाय दुमडून त्यात स्वतःला बसवावं अशी अपेक्षा असते. चौकटी मोठ्या असल्या तर हातपाय ताणून त्यानं त्यात लोंबकळावं अशी अपेक्षा असते. यापेक्षा आपण मुलांसाठी क्रॉसच का तयार ठेवू नयेत ? हात-पाय एकदा ठोकून टाकले खिळ्यांनी की काम झालं !

किती प्रकारच्या चौकटी असतात त्या ? आपण केलेल्या स्वैपाकाबद्दल मुलानं तक्रार न करता मुकाट्यानं जेवावं, तेसुद्धा आपल्याला त्यानं जेवढं जेवावं असं वाटतं तेवढंच जेवलं पाहिजे. आपण ठरवलेल्या कपाटात, ठरवलेल्या पद्धतीनं त्यानं कपडे, वस्तू ठेवल्या पाहिजेत, आपण आणलेल्या महागड्या खेळण्यांशी जपून खेळलं पाहिजे, आपण म्हणू त्याच मुलामुलींशी मैत्री केली पाहिजे, आपण म्हणू तेव्हा, घेऊ तो अभ्यास केला पाहिजे, आपण म्हणू तेव्हा आपल्याबरोबर बाहेर आलं पाहिजे, नको असेल तेव्हा घरात राहिलं पाहिजे, आपण म्हणू त्या माणसांना त्यानं वाटेला लावलं पाहिजे, आपल्या प्रेमाच्या माणसांशी नीट वागलं पाहिजे. अशा अनेक चौकटी ! आणि यालाच आपण वळण म्हणतो. संस्कार म्हणतो !



पण या सगळ्याबद्दल मुलाला काय वाटतं आपण विचारतो का ? विचार करतो का ? ओढाताणीच्या आपल्या जगण्यात खूप काही बदलण्यात येतं असं नाही; पण संधी मिळेल तेव्हा तरी मुलांचा आतला आवाज ऐकला पाहिजे, काही वेगळे, छान अनुभव त्यांना दिले पाहिजेत, मोकळा श्वास घेऊ दिला पाहिजे.

आपण आपल्याच चिंता, प्रश्न, काळज्या, व्यवधानं, आवडी यात इतके व्यग्र असतो की, मुलांचा हा आवाज ऐकूच येत नाही आपल्याला. शक्य तेवढा तो आपण मारून टाकतो आणि मग हीच मुलं मोठेपणी दुसऱ्याचा आवाज ऐकेनाशी होतात. दुसरीकडे मोकळं, धीट काही बोलायला असमर्थ बनतात. एका चुकीच्या वागण्यानं दोन मोठे दुर्गुण आपण मुलांत रुजवतो.

पण आपण तरी काय दुष्ट आहोत का

असं वागायला? आपल्याला खरंच कळत नाही कसं वागावं ते, कसं बोलावं ते. बाल-मानसशास्त्रज्ञ अनेक गोष्टी सांगतात, त्या पुरत्या कळतही नाहीत. आपल्या भाषेत समजेल असं कुणी काही सांगितलं, असं वागून पहा, प्रयोग करून पहा म्हटलं तर आपणही बदलू शकू. प्रयत्न करू.

बोलण्याबद्दल निश्चित काही प्रयोग आपल्याला करता येतील.

पहिली गोष्ट ऑर्डरी सोडणं कमी करणं, आज्ञा करणं कमी करणं. आपल्याला कोणी मनात नसताना एखादी गोष्ट करायला लावली, अपमानकारक बोलून करून घेतली तर आवडेल का? तसंच ते मुलांनाही आवडत नाही. त्यामुळं हे कर, ते कर, ते आण, तिकडे ठेव, इकडून उचल हे न म्हणता, जरा करतेस का? उचलून ठेवतेस का? प्लीज जरा ते दे रे असं आपल्याला म्हणता येईल का? म्हणून बघायचं.

धमक्या देणं सोडून देणं. कारण धमक्या पोकळ असतात हे मुलांना कळतं आणि अमुक केलं नाहीस तर तमुक घेणार नाही, जेवायला देणार नाही इ. धमक्या मुलांना क्षुल्लक वाटतात. नको देऊस असं त्यांनी म्हटलं की आपली काय किंमत राहिली? मग आपला अहंकार म्हणून नेटानं ती धमकी तडीला नेणं यात पुन्हा वातावरण गढूळच करतो आपण. तेव्हा अमुक करायला हवं आहे ते योग्य कसं आहे हे समजावून सांगणं जमेल का?

असं वागायचं नाही तसं वागलं पाहिजं, मित्रांना अजिबात घरी गोंधळ घालायला आणायचं नाही, खेळताना पसारा करून ठेवायचा नाही, अशा प्रकारच्या गोष्टींना काय म्हणायचं? अशा अटी घालणं म्हणू या. अशा घालू नयेत.

खेळताना पसारा झाला तरी चालेल; पण नंतर घर स्वच्छ ठेवलं की आपल्यालाच बरं वाटतं ना? म्हणून तो पसारा नंतर आवरायचा म्हणजे घर छान करायचं यावर भर दिला पाहिजे. पसारा आवर म्हणजे इतका वेळ, मूर्खपणा केलास तो निस्तर असं म्हणणं आहे, हा अपमान आहे.

समजा मूल दिवाणावरची चादर विस्कटून बसलं आहे. तो चादर सारखी करायची आहे. त्याबद्दल त्याला चार शब्द बोलून ऊठ



रे म्हणण्यापेक्षा आपण ही चादर नीट करू या का? म्हणणं जास्त ठीक होईल. मूल मदतही करेल. हे नेहमी जमेल असं नाही; पण प्रयत्न करू या असं बोलण्याचा. मुलांनी एखादी गोष्ट ठरवली आहे. ती घरातल्या कार्यक्रमाच्या दृष्टीनं गैरसोईची आहे, तर त्याला तू ती गोष्ट रद्द करून टाक असं उत्तर एकदम देणं बरोबर नाही. एकदा शनिवारी शाळेतून येताना मुलगी एका मैत्रिणीच्या घरी जायचं असं ठरवून आली. त्यांचं मैत्रिणी-मैत्रिणींचं ते पक्कं ठरलं होतं; पण घरात कुणी तिला पोचवायला नव्हतं. इतरही काही कार्यक्रम ठरले होते तेव्हा जाऊ नको म्हटल्यावर ती म्हणाली, 'मग तुम्हीच म्हणता ना एकदा सांगितलेलं मोडायचं नसतं म्हणून? मी नाही आता मोडणार!'

'ते बरोबर आहे; पण मोडावं लागेल असं काही एकदम ठरवू नये. विचार करून ठरवावं. आईला विचारून सांगते म्हणावं.'

'सगळं काय ग तुला विचारून ठरवायचं?'

'मला विचारून असं नव्हे ग; पण मला माहीत असतं घरात काही इतर ठरलंय का म्हणून. शिवाय आत्ता तू जाणार आणि संध्याकाळी लगेच परत येणार म्हणजे तुम्हाला पण खूप खेळता येणार नाही. उद्या दिवसभर सुट्टी आहे. उद्या येऊ का असं तिला विचार किंवा तिला आपल्याकडे बोलाव. मग खूप खेळा!'

'मग आज मी तिच्याकडे जाते, उद्या ती इकडे येईल.'

'तू आज घरात हवी आहेस ना, त्याचं काय?'

'मग आज ती इकडे येऊ दे, उद्या मी तिकडे जाईन.'

'हं चालेल मग. तिला विचार येते आहे का.'

अशा प्रकारे मैत्रिणीकडे जाणे या विषयावर त्या चिमुकल्या मुलींनी आपला स्वतंत्र मार्ग शोधून काढला याचं मला महत्त्व वाटलं तेव्हा कारणं न स्पष्ट करता मुलांना सल्ले देणं कमी केलं पाहिजे. मी हे कशासाठी म्हणतो किंवा म्हणते आहे हे सरळ शब्दात सांगता आलं पाहिजे.

नसते युक्तिवाद मुलांशी करू नयेत. भाषण देण्याच्या पद्धतीनं एखादा मुद्दा आपण स्पष्ट करू शकतो; पण तो पटेलच असं नाही. आपली विद्वत्तेची हौस त्यात भागेल; पण मूल कंटाळेल. तेव्हा अत्यंत तर्कसंगत वादसुद्धा घालू नये. त्यातून आपण मुलाला तू किती मूर्ख आहेस! ही साधी गोष्ट तुझ्या कशी लक्षात येत नाही हेच पटवून देतो, ते त्याला आवडत नाही. त्याचा अपमान होतो.

मुलाला वाईट विशेषणं देणं टाळलं पाहिजे. तू आळशीच आहेस, तू बावळटपणाच करतोस, हट्टी आहेस, इतरांची तुला पर्वा नाही, हावरट आहेस, दुष्ट आहेस असं म्हणू नये. मुलं हे शिक्के स्वतःवर मारून घेतात. हिरमुसली होतात. तसंच वागू लागतात. कधी त्या एखाद्या दुर्गुणाचाच गुण बनवून त्याचा अभिमान बाळगतात. मग मोठेपणी ती असं म्हणतात— 'मी आमच्या घरात हट्टी म्हणूनच प्रसिद्ध आहे. एकदा मला माझी मावशी रागानं बोलली. पुन्हा मी तिच्या घरात पाऊल ठेवलं नाही! ती गेली तेव्हा तिच्या घरी गेलो!' हा काय शहाणपणा म्हणायचा का?

मुलाच्या वागण्याचा आपण परस्पर

# आनंदाचे अनुभव

**लहानपण आठवलं की, अनेक सुखद आठवणी डोळ्यांपुढे येतात. आपल्या मुलांसाठी आपण अशा काही आठवणी देतो का ? त्या आठवून त्याचं मोठेपण सुखात जाईल अशा ? मुलाचं व्यक्तिमत्त्व समृद्ध व्हायच तर जाणीवपूर्वक पण कृत्रिमपणे नव्हे असे अनेक अनुभव मुलांना देता येतील त्याबद्दल पुढील लेखात...**

अन्वयार्थ लावून त्याच्यावर आरोप करू नयेत 'तू काय समजलास ? मी हे न कळण्याइतकी मूर्ख आहे काय ? तुला वाटलं असेल आपण आईला फसवू शकू...'

म्हणजे मुलाचा बिचाऱ्याचा आईला फसवण्याचा हेतू नसताना तो आरोप त्याच्यावर आपण करतो आणि आईला फसवण्याची एक शक्यताच त्याला दाखवून देतो.

मुलाची उलटतपासणी घेतल्यासारखे प्रश्न काही वेळा आपण विचारतो आणि त्याची उत्तरं कधीच लगेच मिळत नाहीत. मग काय रे मुखस्तभासारखा काय उभा आहेस, उत्तर दे, बोल, दातखीळ बसली का ? अशी मुक्ताफळं आपण टपाटप टाकतो. मुलाचा भरपूर गोंधळ करतो.

कित्येकदा मूल काय म्हणतं आहे हे पुरतं समजून न घेता आपण विषय बदलतो, हसून घालवतो, माघार घेतो. असं करू नये. कारण मुलाला आपल्याबद्दल मग विश्वास वाटत नाही. त्याच्या बोलण्यात आपल्याला रस नाही असं त्याला वाटतं आणि तो बोलेनासा होतो.

हे सगळं का टाळायचं ? कुणी तज्ज्ञ सांगतात म्हणून का ?

अशी कल्पना करू या की कुणी तरी आपल्याशीच असं बोलत आहे. अशा पद्धतीनं असा अपमान करून, दुर्लक्ष करून, आपल्याला तराजूत घालून बोलत आहे तर आपण काय करू ?

आपण गप्प बसू.

आपण वाद घालू.

आपण हिरमुसले होऊ.

आपला आत्मविश्वास ढळेल.

आपल्या आत्मप्रतिष्ठेला धक्का लागेल.

आपल्याला राग येईल.

आपल्याला अपराधी वाटेल.

आपल्यावर दुसऱ्याचा विश्वास नाही असं वाटेल.

आपल्याला कुणी समजून घेत नाहीय् असं वाटेल.

आपल्याला पुरतं बोलून देत नाहीत असं वाटेल.

आपल्याला काही समजतं असं याला वाटत नाही असं वाटेल.

आपल्याला कुणी तरी आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलंय् असं वाटेल.

आपण कुणाला आवडत नाही असं वाटेल.

असा जर परिणाम आपल्यावर होईल तर मुलावर त्याहून वेगळा होईल का ? उलट हे सारं आईवडलाबद्दल असल्यानं त्याचे फारच तीव्र परिणाम होतील.

म्हणून असं बोलणं टाळलं पाहिजे. शब्द हे शस्त्र आहे जपून वापरा म्हणतात; पण आपण तर आपल्या कोवळ्या पोरावर रोज हजारो वार करत असतो, याची जाणीव झाली की फार अस्वस्थ वाटतं.

मुलं आपल्याशी मोकळेपणानं बोलावीत असं वाटत असेल तर त्याचं म्हणणं ऐकायला आपण शिकलं पाहिजे. त्याला मान दिला पाहिजे. मग एखाद्या वेळी आपली छोटी मुलगी सांगते, 'आज तुमच्या मित्रांना जेवायला बोलवायचं नाही. मग तुम्ही त्याच्याशीच बोलत बसता आणि आमच्याशी मात्र बोलत नाही !' आपले डोळे खाडकन् उघडतात आणि ती चूक वेळीच सुधारण्याची संधी मिळते.

मुलाना स्वतंत्र व्यक्ती म्हणून वाढवायचं, वागवायचं झालं तर काही बंधनं पाळावी लागतात ती जीवनपद्धती बनवावी लागते. नेहमी आपल्याच मनासारखं वागता येत नाही. हवं तसं बोलता येत नाही.

बोलण्याबद्दलचे हे काही प्रयोग झाले. कसे जमतात बघू या आणि पुढच्या लेखात मुलाना काही आनदाचे अनुभव कसे देता येतील ते पाहू या. □


**दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल !
दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक
कथा-संग्रह संस्कारक्षम मुलाना अत्यंत उद्बोधक वाटेल.
इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपातर होते,
ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा
पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

—ग. रा. जाधव
(केसरी, रविवार, ६–१२–८१)

**आंबेडकर भारत**

लेखक : **बाबुराव बागुल**
**राजहंस प्रकाशन, पुणे.** मूल्य : २० रुपये.

## पुस्तके

# श्री. जं. चे आस्वाद्य जोशीपुराण '

'जोशीपुराण' हा श्री. श्री. ज. जोशी यांच्या अठरा लेखांचा नवा संग्रह वाचत असताना अधूनमधून त्यांच्या यापूर्वीच्या 'पुणेरी'ची आठवण येत होती; पण वाचून झाल्यावर जाणीव झाली की, फळ एकच असलं तरी दोन्हींची जात नि चव वेगळी आहे. 'पुणेरी'ची लज्जत पावमिसळी-सारखी होती, तर 'जोशीपुराण'ची चव पुरणपोळीसारखी आहे. गावठी शेंदरी आंबा आणि हापूस आंबा यात जो फरक तोच या दोन्ही पुस्तकांत आहे. आशा आहे की, जोशीबुवांना या दोन्ही उपमा आवडतील.

'जोशीपुराणा'तील अठराही लेखांचं स्वरूप आत्मकथनात्मक, गोष्टीवेल्हाळपद्ध-तीचं आणि काहीसं विचारगंभीर आहे. 'पुणेरी'सारखी या पुस्तकाची शैली हलकी-फुलकी, मिस्किल नाही, तर ललितगंभीर आहे मध्यमवर्गीय कौटुंबिक जिव्हाळ्याचं चिंब भिजलेली आप्तस्वकीयांची मुलखा-वेगळी शब्दचित्रं हा 'जोशीपुराणा'चा गाभा असून गेल्या पाउणशे-ऐंशी वर्षातील पुण्याच्या बदलत्या वाडासंस्कृतीचं प्रत्ययकारी चित्रण हे त्या गाभ्याचं करुणगंभीर असं बाह्य दर्शन आहे. जोशीबुवा पुण्यात लहानाचे मोठे झाले. अस्सल पुणेरी लेखक असा त्यांचा बरावाईट लौकिकही आहे. पुणे शहरावरील, विशेषतः नारायण–सदाशिव भागावरील त्यांचे प्रेम उदंड आहे. खरे तर या प्रेमापोटीच त्यांनी सश्रद्ध मनाने वाडासंस्कृती ते ओनरशिप फ्लॅट–संस्कृती या पुण्याच्या बदलत्या वाट-चालीचा एक सुरेख आलेख, विविध शब्द-चित्रे रंगवून आणि नानाविध आठवणी कथन करून 'पुराणा'त रेखाटला आहे. गोष्टीवेल्हाळ कथाकार जोशी यांची 'पुणेरी' आणि 'जोशीपुराण' ही दोन्ही पुस्तकं म्हणजे एकापरी नकळत लिहिलेली पुण्याच्या पार्श्वभूमीवरील आत्मकथाच म्हणावी लागेल.

अठरा लेखांपैकी 'शरदेरस्मृती' आणि 'धारा बहती है' हे दोन लेख इतर लेखां-पेक्षा वेगळे, म्हणजे 'वाडासंस्कृती' या पुस्तकाच्या वर्ण्यविषयाच्या कक्षेबाहेरचे आहेत. कलकत्त्यास शरदबाबूंच्या पावनवास्तू मोठ्या श्रद्धेने बघताना आलेले निराशा-जनक अनुभव पहिल्या लेखात वाचायला मिळतात, तर दुसऱ्या लेखात गंगादर्शनाने नि गंगास्नानाने पुलकित झालेल्या हिंदु-मनाची अवस्था लेखकाने भक्तिमानतेने वर्णिली आहे. पं. नेहरूंसारख्या विज्ञानवादी महान लेखकाला आयुष्याच्या अखेरीस गंगा-स्तवन केल्यावाचून राहवले नाही. जोशीबुवा तर काय बोलूनचालून सांवसदाशिवपेठी लेखक! तेव्हा काव्यात्म चिंतनिकेच्या पातळी-वर जावा असा 'धारा बहती है' हा लेख आहे. माझ्या मते संग्रहातील सर्वोत्कृष्ट.

बाकीचे लेख कुटुंबियांची शब्दचित्रे, पुण्यात पाहिलेल्या अनेक राजकीय–सामा-जिक घटनांच्या आठवणी, व्यक्तिगत आवडी-निवडींविषयीचे निरूपण इत्यादि विषयांना वाहिलेले आहेत. 'स्वातंत्र्य, राजकारण, क्रांती' हा अनुभवाधिष्ठित लेख अनेकांना ना. सी. फडक्यांच्या राजकारणातील उडीची आठवण करून देईल. नानूमामा, पंढरीनाथ आणि वृंदावनाच्या मामी हे तीन लेख म्हणजे मुलखावेगळ्या स्त्रीपुरुषांची सहानु-भूती वाटावी अशी सरस शब्दचित्रे आहेत. लेखकाला अभिप्रेत असणाऱ्या वाडासंस्कृतीचे खरेखुरे साक्षीदार म्हणजे ही शब्दचित्रं. 'सदाशिवपेठी संस्कृती' या लेखात झपाट्याने लोप पावणाऱ्या वाडासंस्कृतीचे उदासरम्य-दर्शन घडते. जुने वाडे, त्यातले हौद, विहिरी, पिंपळवृक्ष आणि पोरांची लेंढारे असणारी पांढरपेशी कुटुंबे–या सर्वांचे वर्णन करताना जोशीबुवांची लेखणी मोहरून येते. शैली-दृष्ट्या हा लेख उल्लेखनीय वाटतो.

'पुराणा'तील विशेष भावनोत्कट लेख म्हणजे पत्नी (सुखदुःखांची सहचारी) वृद्ध आजी (अल्बम) आणि आईवडील (माझ्या आईवडलांचा संसार) यांची मोकळ्या मनाने चितारलेली शब्दचित्रे. लौकिकदृष्टीला सामान्य वाटणारी लेखकाची पत्नी ही त्याच्या वाङ्मयीन यशापयशाची कशी अर्धां-गिनी आहे हे स्वतःकडे कमीपणा घेऊन जोशीबुवा कथन करतात. हा लेख 'पुराणा'त पहिला छापला आहे ते योग्य झाले. जगू नये इतके जिणे वाट्याला आलेल्या 'अल्बम'-मधील वृद्ध आजीची करुण मूर्ती दीर्घकाळ स्मरणात राहावी अशीच आहे. आईवडिलां-विषयी, विशेषकरून पंगू पण कर्तबगार वडिलांविषयी लिहिताना जोशीबुवांनी त्यांच्या रतिक्रीडेची उठाठेव केली नसती तर बरे झाले असते. लेख वाचनीय कर-ण्याच्या मोहापायी मुद्दाम काही चावट किंवा पुनरुक्तिपूर्ण किंवा पाल्हाळिक लिहिले पाहिजे असे नाही. काही लेखात असा फाजील मोकळेपणा आढळतो आणि त्यामुळे गंभीर विषयास तडा जातो. 'पुराणा'तील बाकी लेख पुणे–वर्णनपर म्हणजे स्तंभलेखन केल्यासारखे वरवरचे वाटतात. गांधीखुनाचे दिवशी घडलेल्या घरच्या 'एका लग्नाच्या हकिकती'त खुनाचे दिवशी सायंकाळीच खुनी व्यक्तीचे नाव पुणेकरांना कळल्याचा उल्लेख आहे, तो चुकीचा आहे. रात्री १० पर्यंत ही वार्ता कुणाला कळली नव्हती. 'पेपरस्टॉल' मधील केसरी ६५ साली दैनिक झाल्याचा उल्लेख असाच चुकीचा. ६२ साल हवे. 'जोशीपुराणा'सारख्या आत्मकथनात्मक; पण सामाजिक इतिहासा-त्मक पुस्तकात अशी वैगुण्ये अर्थात गाल-बोटासारखी आहेत. त्यांचे 'पुराण' निदान ३॥ टक्के समाजास आस्वाद्य वाटेल यात किमपि संशय नाही.

—म. श्री. दीक्षित

**जोशीपुराण**
श्री. ज. जोशी,
श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०,
मूल्य ३० रु.

## ग्रामदानाची प्रयोगभूमी
दुसरी आवृत्ती

ग्रामदानक्राती म्हणजे काय ? तिचे मार्ग कोणते ? कोरापुटमधील ( ओरिसा ) कार्याची माहिती करून घेतल्यामुळेच हे कळण्याजोगे आहे. श्री. माजगावकर यांनी याच दिशेने आपल्या पुस्तकात प्रयत्न केला आहे. हा उपयुक्त झाला आहे असे मला वाटते.

**– डॉ. धनंजयराव गाडगीळ**

ज्यात प्रत्यक्ष व्यवहार्यता आणि दूरगामी क्रातिकारक ध्येयवाद याची सांगड नाही, अशा प्रयोगाबद्दल महाराष्ट्रामध्ये जिव्हाळा उत्पन्न होत नाही. कोरापुटच्या प्रयोगाचे हे चिकित्सक दर्शन म्हणूनच मला उपयुक्त वाटते. समाजक्रातीचे ध्येय पुढे ठेवणाऱ्या सर्वांकडूनच या पुस्तकाचे स्वागत व्हावे असे मला वाटते.

**– दि. के. बेडेकर**

पुस्तक उत्कृष्ट. माहिती जमा करण्याची कसोशी, अवलोकन, त्यातून निष्कर्ष काढण्याची बुद्धी – सर्वच गुण यात दिसून येतात. पण याहीपेक्षा स्वतंत्रपणे चिंतन करण्याचे जे सामर्थ्य या लेखनात दिसून येते ते विशेष अभिनंदनीय आहे. मला पुस्तक वाचून अत्यंत आनंद झाला.

¤ **– डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे**

## श्रीग्रामायन
दुसरी आवृत्ती

माजगावकराचे हे पुस्तक प्रभावी आहे यात शंका नाही. विचार करणाऱ्या माणसाचे लक्ष ग्रामीण समस्याकडे वेधून घेण्याची फार मोठी कामगिरी ते करीत आहेत. हे करताना माजगावकराचे साहित्यगुणही विशेषत्वाने चमकतात. तजेलदार भाषा, स्फोटक वर्णन, भेदक उपरोध, नाट्यमय प्रारंभ व शेवट हे सगळे त्यात आहे. शिवाय मौलिक विचार आहेत, आणि शुद्ध भावकाव्यही कुठेकुठे आहे.

**– प्रा. स. ह. देशपांडे**

श्री. ग. माजगावकरांच्या पुस्तकाचे नाव असे आहे की, ते उघडण्यापूर्वीच एक क्षण वाचकाने जरा थबकावे –' श्रीग्रामायन ! ' माजगावकराना जे जे व्यक्त करायचे आहे त्याचा ' मर्मबंध ' म्हणजे हे नाव. स्वैर चिंतनात्मक लेख, मुलाखती किंवा मित्राशी पत्ररूप सवाद – अशा निरनिराळ्या अन् ललित शैलीची प्रसन्न डूब दिलेल्या माध्यमातून लेखकाने एक सूत्र गोवत नेले आहे. अशा विविध माध्यमामुळे काही वेळा माजगावकराचे लिखाण भरकटत गेले असले तरी त्याना जी एक बैठक माडायची आहे तिचा पक्केपणा कुठेही गेलेला नाही.

**– डॉ. विद्याधर पुंडलिक**

जीवनाची चाकोरी सोडून, पायपीट करून ग्रामीण प्रश्नाचे वेगवेगळे पैलू जवळून पाहण्याचा हा एक आगळाच प्रयत्न आहे. काही उपक्रमात पुढाकार व जबाबदारीही घेतलेली आहे.

¤ **– आबा करमरकर**

## निर्माणपर्व
( आगामी )

काही रचनाप्रयोग आणि संघर्षक्षेत्रे यांचा सहभागपूर्वक घेतलेला शोध – शहाद्याची चळवळ, म्हैसाळ, जयप्रकाश आंदोलन, ग्राहक चळवळ . . . . इत्यादी.

¤

## जनतापर्व
( आगामी )

आणीबाणी, दुसरे स्वातंत्र्य, जनता राजवटीची सुरुवात–शेवट.

¤

## बलसागर
( आगामी )

हिंदुत्व, भारतीयत्व, राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय पुरुषार्थ.

**पाच पुस्तके । प्रकाशनाच्या मार्गावर । श्री. ग. माजगावकर**

## विश्वकरंडक स्पर्धा : पृष्ठ १२ वरून

दाजांना मर्यादित यश मिळाले. त्यापैकी रवी शास्त्रीवर थोडा अन्याय झाला असे म्हणावे लागेल. वेस्ट इंडीजविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात त्याने ५.१ षटकात २६ धावांमध्ये ३ बळी मिळविले; पण ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या सामन्यात त्याला फक्त २ षटके देण्यात आली तर झिम्बाब्वेविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात फक्त १ ! फलंदाजीतही त्याचा नंबर वारंवार बदलण्यात आला व शेवटी ४ सामन्यांनंतर त्याला संघातून वगळण्यात आले. या प्रकारामुळे आपली कामगिरी दाखविण्याची पुरेशी संधी त्याला मिळू शकली नाही.

कर्णधार कपिलदेवने आपल्या आक्रमक व कल्पक नेतृत्वाने तर साऱ्या संघाला एक आगळे-वेगळे स्वरुप प्राप्त करून दिले. आपल्या सहकाऱ्यांमध्ये आत्मविश्वासाची, जिद्दीची व एकजुटीची भावना निर्माण करण्यात तो यशस्वी ठरला व त्याने विजयश्री खेचून आणली. झिम्बाब्वेविरुद्ध व इतरही सर्व सामन्यांत त्याने कर्णधाराला साजेसा खेळ केला. बळींच्या बाबतीत तो जरी फारसा सुदैवी ठरला नाही तरी त्याने १२ बळी मिळविले व अचूक गोलंदाजी केली व इतर गोलंदाजांचा कल्पकतेने वापर करून प्रतिपक्षास पेचात आणले.

झिम्बाब्वेविरुद्धचा सामना घ्या किंवा वेस्ट इंडीजबरोबरचा अंतिम सामना घ्या, भारताची परिस्थिती सामन्याच्या सुरुवातीच्या काळात फारशी समाधानकारक नव्हती; पण कपिलने खचून न जाता, आक्रमकतेने सामना लढविला व बाजी उलटविली !

गचाळ क्षेत्ररक्षण हे भारतीय कसोटी संघाचे आतापर्यंतचे वैशिष्ट्य होते; पण या वेळी प्रथमच भारतीय संघाने दृष्ट लागण्यासारखे क्षेत्ररक्षण केले. भारतीय क्षेत्ररक्षकांनी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात वाघासारखे क्षेत्ररक्षण केले असे गौरवोद्गार ब्रिटिश समीक्षकांनी काढले ! श्रीकांत व कव्हर्समध्ये यशपाल यांनी अनेक एकेरी धावा व चौकार अडविले व प्रतिपक्षास जेरीस आणले. भारतीय क्षेत्ररक्षकांनी वेस्ट इंडीज व झिम्बाब्वे यांच्या विरुद्धच्या प्रत्येक साखळी-सामन्यात दोन–दोन तर उपांत्य फेरीत इंग्लंडचेही दोन फलंदाज धावचीत केले. आपण सोडलेल्या झेलांची संख्या या वेळी नगण्य होतीच; पण काही अप्रतिम झेलही आपल्या क्षेत्ररक्षकांनी पकडले.

किरमाणीने डावीकडे झेप घेत घेतलेला इंग्लंडच्या गावरचा झेल तर कपिलदेवने अंतिम सामन्यात पकडलेला रिचर्डसचा झेल उत्कृष्टच होते !

भारताचा अनुभवी यष्टीरक्षक सय्यद किरमाणी याचे यष्टीरक्षण हा वेस्ट इंडीज दौऱ्यावर भारताच्या चिंतेचा विषय होता; पण विश्वचषकस्पर्धेत त्याने अप्रतिम यष्टीरक्षण करून सर्वोत्कृष्ट यष्टीरक्षकाचा बहुमान प्राप्त केला! झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्याच साखळी सामन्यात त्याने यष्टीमागे ५ झेल घेऊन विंडीजच्या मरेचा विश्वचषक विक्रम मोडला !


भारताच्या या स्पर्धेतील अप्रतिम क्षेत्ररक्षणामुळेच भारत लहान धावसंख्येच्या बळावरही प्रतिस्पर्धी संघांना चिवट झुंज देऊ शकला व शेवटी विजयी ठरला !

भारताच्या पहिल्या दोन चमकदार विजयांचे बहुसंख्य लोकांनी 'फ्लुक' समजून थंडेच स्वागत केले; पण या स्पर्धेतील ८ पैकी ६ सामने भारताने जिंकले व गमावलेले दोन सामने म्हणजे अपघात होता हे सिद्ध केले. आत्तापर्यंत वेस्ट इंडीजचा संघ विश्वचषक-सामन्यात अपराजित राहिला होता. १९७५ व १९७९ साली तो एकूण १० सामने खेळला व पावसामुळे अर्धवट सोडून दिला गेलेला एक सामना वगळता तो इतर सर्व सामन्यात विजयी ठरला ! या ९ सामन्यात एकदाही त्यांचे सर्वच्या सर्व गडी बाद होऊ शकले नव्हते !

भारताने या वर्षी एकदा नव्हे तर दोन वेळा वेस्ट इंडीजला पराभूत केले व तसे करताना दोन्ही वेळी त्यांचे सर्व गडी बाद केले ! पहिल्या साखळी–सामन्यात २२८ धावात तर अंतिम सामन्यात केवळ १४० धावात त्यांचा डाव आटोपला !

### प्रतिस्पर्धी संघांची कामगिरी

यंदाची विश्वचषकस्पर्धा भारताने जशी गाजविली तशीच काही प्रमाणात गाजविली ती झिम्बाब्वे व श्रीलंका या छोट्या राष्ट्रांच्या



यशपाल शर्मा – मधली फळी भक्कम !

संघांनी ! झिम्बाब्वे या १३ गोऱ्या खेळाडूंचा समावेश असलेल्या नवोदित आफ्रिकन संघाला तर अजून कसोटी–दर्जाही मिळालेला नाही; पण त्यांनी आपल्या पहिल्याच साखळी–सामन्यात ऑस्ट्रेलियाचा १३ धावांनी धक्कादायक पराभव करून मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या. भारताचीही त्यांनी दुसऱ्या साखळी–सामन्यात ५ बाद १७ अशी घसरगुंडी घडवून आणली; परंतु ऑस्ट्रेलियाबरोबरचा सामना सोडला तर इतर सर्व सामन्यात त्यांना हार पत्करावी लागली. क्षेत्ररक्षणात मात्र त्यांनी रसिकांची वाहवा मिळवली व आपल्या झुंजार खेळाने आपल्याला कसोटीदर्जा मिळावा या मागणीचा सक्रिय पुरस्कारच केला !

श्रीलंकेचा संघ आक्रमक फलंदाजांचा संघ म्हणून ओळखला जातो. डायस व मेंडीस हे तडाखेबंद फलंदाज भारतात येऊन गेले होते. या वर्षी वेस्ट इंडीजचा माजी कर्णधार व एक श्रेष्ठ अष्टपैलू खेळाडू गॅरी सोबर्स याने श्रीलंकेच्या संघाला विश्वचषकासाठी प्रशिक्षण दिले होते. मात्र या स्पर्धेत हा संघ दुर्दैवी ठरला ! जवळजवळ सर्व सामन्यात त्यांनी चमकदार फलंदाजीचे दर्शन घडविले. प्रतिस्पर्ध्यांच्या मनात धडकी भरविली; पण न्यूझीलंडविरुद्धचा ३ गडी राखून मिळविलेला विजय हा या स्पर्धेतील त्यांनी नोंदविलेला एकमेव विजय ठरला !

पाकिस्तानच्या संघाने आपल्या शेवटच्या साखळी–सामन्यात न्यूझीलंडचा पराभव केला व प्रत्येक षटकामागे जलद सरासरी धावसंख्येच्या आधारे न्यूझीलंडइतकेच गुण असतानाही उपांत्यफेरीत प्रवेश मिळविला. पाकिस्तानचा कर्णधार व जगातील एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू इम्रानखान याने पायाच्या दुखण्यामुळे या स्पर्धेत एकही चेंडू टाकला नाही. त्यामुळे पाकिस्तानची गोलंदाजी साफ निष्प्रभ ठरली व उपांत्य सामन्यात वेस्ट इंडीजने त्यांना ८ गडी राखून हरविले !

इंग्लंडचा संघ बऱ्याच काळपर्यंत आपल्या गटात अपराजित होता; पण शेवटी न्यूझीलंडने त्यांना एका साखळी–सामन्यात चकित केले. भारताशी उपांत्य फेरीत गाठ पडेपर्यंत इंग्लंड हा एक बलाढ्य संघ मानला जात होता व तो यंदाचा विश्वचषक जिंकणार असे इंग्लिश समीक्षक जीव तोडून सांगत होते; पण भारताने त्यांचा आरामात पराभव केला !

भारताविरुद्ध पहिल्याच साखळी–सामन्यातील धक्कादायक पराभवानंतर मात्र वेस्ट इंडीजचा संघ विश्वविजेत्याच्या रुबाबात खेळला व पुढचे सहाही सामने सहज जिंकून त्यांनी अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. त्यांचा जलद गोलंदाजांचा ताफा व ग्रिनिज, रिचर्डस्, लॉइड व गोम्स या फलंदाजांनी सनसनाटी खेळ करून अंतिम सामन्यापर्यंत धडक मारली खरी; पण भारताच्या अष्टपैलू खेळामुळे त्यांची दाणादाण उडाली !

झिम्बाब्वेचा कर्णधार डंकन फ्लेचर (ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या विजयामध्ये नाबाद ६९ धावा व ४३ धावात ४ बळी), इंग्लंडचा डेव्हिड गावर (श्रीलंकेविरुद्ध तडाखेबंद १३० धावा), वेस्ट इंडीजचा विन्स्टन डेव्हिस व रिचर्डस् (ऑस्ट्रेलियाविरुद्ध अनुक्रमे ५१ धावात ७ बळी व नाबाद ९५ धावा), ऑस्ट्रेलियाचा ट्रेव्हर चॅपेल व मॅकली (भारताविरुद्ध अनुक्रमे ११० धावा व ३९ धावात ६ बळी) या खेळाडूंनी साखळीस्पर्धा गाजविल्या; पण ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यापासून भारतीय खेळाडूंनी सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले व आपल्या जिद्दी व अष्टपैलू खेळाने स्पर्धेचा शेवटचा आठवडा गाजविला !

क्रिकेट खेळणाऱ्या आठ देशातील उत्कृष्ट क्रिकेटपटू या तिसऱ्या विश्वचषकस्पर्धेत खेळले. इतर सात राष्ट्रांवर मात करून भारतीय संघ इंग्लंडच्या प्रुडेन्शिअल ॲशुरन्स कंपनीने देणगी दिलेला हा चांदीचा चषक पहिल्यादाच भारतामध्ये आणत आहे !

**विश्वचषक स्पर्धा : भारतीय फलंदाजांची कामगिरी**

| फलदाज | एकूण डाव | नाबाद | धावा | उच्चांक | सरासरी |
|---|---|---|---|---|---|
| कपिलदेव | ८ | ३ | ३०३ | १७५* | ६०.६ |
| यशपाल शर्मा | ८ | १ | २४० | ८९ | ३४.३ |
| मोहिंदर अमरनाथ | ८ | – | २३७ | ८० | २९.६ |
| संदीप पाटील | ८ | १ | २१६ | ५१* | ३०.९ |
| के. श्रीकांत | ८ | – | १५६ | ३९ | १९.५ |
| मदनलाल | ६ | ३ | १०२ | २७ | ३४.० |
| रॉजर बिन्नी | ६ | – | ७३ | २७ | १२.२ |
| किरमाणी | ६ | १ | ६१ | २४* | १०.२ |
| सुनील गावसकर | ६ | – | ५९ | २५ | ९.८ |
| रवी शास्त्री | ५ | १ | ४० | १७ | १०.० |
| संधू | ४ | २ | २८ | ११ | १४.० |
| वेंगसरकर | २ | १ | ३७ | ३२ | ३७.० |
| | | (निवृत्त) | | (निवृत्त) | |
| कीर्ती आझाद | २ | – | १५ | १५ | ७.५ |

* = नाबाद

**विश्वचषक स्पर्धा : भारतीय गोलंदाजांची कामगिरी**

| गोलंदाज | षटके | निर्धाव | धावा | बळी | प्रत्येक बळीमागे सरासरी धावा | प्रत्येक षटकामागे सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|
| बिन्नी | ८८ | ९ | ३३६ | १८ | १८.७ | ३.८ |
| मदनलाल | ८३ | ८ | २८५ | १७ | १६.८ | ३.४ |
| कपिलदेव | ८४ | १३ | २४५ | १२ | २०.४ | २.९ |
| मोहिंदर | ४९ | २ | १७८ | ८ | २२.३ | ३.६ |
| संधू | ८३ | १० | २९७ | ८ | ३७.१ | ३.६ |
| शास्त्री | २०.१ | १ | ८७ | ४ | २१.८ | ४.३ |
| आझाद | १७ | १ | ४२ | १ | ४२.० | २.५ |
| एकूण* | ४३३.१ | ४४ | १५३१ | ६८ | २२.५ | ३.५ |

( * संदीप पाटीलनेही ९ षटके टाकून ६१ धावा दिल्या. )

४ जुलैला विजयी भारतीय संघाचे खेळाडू मायदेशी परत येतील तेव्हा त्यांचे विजयी वीरांना साजेसे प्रचंड स्वागत होईल यात काही शंका नाही. मग या विश्वचषक–विजयाबरोबरच यापुढील सर्व कसोटी सामन्यात विश्वविजेत्याच्या दर्जाचा खेळ करण्याची जबाबदारी भारतीय संघावर येऊन पडली आहे हे त्यांना विसरता येणार नाही !

---

## □ विश्वचषक .... विशेष

---

### उच्चांक

भारताला झिम्बाब्वेविरुद्ध ५ बाद १७ अशा हालाखीच्या स्थितीतून बाहेर काढून विजय प्राप्त करून देताना कपिलदेवने नाबाद १७५ धावा फटकाविल्या व न्यूझीलंडच्या ग्लेन टर्नरने १९७५ साली पूर्व आफ्रिकेविरुद्ध केलेल्या १७१ धावांचा विश्वचषक–उच्चांक मोडला ! आत्तापर्यंत कोणत्याही भारतीय खेळाडूने विश्वचषक स्पर्धेत शतकाचा पल्ला गाठला नव्हता !

### जलद शतक

विश्वचषक स्पर्धेत सर्वांत जलद शतक झळकविण्याचा मान इग्लंडच्या अॅलन लॅम्बने पटकाविला. त्याने न्यूझीलडविरुद्धच्या साखळी–सामन्यात १०२ मिनिटांत १०२ धावा झळकाविल्या. १९७५ मध्ये विंडीजच्या क्लाइव्ह लॉइडने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अंतिम सामन्यात १०८ मिनिटात १०२ चा पल्ला गाठला होता. उपांत्य फेरीच्या सामन्यात याच लॅम्बला यशपाल शर्माने यष्टीवर सरळफेक करून धावचीत केले, त्या वेळी त्याच्या फक्त २९ धावा होत्या !

### उच्चांक मोडला !

१९७५ साली भारताविरुद्ध २०२ धावानी दणदणीत विजय मिळविताना इग्लंडने ४ बाद ३३४ असा धावसंख्याचा उच्चांक केला होता ! यंदा मात्र पाकिस्तानने श्रीलंकेविरुद्धच्या आपल्या पहिल्याच सामन्यात ५ बाद ३३८ अशी धावसंख्या नोंदवून इग्लंडचा उच्चांक मोडला !

### योगायोग ?

विश्वचषकस्पर्धेतील भारतीय संघात गावसकरला घेतले जाई ते त्याला फलंदाजीसाठी की दुसऱ्याच काही कारणासाठी ? याचे उत्तर फक्त कपिलदेवच देऊ शकेल; पण गावसकरचा भारतीय संघातील समावेश भारताला या स्पर्धेत कमालीचा सुदैवी ठरला ! भारत विश्वचषकस्पर्धेत एकूण ८ सामने खेळला त्यापैकी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या सामन्यात व वेस्ट इंडीजविरुद्धच्या परतीच्या सामन्यात गावसकरला वगळण्यात आले (व त्याच्याऐवजी वेंगसरकर संघात आला) गावसकरच्या अनुपस्थितीत हे दोन्ही सामने भारताला गमवावे लागले ! उरलेल्या ६ ही सामन्यात गावसकर खेळला व भारताने कठीण परिस्थितीवरही मात करून सर्व सामन्यात विजयश्री प्राप्त केली !

### एकाआड एक

वेस्ट इंडीज व भारत याच्या दरम्यान मार्च १९८३ ते जून १९८३ या दरम्यान एकूण ६ मर्यादित षटकांचे सामने झाले. त्यापैकी ३ वेस्ट इंडीजमध्ये झाले तर उरलेले या विश्वचषकस्पर्धेत झाले. या सामन्यात भारताने एकाआड एक सामन्यात विजय प्राप्त केला. पहिल्या सामन्यातील पराभवानंतर गयाना येथील एक दिवसाचा सामना भारताने जिंकला तर तिसऱ्या सामन्यात तो पराभूत झाला. त्यानंतर झालेल्या विश्वचषकाच्या पहिल्या साखळी–सामन्यात भारताने वेस्ट इंडीजवर मात केली तर परतीच्या सामन्यात हार पत्करली. त्यामागोमाग झालेल्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताने वेस्ट इंडीजला नमविले व एकाआड एक सामने जिंकण्याची आपली परंपरा कायम राखली ! □


" मला शक्य असते तर मी या ग्रंथाच्या लाख प्रती काढून ग्रामीण भागातील मुलाबाळांच्या हाती पडतील अशी व्यवस्था केली असती. "
– कलकत्त्याहून **श्री. बा. जोशी**

' कार्व्हर ' पहिल्या आवृत्तीचे असे उत्फूर्त व भरघोस स्वागत झाले.

मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी शाळांसाठी – शिक्षणसंस्थांसाठी या ग्रंथाची शिफारस केली.

**दुसरी आवृत्ती प्रकाशित**

**एक होता कार्व्हर** सौ. वीणा गवाणकर

मूल्य : तीस रुपये । सवलत मूल्य : बावीस रुपये
नजीकच्या विक्रेत्यांकडे मागणी करा.
ठराविक प्रतीची विक्री होईपर्यंतच सवलत चालू.

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव, पुणे ३०

# नाट्यपंढरी

## सतीची ओटी भरायला तोबा गर्दी !


विष्णुदास भावे स्वत: आपली नाटके घेऊन पुणे, मुंबई, कोल्हापूर, नगर अशा प्रमुख शहरात फिरत. त्यांच्या या स्वाऱ्या-दौरे दहा बारा वर्षे चालू होते; पण सहकारी मंडळी ही अशिक्षित असल्याने त्यात फाटा-फूट झाली नि दौरे थाबले. परंतु विष्णुदासाच्या नाटकांना तुफान लोकप्रियता लाभली होती. विष्णुदासांची कुलपरपरा पुढे वीस-पंचवीस वर्षं निरनिराळ्या नाटक-मंडळ्या चालवीत होत्या. विष्णुदासाची पौराणिक नाटके हेच त्याचे मुख्य भांडवल होते. ज्याला आज आम्ही 'पथनाट्य' म्हणतो, तेच विष्णुदास सुरुवातीला करीत होते. रस्त्यात, वाड्याच्या आडोशाला, वळचणीला नाटके उभी करीत होते. त्यांच्याच चिकाटीने, सतत प्रयत्नाने तेच नाटक थिएटरपर्यंत पोचले. शिष्टसंमत झाले. लोकमान्य झाले, लोकप्रिय झाले.

मूहूर्ताचा नारळ फुटला, कंपनी कधी फुटणार ? हा गडकऱ्यांचा सुप्रसिद्ध विनोद क्षणभर बाजूला ठेवू; पण कंपन्या फुटल्या, नव्या कंपन्या निघाल्या म्हणूनच ना नवी नवी नाटके नि नवे नवे कलाकार उदयास आले ? सागलीकर, आळतेकर, कोल्हापूरकर, इचलकरंजीकर अशा एकाहून एक किती तरी संस्था सुरू झाल्या. प्रत्येकीचे काही ना काही वैशिष्ट्य होतेच; पण मूळ विष्णुदासी नाटकच होते. भाव्यांची पौराणिक नाटके सर्रास सगळ्या नाटकमंडळ्या करीत होत्या. त्या वेळी 'मोनापली' नव्हती. काहीजण त्याच्या नाटकाची मोडतोड करीत होते. काही अधिक चांगले घालीत होते. उत्तम खेळ करीत होते. नवी जडण-घडण होत होती मलिन मागे टाकीत, चागले घेत घेत ही विष्णुदासांची नाट्यगंगा अखंड वाहात होती.

मग इंग्रजी विद्येचा सुकाळ झाला. पाश्चात्य नाटके विद्वानांना पहायला मिळू लागली. संस्कृत नाटके भाषांतरित होऊ लागली. चागली भाषा, विनोद कानावर पडू लागला. उत्तम अभिनयाची जाण आली. नटांना विद्वानाचा सहवास लाभला नि मग 'अलल डुर्रं ऽऽ' नि 'तगडतोम्' नाटकांना ओहोटी लागली. ( अलल् डुर्रं ऽऽ म्हणजे भावेकालीन नाटकात राक्षसपार्टी आलाला... असे ओरडत स्टेजवर येई. त्याची चेष्टा करण्यासाठी, तो 'आलाला' असे ओरडला की विदूषक त्याच्या मागून डुर्रं ...... असे ओरडे. 'तगडतोम्' म्हणजे राक्षसाच्या आरोळ्यांना 'तगडतोम् तगडतोम्' अशी पखवाजावर केलेली जोरदार साथ. या प्रकारामुळेच सुशिक्षित मंडळी या नाटकांचा उल्लेख अलल् डुर्र...नि तगडतोम् नाटकं असा करीत ) 'बुकिश' नाटकांचा जन्म झाला बुकिश म्हणजे ज्याचे बुक-पुस्तक तयार झाले, छापून प्रसिद्ध झाले असे नाटक. कारण पूर्वीच्या नाटकांची संहिता नसे, पुस्तक नसे. पहिले बुकिश नाटक रंगभूमीवर आले ते श्री. वि. अ. कीर्तने यांचे 'थोरले माधवराव पेशवे' इचलकरंजीकर मंडळींच्या रंगभूमीवर ! ( १८६१-६२ ).

या नाटकात श्रीमंत माधवरावांच्या निधनानंतर रमाबाई सती जातात असा प्रवेश आहे. त्या प्रवेशात श्रीमंत रमाबाई पांढरे वस्त्र परिधान करून, कपाळी कुंकवाचा मळवट भरून, केस मोकळे सोडून सती जाण्यासाठी प्रवेश करतात. काही स्त्रिया तिची खणानारळाने ओटी भरतात. अर्थात त्या काळी रमाबाई हा एक स्त्री पार्टीच होता. नि ओट्या भरणाऱ्या स्त्रियाही पुरुषच होते; पण त्या कंपनीच्या चालकांनी एका प्रयोगात रमाबाईची ओटी भरण्यासाठी गावातल्या थोरामोठ्यांच्या काही प्रतिष्ठित बायकाना पाचारण केले. सीन सुरेख रंगला; मग काय विचारता ? पुढच्या प्रयोगापासून सतीच्या दर्शनाला नि ओट्या भरायला स्त्रियाची तोबा गर्दी नाटकाला होऊ लागली. स्टेजवर गव्हा-तादळाच्या नि खणा-नारळाच्या राशी पडू लागल्या! हाच प्रवेश दोन दोन तास चालू लागला! बिचारी रमाबाई (विष्णू वाटवे हा स्त्रीपार्टी रमा होत असे) मात्र पार अवघडून आणि दमून जात असे! साताऱ्च्या श्रीमत सगुणाराणीसाहेबांनी हा खेळ खास आपल्या राजवाड्यात करवून श्रीमत रमाबाईची गव्हाबरोबर मोती घालून ओटी भरली! वस्त्रालकार दिले. रमा हा पुरुष आहे ही भावनाच नाहीशी झाली, इतके सुरेख काम विष्णु वाटवे करीत असे!

वाटवे फार देखणा होता. त्याची खुद्द राणीसरकारानी ओटी भरली. म्हणून त्या वेळेपासूनच पुढे 'भाऊराव कोल्हटकर, नारायणराव बालगंधर्व हे हळदीकुंकू घेऊन आले; पण त्याना कुणी ओळखले नाही. या सारख्या दंतकथा प्रचारात आल्या. आजही काही जुनी मंडळी या गोष्टी मोठ्या चवीने सांगत असतात; पण त्याचे मूळ त्या गुणी कलावंताविषयी अपार प्रेम नि विष्णुपंत वाटव्याच्या हळदीकुंकवाच्या सीनमध्येच असावे.




मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

सांगत्ये ऐका

चौथी आवृत्ती प्रसिद्ध झाली.

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

# चंदेरी दुनियेतील संन्यस्त कलावंत

चित्रपटसृष्टीची चंदेरी झगमग दुरून नेहमीच डोळे दिपविते; पण सुमारे पन्नास वर्षांपेक्षा जास्त काळ या दुनियेत डोळसपणे वावरणाऱ्या नाना पळशीकरांसारख्या ज्येष्ठ अभिनेत्याला हे विश्व कसं दिसतं ? इथल्या भूल-भुलैय्यांमध्ये तो का रमतो ? त्यातून बाहेर कसा पडतो ?

गेल्या वीस मे रोजी वयाची पंचाहत्तर वर्षे पूर्ण केलेल्या नानांना हे सारं जाणून घेण्यासाठीच भेटलो. या भेटीतून आकार घेतलेलं नानाचं हे हृदगत !

सतीश जकातदार । सतीश कामत

काही माणसंच अशी असतात की, पहिल्या भेटीतच, तुम्ही त्यांना यापूर्वीही अनेकदा भेटला आहात, गप्पांच्या तासन्तास मैफिली रंगल्या आहेत, एकमेकांच्या सुख-दुःखाचे तुम्ही याआधीही अनेकदा वाटेकरी झाला आहात आणि आजची भेट ही या अशाच आनंद-सोहळ्यापैकी एक आहे, असं तुम्हाला वाटायला लागतं. ख्यातनाम चित्रपट अभिनेते नाना पळशीकर हा याच पट्टीतला पंचाहत्तरी उलटलेला सन्यासी आहे !

मुंबईतल्या त्यांच्या निवासस्थानी आम्ही गेलो तेव्हा निळ्या चौकड्याची लुंगी आणि मलमलची बंडी अशा अतिशय घरगुती पोषाखात नाना वावरत होते. त्यांनी आम्हाला शेजारच्या खोलीत बसायला सांगितलं. खोली कसली, मोठा हॉलच होता तो ! हॉलच्या मध्यभागी मोठा लाकडी पलंग. त्याच्या शेजारी टी-पॉयवर काही वर्तमानपत्रं, जेम्स हॅडली चेस, नानाचा चष्मा आणि पान तंबाखूचं चवदार साहित्य अशा विविध गोष्टी गुण्या-गोविंदानं नांदत होत्या. डाव्या हाताला एका कपाटात उत्कृष्ट अभिनयाबद्दल नानांना मिळालेल्या ट्रॉफ्या दिमाखात उभ्या होत्या. त्याच्यावर नानाच्याच फोटोची तसबीर लटकत होती. धारदार नाक, डोळ्यावर पातळ काचेचा चष्मा, पीळदार मिशा आणि अंगात सूट असं नानाचं त्या तसबिरीतलं संस्थानिकी थाटाचं रूप समोरच्या आणि शेजारच्या भिंतीवर अशाच तसबिरींच्या चौकटीत पकडलेल्या नानांच्या दोन भणंग रूपाकडे तुच्छतेने पाहात होतं ! एका चेहऱ्यावर ताठरपणा, करारीपणा, खानदानीपणाही, तर दुसऱ्या दोन चेहऱ्यावर असहायता, अपराधीपणा आणि लाचारी ! नानाची अभिनयसंपन्नता सिद्ध होण्यास त्या तीन तसबिरीही पुरेशा समर्थ होत्या.

आम्ही हे सारं न्याहाळत असतानाच नाना आले. पलंगावर आरामशीरपणे बसले आणि म्हणाले, 'हां, बोला आता ! पण अरे हो, तुम्हाला काही गार पाणी वगैरे ? ऊन फार आहे !'

आम्ही हो म्हटलं आणि स्वतःच पाणी आणायला उठू लागलो, पण आम्हाला पुन्हा बसवत नाना म्हणाले, 'थांबा, थांबा, मीच आणतो. हे संन्याशाचं घर आहे !'

आणि एवढं बोलून तो संन्यासी ताडताड आतमध्ये गेला व फ्रीजमधली पाण्याची बाटली घेऊन आला. टी-पॉयवर बाटली ठेवून नानांनी पुन्हा पलंगावर बैठक मारली. आमच्या गप्पा सुरू झाल्या.

'आजपर्यंत मी स्वतःबद्दल फारसं कधी बोललेलो नाही. जे काही बोललात ते तुम्ही पत्रकारमंडळीच बोललात. मी माझ्या पन्नास वर्षांच्या चित्रपट-कारकीर्दीबद्दल सांगायचं तर नेमकी सुरुवात तरी कुठून करणार ? पण मला आठवतं त्याप्रमाणे तो १९३० चा सुमार होता. त्या वेळी देशभरात राष्ट्रीय चळवळीचे वारे वाहात होते. मोठमोठ्या राजकीय नेत्यांच्या भाषणांनी वातावरण ढवळून निघालं होतं. लहानशा गावात एखादी मोटार आली की, पोरं जशी तिच्यामागे पळतात, तसे आम्ही नागपूर-भंडाऱ्याचे तरुण या राजकीय नेत्यांमागे धावत होतो. स्वतःला कार्यकर्ते म्हणवत होतो. काँग्रेसच्या सभा अधिवेशनांमध्ये राबतही होतो. त्यामुळे त्या वेळच्या सर्व मोठमोठ्या नेत्यांना जवळून बघण्याची संधी मला मिळाली. त्यांची भाषणं ऐकण्याचा तर छंदच जडला होता.

'महात्मा गांधींनी मिठाचा सत्याग्रह पुकारला. साहजिकच देशासाठी आपणही काही तरी केलं पाहिजे, या भावनेतून मीही त्यामध्ये सहभागी झालो. अटक झाली आणि चांगला दोन वर्षांचा तुरुंगवास घडला.

'तुरुंगातून बाहेर पडलो. कौटुंबिक जबाबदारीचं ओझं जाणवू लागलं दारिद्र्याचे चटकेही बसू लागले कसंही करून चरितार्थ चालवण्यासाठी एखादा उद्योग शोधणं आवश्यक होतं. मला नकला करण्याची, अभिनयाची आवड होती; पण त्याच्यावर पोट कसं भरावं, हा प्रश्न होता. याच वेळी नागपूरच्या गोपाळ सिनेटोनच्या एका मूकपटात—'राजदंड' त्याचं नाव— मला एक विनोदी भूमिका मिळाली त्यावेळी चांगली दोनशे कलावंतांची चाचणी घेण्यात आली आणि त्यातून माझी निवड झाली चित्रपट निघाला; पण त्याने मला फारसं यश दिलं नाही.

'मग त्या वेळच्या बाबुराव पै व इतर मित्रांनी मला मुंबईला जाण्याचा सल्ला दिला. एव्हाना ध्वनीचं आगमन झालं असल्याने चित्रपट हा कलाप्रकार नव्याने आकार घेत होता. 'तुझ्याकडे अभिनयाचं अंग आहे, बघ, काही जमतं का ?' असं त्यांनी सांगितले. आणि आमची गाडी मुंबईला निघाली.

'मुंबईत येऊन पोचलो; पण पहिली एक-दोन वर्षं रखडतच होतो.



या काळात कुठे भालजी पेंढारकरांकडे पत्र टाक, तर कुठे एखाद्या स्टुडिओत चक्कर मार, असं चालू होतं. 'प्रभात' मध्येही खूप खटपट केली; पण आम्हीच कमनशिबी ठरलो. कुठे नकलांचा कार्यक्रम कर, ग्रामोफोन कंपनीसाठी गाणी म्हण, असं काही तरी धडपड करून पोट भरत होतो; पण अभिनयाचं काही जमत नव्हतं!

'१९३३-३४ ची गोष्ट असेल. पुण्याच्या 'केसरी'त एका चित्रपटासाठी सुशिक्षित टॅलेन्टेड तरुण पाहिजेत अशी जाहिरात आली होती. खडा टाकायचा म्हणून अर्ज खरडला आणि चक्क ट्रायलला बोलावणं आलं. ट्रायल झाली. मंडळी बेहद्द खूष ाली. सेठ गोविंददास आणि द्वारकाप्रसाद मिश्र हे कॉंग्रेस चळवळीतील नेते तो चित्रपट काढत होते. चित्रपटाचं नाव होतं, 'धुवांधार!' त्यांनीच मला विचारलं, 'कुणी चांगली, सुशिक्षित नटी आहे का?' तेव्हा मी लीला चिटणीसचं नाव सुचवलं. तिच्या नवऱ्याची परवानगी वगैरे भानगडी होऊन चित्रीकरणाला सुरुवात झाली.

'गोंड लोकांच्या जीवनावरील या चित्रात लीला चिटणीस नायिका होती आणि मी दुय्यम नायक बनलो होतो. या चित्रपटाचा दिग्दर्शक होता सुकुमार चटर्जी. पिक्चर कंप्लीट झालं आणि आमच्या सिनेजीवनाला जरा गती आली; पण 'धुवांधार' केवळ सहा आठवडे चालला आणि मग पुन्हा आमची रखडपट्टी चालू झाली.

'तरीही एक होतं– हा नाना पळशीकर उपाशी उठला असेल; पण उपाशी कधी झोपला नाही. त्या काळी सर्वचजण चित्रपटमाध्यमाकडे कुतूहलाने बघत होते. काही जाणते त्याला आकार देण्याच्या प्रयत्नात होते. मी त्यांच्याशी जवळीक करण्याचा प्रयत्न केला. बाबूराव पेंटराकडे मी जात–येत होतो. अशातच विष्णुपंत औंधकरांशी ओळख झाली. 'सावकारी पाश' मुळे परिचित असलेले औंधकर त्या वेळी कथाही लिहीत व चित्रपटात कामंही करत. मी त्यांचा सहकारी म्हणून काही दिवस काम केलं तिथे मात्र मला चित्रकथेचा खरा आत्मा कळला आणि अभिनयाचीही चांगली ओळख झाली. 'पुकार', 'उमाजी नाईक' व 'भरतभेट' या चित्रपटांच्या कथा–पटकथा लिहिताना मी बाबुरावांना सहाय्य केलं. मला आठवतं, सोहराब मोदींच्या 'पुकार' या चित्रपटाच्या पटकथेबद्दल औंधकरांना आठशे रुपये, तर मला दोनशे रुपये मेहनताना मिळाला होता. त्या पैशात मी दोन सदरे आणि एक फाउन्टन पेन घेतलं.'
□

औंधकराकडून चित्रपटाचे मंत्र व तंत्र शिकणारे नाना अभिनयाचा प्रांत सोडून काहीसे सैरभैर भटकत होते. याच काळात नानांचा चित्रपट–माध्यमाचा व्यासंग वाढत होता; पण अभिनयाची संधी काही मिळत नव्हती. उदंड आत्मविश्वास आणि अंगभूत चिवटपणा यामुळे ते चित्रपटक्षेत्रात वावरत होते इतकेच. याच काळात नानांनी पत्रकारितेतही हात चालवून पाहिला. राजकीय विचारसरणीचं 'सावधान' नावाचं साप्ताहिक ते प्रकाशित करीत होते. म्हणूनच 'I am a vagabond child of journalism', असं नाना आजही म्हणतात. पुन्हा एकदा राजकारणाशी संबंध आल्याने नानांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी दाट ओळख झाली.

त्याच्याबरोबर राजकीय गप्पा रंगत होत्या, तरी हा चुकला फकीर स्टुडिओच्या फेऱ्या काही थांबवत नव्हता.

१९३८ चा तो जमाना होता. न्यू थिएटर्स, बॉंबे टॉकीज, प्रभात या व अशा इतर मातब्बर चित्रसंस्थानी आपापल्या परंपरा स्थिर केल्या होत्या. सर्व देशभर लोकाना आकर्षित करेल असा सिनेमा तयार करण्यात या संस्था वाकबगार होत्या. त्यातही आधुनिक विषयांवरील चित्रपट बनविण्यात 'बॉंबे टॉकीज' प्रसिद्ध होती. औंधकराच्याच प्रयत्नाने नानाचा 'बॉंबे टॉकीज'शी संबंध आला. या कंपनीच्या 'दुर्गा' चित्रपटात नानानी एका शेतकऱ्याची भूमिका केली. भूमिका होती तशी लहानच; पण नानांनी त्यातही आपल्या अभिनयाची चमक दाखवली आजचा सदाबहार अभिनेता अशोककुमार तर त्या भूमिकेवर बेहद्द खूष झाला आणि तेव्हापासून तो नानांचा जिवलग मित्र बनला.

त्याची आठवण निघाली आणि नाना म्हणाले, 'अरे, हा अशोककुमार खरं तर सरकारी नोकर व्हायचा; पण केवळ या नानामुळं तो अॅक्टर झाला.'

मग अशोककुमारची लॅब असिस्टंट होण्यासाठी चाललेली धडपड, त्याच्या वडिलांनी अनेक खटपटी करून आणलेली नोकरी आणि 'हा देशातला एक श्रेष्ठ अभिनेता बनेल, त्याला इथंच राहू द्या, तो इथच नाव कमवेल' अशी नानानी दिलेली ग्वाही, हा सारा किस्सा नानांनी एका दमात सांगून टाकला.

¤

'पण मग बॉम्बे टॉकीज का सोडली?' आम्ही पुन्हा मुद्द्याला हात घातला.

नानाही भानावर येऊन म्हणाले, 'अरे, शेवटी मराठी माणूस! मोडेन, पण वाकणार नाही. 'बॉम्बे टॉकीज' मध्ये सर्व इंग्लिश वातावरण. त्यातच हिमांशु राय याचं निधन झालं आणि तिथं बटलराचं राज्य आलं. तशा 'कंगन', 'नया संसार', 'झूला' इत्यादी चित्रपटात मी छोटचा-छोटचा भूमिका केल्या; पण त्यांनी मला पुरेसा वाव दिला नाही, की समाधानही नाही! मग माझं मन विटलं आणि मी बाहेर पडलो. दुसऱ्या महायुद्धाचा तो काळ होता. तस्करी, काळा बाजार, लाचलुचपत या गोष्टी चित्रसृष्टीतही बोकाळल्या होत्या कुठून तरी 'वॉर'चा सीन घालून प्रेमकथा खपवल्या जात होत्या. 'स्टुडिओ सिस्टीम' कोसळली सागर, रणजितसारख्या अनेक संस्था या लाटेत बुडाल्या. फ्री लान्सरचा जमाना सुरू झाला. त्यातच १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल. फाळणी आणि मग सर्वांनाच 'हाय हाय' झाल या पार्श्वभूमीवर अगदी टांगेवाले, पानवालेही नशीब कमवायला चित्रसृष्टीत आले. आज त्यातलेच काही यशाच्या शिखरावर आहेत.' बोलता बोलता आजच्या चंदेरी दुनियेतलं विदारक सत्य नानानी झटकन उघड केलं.

'माझं फाके मारणं चालूच होतं. तोच बाबुराव पेंटर यांच्या कृपेनं आमच्या सिनेजीवनाला वेगळी कलाटणी मिळाली. त्यांच्याच प्रयत्नानं मी शांतारामबापूंच्या 'राजकमल'मध्ये त्याचा सहायक–दिग्दर्शक म्हणून गेलो. राजकमलच्या 'शकुंतला' पासून 'डॉ. कोटणीस' पर्यंत मी त्यांचा सहायक–दिग्दर्शक होतो. तिथे मी अनेक गोष्टी शिकलो.'

नाना कृतज्ञतेने बोलत होते. तोच, शांताराम हे जगलर आहेत. त्यांनी आपल्या हयातीत फक्त मडकीच बनविली, त्याना मूर्ती कधीच जमली नाही, हे नानाचं एका मुलाखतीतलं विधान आठवलं आणि त्यावरच त्याना छेडलं.

त्यावर फारस उसनं अवसान न आणता नाना म्हणाले, 'तेही खरंच असलं तरी उपलब्ध परिस्थितीत शांताराम हे चांगले दिग्दर्शक आहेत; पण ते केवळ तंत्रविशारद आहेत. एखाद्या पिटुकल्या उंदरावर भला मोठा दगड टाकावा तसे ते छोटयाशा कल्पनेवर आपलं कातीव बेतीव तंत्र लादत असतात. 'कुंकू' आणि 'अमर भूपाळी' सोडले तर मला त्याचा एकही चित्रपट आवडला नाही. त्याचमुळं 'राजकमल'च्या परिसरात मी पुरता गुदमरलो आणि तिथून काढता पाय घेतला ते केवळ अभिनयातच चमकायचं या ईर्षेनं!'

¤

अशोककुमारनं 'बॉम्बे टॉकीज' ला आकार आणण्याचा प्रयत्न पुन्हा सुरू केला. त्याचाच 'मशाल' मध्ये नानानी दारुडया पत्रकाराची भूमिका केली. या दारुडयाने नानाना खराखरा चरित्र-अभिनेता बनविल. रखडपट्टी, उपेक्षा आणि मानहानी सोसतच नानाचा अभिनय-प्रवास पुढे सुरू झाला.

नानाच अवघं व्यक्तिमत्वच जणू पाण्याच्या धर्माच. त्यात सोडावे ते रंग पाहता पाहता आत्मसात करून ती भूमिका नाना चैतन्यमय करू लागले.

खरं तर सौंदर्याचं घन, भरदार देहयष्टी किंवा लोभसवाणं व्यक्तिमत्त्व यापैकी काहीही नसलेल्या या कलावंताचा आमच्या लेखी एकच एक असा चेहरा कधी नव्हताच. अनेक भूमिकांतून अनेक चेहरे आणि लकबी घेऊन नाना पडद्यावर आले, त्या त्या चेहऱ्यांच्या भूमिकेत जगले, बोलले, वावरले. मग 'फिर सुबह होगी' मधला दारुडया असो, 'हमराज' मधील नारियलवाला असो, 'हमारा घर' मधला चाभार असो किंवा 'दूर गगन की छाव मे' मधला वेडा असो, या माणसांमधूनच नाना आम्हाला दिसले. ही माणसं रुपेरी चौकटी बाहेरही अशीच जगत असावीत, असा आभास त्या वेळेपुरता तरी नाना प्रभावीपणाने निर्माण करून गेले

विमल रॉय याच्या 'दो बिघा जमीन' मधील आजाराने वेड लागलेल्या स्वाभिमानी शेतकऱ्याची त्यांची भूमिका आजही काळजाचा ठाव घेते गहाण टाकलेली जमीन सावकाराने ताब्यात घेतल्यानंतर त्या ठिकाणी फॅक्टरी उभारली जात असते त्या वेळी हा 'गगू' शेतकरी आक्रोश करत आपल्या काळया आईच्या कुशीत प्राण सोडतो ते दृश्य आठवल की आजही मन गलबलतं!

'दो बिघा' मधील भूमिकेने नानाना लोकप्रियता मिळाली. मान–सन्मानही मिळाला आणि मग भूमिकेची लांबी–रुंदी न पाहता ते अभिनयाचं कसब दाखवू लागले! 'शहर और सपना' मधला व्हायोलिन-वादकाची भूमिका त्यांनी एकतानतेने रंगवली. हा माणूस जन्मभर व्हायोलिनच छेडत असावा, असंच तो चित्रपट पाहताना वाटायच. 'जिस देश मे गंगा बहती है' मधला गांजेकस चरशी म्हातारा, 'नयी दिल्ली' मधला मद्रासी अकौन्टन्ट तर त्यांनी उपहासात्मक अंगानं रंगवला. 'दायरा'तला विद्वान प्राध्यापक, 'जागते रहो' मधील स्वार्थी, बिनडिग्रीवाला क्रूर डॉक्टर, 'फरिश्ता' मधला शाळामास्तर या साऱ्याच भूमिका नानांच्या

अभिनयानं मंतरलेल्या आहेत. या सर्वांपेक्षा नानांची भूमिका गाजली ती ' कानून ' मधील कालियाची !

गरजेपोटी छोट्या–मोठ्या चोऱ्या करणारा हा भुरटा चोर अनाथालयातील आपल्या कच्च्या–बच्च्यावर पापाची सावली पडू नये म्हणून झटणारा, त्याच्या शिक्षणाची चिंता वाहणारा पण भुरटी चोरी करत असताना तो एका खुनाच्या आरोपात अडकतो. ' आपण भुरटे चोर आहोत; पण खुनी नाही,' हे न्यायालयात सांगताना कालियाची होणारी त्रेधातिरपीट त्या वेळी हास्यास्पद वाटली तरी कालियाच दारिद्र्य, त्याची अगतिकता, पोटच्या बछड्याची चिंता, सारं काही घामासारखं त्याच्या चेहऱ्यावर निथळत असत.

' कानून ' ला फिल्मफेअर पारितोषिक मिळालं आणि मग नानांनीही आपल्या अभिनयाच्या ' कॅलिडिस्कोप ' मधून सामान्य माणसाची, आम आदमीची व्यक्तिचित्र रंगवली. ' दो बिघा 'चा शेतकरी, ' मैं चुप रहूँगी ', ' भरोसा ' पासून अगदी अलीकडच्या ' आक्रोश ' व ॲटनबरांच्या ' गांधी 'मध्येही दिसला. हाल, कष्ट, छळ, उपेक्षा यातून नानांचा चेहरा अनेक भूमिकामधून फिरला तरी त्याचा कधी कंटाळा आला नाही. एखाद्या रटाळ, वातड कथेतही त्यांचं दर्शन मनोज्ञ वाटलं. ' आखरी खत ' मध्ये तर नाना काही क्षणच आहेत; पण त्या अवधीत ते सारी करामत करतात. नजरेत भरतात. चित्र-चौकटीतील नानाचं एखादं वाक्य, एखादा आविर्भाव, कटाक्ष, हालचाल संस्मरणीय असते.

अलीकडच्या चित्रपटात के. ए. अब्बास यांच्या ' The Naxlites' या चित्रपटातली त्याची भूमिका विशेष गाजली. नक्षलवादी गटाच्या एका वयोवृद्ध क्रांतिकारी नेत्याची भूमिका नानांनी तन्मयतेने रंगवली. नक्षलवादी नेते चारू मुजुमदार यांच्यावर बेतलेली ही व्यक्तिरेखा त्यांनी, चारू मुजुमदार यांचा भास व्हावा अशीच उभी केली. तसंच ' गुरु ' या इंग्रजी चित्रपटातील शीर्षक–भूमिका आणि ' प्रेम पर्वत ' मधील एका षोडश वर्षीय कन्येच्या वयोवृद्ध पतीची नानांनी केलेली भूमिकाही संस्मरणीय !

नानांचा हा दीर्घ अभिनय–प्रवास नजरेसमोर आला की, लक्षात येतं की, या एका माणसातच किती रूपांची, गुण–दोषांचो माणसं दडली आहेत ! स्वभाववैचित्र्याचा, त्यातील बारीक–सारीक छटांचा एक खजिनाच इथे उधळलेला दिसतो. या ठिकाणी जी. आय गुजिक या लेखकाची आठवण होते हा भटक्या लेखक गावोगाव हिंडायचा. त्याचा आपला एकच छंद. प्रत्येक गावी तिथले पक्षी पकडून त्या पक्ष्याचे पंख तो रंगवायचा आणि त्याना पुन्हा आकाशात सोडून द्यायचा. नानांनी आपल्या अभिनयाच्या वाटचालीत अशाच विविध भूमिका रंगवल्या. हे सारे पक्षी आज आमच्या जाळ्यात आले होते. त्याना रंगविणारा तो सत्यसृष्टीतील कल्पक कलावंत समोर होता. ¤

ऐनउमेदीत तोंडाबरोबर केसानाही पांढरा रंग फासलेला, त्यामुळे अकाली वार्धक्य प्राप्त झालेला, पण ते फक्त रजतपटावर, खाजगी जीवनात पंचाहत्तरीत असलेला हा ' म्हातारा ' चांगलाच हिरवागार होता. त्यामुळं गप्पा रंगत होत्या. अभिनयाचं शास्त्र, त्याला वाव देणारे दिग्दर्शक, आदर्श आणि आजची चित्रपटसृष्टी विविध प्रश्न पुढे येऊ लागले. तंबाखूच पान तोंडात रसिकतेन भरून नाना काहीसे सरसावून बसत पुन्हा बोलू लागले–

' मला खरं तर कॉमेडियन व्हायचं होत !' एखाद्या कौलारू घरावर दगड भिरकवावा आणि कबुतराचा थवा उडावा तसं झालं. आमच्या पिंजऱ्यातले विविध रंगाचे पक्षी तर केव्हाच उडाले. ' धुवांधार ', ' नई दिल्ली 'मधील एखाद–दुसरा पक्षी तेवढा राहिला.

आपण त्या गावचेच नाही, अशा आविर्भावात नाना बोलत होते– ' माझ्या वाट्याला जरी शोकात्म भूमिका आल्या तरी विनोदी नट बनावं असंच मला वाटत होत. दिनकर कामण्णा हा माझा आदर्श. '

योगायोगाची गोष्ट म्हणजे बलवंत संगीत मंडळी या नागपुरातीलच नाट्यसंस्थेने नानाचं जन्मगाव असलेल्या वऱ्हाडातच ' भावबंधन ' या नाटकाचा पहिला प्रयोग केला. दिनकरनं त्यात कामण्णाची भूमिका केली होती. पुढं दहा–बारा वर्षं या भूमिकेत लोकप्रिय झाल्याने त्यांचं दिनकर कामण्णा हेच नामकरण करण्यात आलं.

' कामण्णासारखा विनोदी नट झालाच नाही,' नाना सांगत होते, ' अन्यांचा हॅमरिंग करणारा विनोद आणि गडकऱ्यांचा सभ्य पण बोचणारा विनोद, यात जो फरक आहे तोच कामण्णा आणि इतर विनोदी नट यांच्यात आहे. आजचे सारेच विनोदी नट भांड आहेत. ते केवळ अंगविक्षेप करणारे विदूषक आहेत. त्यांच्यात स्पॉन्टेनिइटी नाही.

'' आता चार्ली चॅप्लिन हाही मोठा कलावंत आहे. अक्षरशः एका डोळ्यात अश्रू साठवणारा आणि दुसऱ्या डोळ्यातून हास्य ओसडणारा तो महान कलावंत आहे. शेवटी महान कलावंताची व्याख्या हीच

## नानांची नेमबाजी

गप्पा मारता मारता आमचं लक्ष हॉलमधल्या भिंतीवर टांगलेल्या बंदुकीकडे गेलं. नानांना त्यावद्दल विचारलं. ते लगबगीने उठले. टेबलाच्या ड्रॉवरमधून किल्ल्या काढल्या. समोरचं गोदरेजचं कपाट उघडलं आणि प्लास्टिकच्या पिशवीत गुंडाळलेलं एक सुरेख रिव्हॉल्व्हर कपाटातून बाहेर काढत आमच्याजवळ आले. ' हे पहा, अमेरिकन बनावटीचं रिव्हॉल्व्हर आहे. मी आयुष्यात अनेक छंद केले. त्यापैकीच हा एक–नेमबाजीचा !'

## अपुरी इच्छा

आत्तापर्यंत निरनिराळ्या भाषांमधील सुमारे सहा हजार चित्रपट पाहिलेले नाना, आपल्याला कॉमेडियन व्हायचं होतं, हे सांगत असतानाच पुढे म्हणाले, ' आयुष्यात केव्हा तरी आर्य चाणक्य आणि नाना फडणवीस या दोन भूमिका करायच्यात असंही फार मनात होतं कारण या दोन ऐतिहासिक व्यक्तिरेखांनी, त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांनी मला फार भारून टाकलं आहे; पण आता या भूमिका करायला मिळतील असं वाटत नाही. चालायचंच !'

आहे; पण चार्लीच्या विनोदाची घाटणी वेगळी आहे. ओव्हरड्रामा करून विक्षिप्तपणातूनच तो विनोद निर्माण करत होता. ' सिच्युएशन मिमिक्री ' ही त्याची स्पेशॅलिटी होती. '

## आर्टिस्ट आणि ॲक्टर

' मराठी कलावंतामध्ये नाटकातून सिनेमाकडे असा ट्रेंड दिसतो. तुम्ही मात्र सरळ चित्रपटातच दाखल झाला. ' हे कसं काय ' असं विचारलं तेव्हा नाना म्हणाले,

' अहो, हा चित्रपट आहे. इथे ' मोशन ' आहे नाटकात मुद्राभिनयाला स्थान असतं; पण इथे ' क्लोजअप ' असतो. पात्राची एवढीशी हालचालही कॅमेरा लाखपट मोठी करून दाखवितो. मग एखादा कटाक्ष, नेत्राचं आकुंचन किंवा भुवईच्या हालचालीनंही भावना व्यक्त करता येते. त्यामुळं आपोआपच चित्रपटातील अभिनयाला जास्त डायमेन्शन प्राप्त होतं.

' त्यातही अभिनयाचा माझा आदर्श विचाराल तर एमील जेनींग हा जर्मन नट ! त्याच्याइतका भूमिकेशी एकरूप होणारा अभिनेता मी पाहिला नाही ' Actors and idiots are born and not mode ' या उक्तीवरही माझा विश्वास आहे. शेवटी सिनेमा काय किंवा नाटक काय, अभिनयाचे निकष इथूनतिथून सारखेच. एका कवितेत म्हटल्याप्रमाणे—

आवाज गलेसे जब निकले
तो नाजो अदा भी साथ चले।
आँख कहे मन की बाते,
कुछ हाथ हिले, कुछ पाँव चले।

—हे सारं एकत्रपणे घडून यावं लागतं.

' आता आजच्या अभिनेत्याबद्दल बोलायचं तर मास्टर छोटू किंवा मर्दानी, राजबिडा चंद्रमोहन आणि आजच्या कलावंताची काय तुलना करणार ? अशोककुमार हा एकमेव ॲक्टर सोडला तर बाकी सगळे ट्रॅक्टर आहेत यातला विनोदाचा भाग बाजूला ठेवला तरी खरोखरच सध्या गाजणारे बरेचजण फक्त ' आर्टिस्ट ' आहेत. ते ' ॲक्टर ' नाहीत. या दोन शब्दामध्ये बराच फरक आहे. स्वतःचा एकच एक टाइप बनविणारे, स्वतःच्या लोकप्रिय ' इमेज ' बाहेर जाऊन काही करण्याची धमक नसणारेच आज जास्त आहेत.

' या वाटांमध्ये व्यवसायाशी निष्ठा, इमान नाही. एखाद्या भूमिकेशी, त्या भूमिकेच्या स्वभाव—धर्माशी तादात्म्य पावणंच यांना जमत नाही. माझा वेष कोणता, माझी हेअर—स्टाइल कशी, नटी कोणती, दिग्दर्शक कोण याबाबतच आग्रह व हट्ट जास्त; मग भूमिका कोणती का असेना ! त्यामुळं हे सर्वचजण ' मेक अप ' किंवा ' गेट-अप ' आर्टिस्टच आहेत.

' सध्याच्या अभिनेत्यांमध्ये संजीवकुमार व राजेश खन्ना या दोघांना अभिनयाची समज दिसते; पण तरीसुद्धा ते laborious artists वाटतात आणि दिलीपकुमार सध्याचा मोठा कलावंत असला, लोकप्रिय असला तरी तो फक्त dependable artist आहे. प्रत्यक्षातलं किंवा जनमनातलं फिल्मी व्यक्तिमत्त्व आपल्या भूमिकाबरोबर वागवीत तो ठरीव छापाच्याच भूमिका करतो. मराठी रंगभूमीवरील सतीश दुभाषी हाच मला जरा वेगळा अभिनेता वाटायचा. अभिनेत्र्यामध्ये मीनाकुमारी ही एक गुणी कलावंत होऊन गेली, तर अलीकडच्या काळात रेखा या नटीमध्ये अभिनयाचे काही चांगले गुण दिसतात.

## कलावंतांचा जमाना केव्हा होता ?

' पूर्वीच्या काळातील दिग्दर्शकही कोणत्या तरी एका भूमिकेतून चित्रपट निर्माण करत होते, या माध्यमातून काही सांगण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा. त्यात ते कितपत यशस्वी झाले, हा भाग अलाहिदा; पण आधी ' मिशन ' होतं, मग धंदा, बाजार व त्याचे नियम होते. म्हणूनच देवकी बोसच्या चित्रपटांना philosphical out-look होता. ग्यान मुखर्जीच्या चित्रपटाची पटकथा बांधेसूद होती. त्याच्या चित्रपटातील ' भारतीयत्व ' चटकन डोळ्यात भरणारं होतं. शांतारामाचे चित्रपट विचारप्रवर्तक होते, तर नितिन बोस प्रसंगाची गुंफण करण्यात वाकबगार होता. Now camera is moving like a machine and not like a man '. पूर्वी असं नव्हतं.

' आता केवळ बाजार उरला आहे असं नाही, तर त्याचा जुगार झाला आहे. राजकपूरचंच पहा ना त्याचा musical sense चांगला आहे; पण पिक्चरच्या बाबतीत पुरता शो-मन ! बारा कोट फाडायचे आणि एक कोट शिवायचा, असाच त्याच्या चित्रपटाचा खाक्या ! पुन्हा वरती म्हणतो— ' पहा, किती सुंदर कोट शिवला आहे ! आजच्या काळात बी. आर. चोप्रा तेवढा जरा काही थोडया वेगळया विषयावर चित्रपट काढतोय आणि ' लावारिस ', ' नमकहलाल 'चा दिग्दर्शक प्रकाश मेहराकडे नाट्यमय उत्सुकता निर्माण करण्याची हातोटी दिसते आहे; पण त्यांच्याही कल्पना उधार—उसनवारीवरच बेतलेल्या आहेत ! '

## स्वयंसेवक नाना

' ऐन तारुण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी माझा निकटचा संबंध आला,' नाना सांगत होते, ' सुमारे नऊ वर्षं मी संघाचा स्वयंसेवक होतो. डॉ. हेडगेवार मला बंधुसमान मानत, पण मी मात्र त्यांना पितृतुल्य मानतो. मला चित्रपटात जाण्याचा सल्लाही त्यांनीच दिला.

' त्याच काळात मी कॉंग्रेस पक्षाचाही कार्यकर्ता होतो. नागपूरच्या कॉंग्रेस—अधिवेशनात बॅ. जीना यांचं भाषण मी जवळून ऐकलं. कारण मी तिथेही स्वयंसेवक म्हणून काम करत होतो. देशात त्या वेळी कॉंग्रेस हा एकमेव राष्ट्रीय पक्ष होता. तो इथल्या मातीत भिनला आहे, तर चारित्र्यसंपन्न माणसं तयार करणारं विद्यापीठ म्हणून मी संघाकडे पाहतो. '

## मराठी चित्रपट आणि नाना

राष्ट्रवादी वृत्तीचा हा मराठी माणूस मराठी चित्रपटामध्ये मात्र अभावानेच दिसला. ' कृष्ण—सुदामा ', ' मूठभर चणे ', ' उमज पडेल तर ', ' प्रेम आंधळं असतं ', ' फकिरा ' ' मधुचंद्र ' अशा काही मोजक्या मराठी चित्रात नानांनी फक्कड कामं केली आहेत; पण इथल्या व्यवहारात त्यांच्यासारख्या साध्या—सरळ माणसाचा निभाव न लागल्यानं इच्छा असूनही नाना मराठी चित्रसृष्टीची संपन्नता वाढवू शकले नाहीत.

गेल्या पन्नास वर्षांतील काही महत्त्वाचे ट्रेंड, टप्पे सांगता का, असं विचारलं, तेव्हा नाना जरा उसळूनच म्हणाले,

'अहो, कसले आले टप्पे आणि ट्रेंड! 'साउंड' आल्यानंतरचा तो जमाना होता. त्यामुळं दृश्यापेक्षा पहाडी आवाज आणि गाण्यानाच महत्त्व. मग नाच-गाणी आणि कोरसला फोरास रोडच्या बायका याचाच तो जमाना होता! नंतर आला आर्ट–डिरेक्टरचा जमाना. मोठमोठे सेट उभारले गेले. महाल, राजवाडे, दरबार, स्वप्नदृश्यं, आधुनिक बंगले यानाच त्यामध्ये महत्त्व होतं. त्यामुळं तो जमाना या 'कारपेन्टर' लोकानीच गाजविला आणि त्यानंतर आता आला आहे माझा ड्रेस कोणता, माझी हेअर स्टाइल कशी हे विचारणाऱ्या आणि ते ठरवणाऱ्या 'टेलर' व 'बार्बर'चा जमाना!'

नानांनी आपल्या चष्म्याआडून काहीसं मिस्किलपणे बघत आम्हाला विचारलं, 'यात कलावंतांचा जमाना केव्हा होता?'

आम्हालाही तो जमाना, त्या चष्म्याआडच्या खोल गेलेल्या डोळ्यात अंधुकसा दिसत होता.

**केवळ माणूसपण जपण्यासाठी!**

काहीसे गंभीर होत नाना पुढे म्हणाले, 'चित्रसृष्टीतल्या बऱ्या–वाईट अनुभवाचा ताळेबंद केला तर वाटतं 'I am a victim of great lies.

'चित्रपट माझ्यात नाही, मी चित्रपटात आहे, ही भूमिका घेऊन आल्यामुळं मी आपल्या भूमिकेपुरताच चित्रपटाशी संबंध ठेवला. पार्ट्या–प्रिमियरपासून कटाक्षाने दूर राहिलो. आपल्या शूटिंगपुरतंच स्टुडिओत टेकलो. हा अलिप्तपणा काहीसा भोवला; पण कुठे तरी हेही समाधान मिळालं की, चित्रसृष्टीतले नवलाख दिवे आपल्याभोवती तळपत होते तरी पण आत कुठे तरी असलेली ध्येयवादाची, चांगुलपणाची ज्योत आपण विझू दिली नाही.

'अनेकदा राहून राहून असं वाटत की, मला पुरुषार्थानं जेवढी साथ दिली तेवढी भाग्यानं दिली नाही; पण मी चंदनासारखा झिजलो आणि जगाला फक्त सुवासच दिला, याच समाधानही आहे. कोणत्याही प्रकारच्या इच्छा आता राहिलेल्या नाहीत. लोकांनी खूप प्रेम दिलं, आदर केला. मी कृतार्थ आहे. फक्त एवढंच वाटतं, 'नाना हा एक चांगला माणूस होता' असं लोकानी म्हणावं. हे माणूसपण जपण्यासाठीच मी माझं आयुष्य खर्ची घातलं आहे!'

भावनोत्कट होऊन नाना बोलत होते. चेहऱ्यावर तृप्तीचा आनंद होता. हृदयात कुठे तरी बोचही होती; पण ओठातून फक्त कृतज्ञताच व्यक्त होत होती.

हे सारं ऐकत असताना कै. आचार्य अत्रे यांनी लिहिलेलं एक वाक्य आठवलं,– 'माझी समाधी बांधायचीच झाली तर त्यावर एवढं जरूर लिहा–हा माणूस मूर्ख असेल, अविचारी असेल; पण कृतघ्न कधीही नव्हता!'

एका कलंदर मुशाफिऱ्याचं जीवन सुमारे तीन तास त्याच्याच तोंडून ऐकणं हा एक रोमांचकारी अनुभव होता. सहज बोलता–बोलता ,किस्से सांगत असताना नानाच्या चेहऱ्यावरच्या नकळत हालणाऱ्या रेषामधूनही त्याच्या अंगात भिनलेल्या अभिनयाचे तुषार या अनुभवाला निराळीच समृद्धी देत होते. नानामध्ये दडलेले नाना स्वत:चाच शोध घेत होते. आम्ही फक्त त्याचे साक्षी होतो!! □


**DIAMOND GROUP**

Ward 9, H. No. 637/1, Station Road,
ICHALKARANJI

*For* **quality Warping, Sizing, weaving, Bleaching, & Mercersing.**

*Phone : 2442*



" एका वेगळ्या विषयावर भर देणारी ही कादंबरी. स्त्री-बुवाबाजीच्या प्रकारामागचे मर्म उलगडून सांगणारी. कुठलंही भाष्य न करता एक सत्यघटना जशीच्या तशी मांडल्याने झपाटून टाकण्याचे चांगलेच सामर्थ्य या कादंबरीला लाभलंय. त्याच त्या प्रेमाच्या त्रिकोणकथांपेक्षा एक महत्त्वाचा सामाजिक विचार लालित्यपूर्णतेने या नवोदित लेखकाने घडवलाय, त्यामुळे बुवाबाजीसारख्या गोष्टींबाबत वाचक अधिक जागरूक बनतील."

पुस्तक पंढरी / ऑगस्ट १९८२ अंक
बाँबे बुक क्लब–ऑगस्ट निवड

**स बला**

लेखक : माधव शिरवळकर.

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मूल्य : रुपये बारा

चित्रपट

# ‘ कथा ’ - अतिसामान्य चित्रपट

विनया खडपेकर

‘ चश्मेबद्दुर’चा बोलबाला चौफेर चालू असतानाच सई परांजपे यांच्या पुढच्या चित्रपटाच्या छायाचित्रणाच्या बातम्या येऊ लागल्या. श्री. शं. गो. साठे यांच्या ‘ ससा आणि कासव ’ या मराठी नाटकावर आधारित निर्माण होणाऱ्या या चित्रपटाचे नाव प्रथम ऐकू आले ते ‘ कछुआ और खरगोश ’ असेच. नंतर कधी तरी ते बदलले गेले आणि ‘ कथा ’ झाले. सई परांजपे यांची दिग्दर्शन करतानाची छायाचित्रे येऊ लागली. छोटचा-मोठचा मुलाखतीही दिसू लागल्या. ‘ कथा ’ मधील काही दृश्ये साप्ताहिकांतून, मासिकांतून झळकू लागली. बघता बघता चित्रपट पूर्ण झाला. त्याला राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. मेट्रो, बिजली आणि वांद्रा या मुंबईच्या तीन चित्रपटगृहांत ‘ कथा ‘ प्रदर्शित झाला.

सुरेश जिंदालनिर्मित आणि सई परांजपे दिग्दर्शित असा हा देवकी चित्रचा निर्मितीच्या सुरुवातीच्या क्षणापासून गाजत असलेला चित्रपट ‘ कथा ’ पाहिला. निराशा झाली.

एका चाळीत रहाणारा राजाराम (नासिरुद्दीन शहा ) हा भोळाभाळा, शेजाऱ्यांच्या उपयोगी पडणारा असा सालस तरुण. तो इमानेइतबारे नोकरी करतो. चाळीतल्याच संध्या (दीप्ती नवल) नावाच्या मुलीवर त्याचे प्रेम असते; पण ते व्यक्त करण्याची धिटाई त्याच्याजवळ नाही. एके दिवशी अचानक राजारामचा कॉलेजमधला मित्र वासुदेव (फरुक शेख) त्याच्याकडे येतो. स्वतःला बासू म्हणवतो. त्याने कॉलेजचे शिक्षणही पुरे केले नाही; पण त्याची रहाणी चैनीची. वागणे ऐटबाज. व्यक्तिमत्त्व आक्रमक. तीनशे रुपये पेइंग गेस्ट म्हणून देईन असे राजारामला सांगून प्रत्यक्षात त्याला काहीच न देता त्याच्या जिवावर आरामात रहातो. आपल्या रुबाबदार वागण्याने चाळीतल्या लोकांवर इंप्रेशन पाडतो. राजारामला आवडणाऱ्या संध्यालाही स्वतःच्या नादी लावतो. चाळ त्याच्यावर खूष होते. राजारामचे चाकोरीचे जगणे ‘ बासू ’ला आवडत नाही. राजारामच्या बॉसची स्तुती करून तो त्याच ऑफिसात नोकरी मिळवतो. आपले काम राजारामवर सोपवून क्रेडिट स्वतः घेतो. बॉसच्या मुलीशी ( विनी जोगळेकर) आणि तिच्या सावत्र आईशी म्हणजेच बॉसच्या द्वितीय पत्नीशी (मल्लिका साराभाई) मैत्री करतो. बासू एका बाजूला संध्याशी लग्न ठरवतो, दुसरीकडे बॉसच्या पत्नीला मिठीत घेऊन तिच्याशी प्रेमालाप करतो. बॉसची मुलगी बासू आणि सावत्र आईचे एकत्र फोटो वडिलांना देते. बासूची नोकरी सुटते; पण त्याला त्याची खंत नाही. राजाराम निर्वाणीने सांगतो तू संध्याचे नुकसान करू नकोस. तिला धोका देऊ नकोस. लग्नाचा मुहूर्त जवळ येतो. बासू राजारामच्या खोलीत चिठ्ठी ठेवून अरब देशात पळून जातो. राजाराम संध्याला सांगतो मी तुझ्याशी लग्न करीन. संध्या म्हणते, ‘ हे आधीच बोलला असतास तर इतके सगळे घडलेच नसते. आता आमचा संबंध येऊन गेला आहे. कदाचित्……” तरीही राजाराम–संध्या विवाह होतो.

असे हे थोडक्यात कथानक. ‘ तो ’ आणि ‘ ती ’ यांचा विवाह असा शेवट असला तरी कथानक वैशिष्टयपूर्ण आहे. ते ठरीव ठशाचे नाही. ही ‘ तो ’ आणि ‘ ती ’ यांच्या विवाहाची ‘ कथा नाही तर दोन भिन्न वृत्तीच्या माणसांच्या जीवनप्रवासाची ‘ कथा ’ आहे हे सारखे जाणवत रहाते. दोन अगदी भिन्न वृत्तीच्या माणसांचे दर्शन घडविताना राजाराम म्हणजे सद्गुणांचा पुतळा आणि बासू म्हणजे दुर्गुणांचा पुतळा असे स्पष्ट पांढरे-काळे फिल्मी व्यक्तिचित्रणही कोठे झाले नाही. या दोन्ही वृत्तींची माणसे आपण आपल्या भोवती पाहतो म्हणून ही दोन्ही माणसे वास्तव वाटतात. ज्या पार्श्वभूमीवर ही ‘ कथा ’ घडते ती चाळही मध्यमवर्गीय वातावरणास योग्य वाटते; परंतु या जमेच्या बाजू असूनही चित्रपट पकड घेत नाही, याला अनेक कारणे आहेत.

### फार्स आणि वास्तव

चित्रपटाला एक निश्चित असा सूर नाही. चित्रपट काही ठिकाणी फार्सच्या पातळीवर आहे आणि काही ठिकाणी साध्या वास्तववादी पातळीवर आहे. यामुळे कथानकाचा, व्यक्तिचित्रांचा आणि एकंदरीत चित्रपटाचाच तोल नीट सांभाळला गेलेला नाही. सुरुवातीला आजी नातवाला ससा आणि कासव यांची गोष्ट सांगते. ती गोष्ट कार्टून्समध्ये सादर केली आहे. यामुळे फार्सची पार्श्वभूमी आपोआपच निर्माण होते. त्यात ससा जिंकतो. आजी नातवाला म्हणते, हल्ली जमाना असा आहे की, लबाड माणसेच जिंकतात. यातूनही हलक्याफुलक्या फार्सचीच पार्श्वभूमी तयार होते; पण पुढे राजारामचा भोसळट स्वभाव, त्याचे चाळीतल्या लोकांच्या उपयोगी पडणे, त्याचे नोकरीत पर्मनंट होणे, त्याचे संध्याच्या प्रेमात असणे या साऱ्या प्रसंगांची पातळी फार्सची न रहाता साधी, वास्तववादी झाली आहे. बासूचे स्वतःच्या कर्तृत्वकथनाच्या थापांचे फ्लॅशबॅक फार्सिकल आहेत. राजारामच्या बॉसच्या खेळण्याची पाच मिनिटं स्तुती करून बासू बडी नोकरी पटकावतो ही अतिशयोक्त घटनाही फार्सलाच पेलू शकते. खोटा फोन करून आपण कोणत्या तरी बडचा कंपनीचे प्रतिनिधी आहोत असा भास निर्माण करून बडचा हॉटेलमध्ये बासूचे फुकट खाणेही फार्समध्येच शोभून दिसते. चाळीतली समूहगीतेही फार्सच्या प्रकृतीला पोषक आहेत. मात्र राजारामचे संध्याशी बोलताना बिचकणे, राजारामचे ऑफिसमधले वागणे यातल्या कोणत्याच प्रसंगांना फार्सिकल स्पर्श झालेला नाही. यामुळे चित्रपटाला एक सूर, एक रोख आलेला नाही.

चित्रपटातला दुसरा दोष म्हणजे मुख्य विषय (दोन भिन्न वृत्तींच्या व्यक्तींचे चित्र-संघर्ष) आणि चाळीची पार्श्वभूमी यात पुरेशी एकरूपता नाही. चाळीमधले संडास, पाण्यासाठी होणारी चाळीची धावपळ, चाळीच्या उत्सवासाठी चाललेली नाटकाची चर्चा, चाळीतले तरुण जोडपे, मुलगा कॅनडात बोलवत असतानाही चाळीतच रहाणारा गृहस्थ या सगळ्यांतून चाळीचे, चाळीतल्या जीवनाचे चित्र साकार होते; परंतु हे चित्र मुख्य विषयाला पूरक नाही. यामुळे राजाराम किंवा बासू यांच्या वृत्तीच्या संघर्षावर विशेष प्रकाश पडला आहे असे वाटत नाही. यामुळे चाळीचे चित्र म्हणजे केवळ तपशिलावरच्या पातळीवरचे वाटते. एखाद्या माणसाचे संडासात धावणे हा मुद्दाम टाकलेला विनोद वाटतो. चाळीच्या या चित्रातही काही ठळक उणीवा आहेत. चाळीतल्या जीवनाला खाजगीपणा नाही. एक पाहुणा आला तर त्या खोलीत माणसे अगदी सहजपणे डोकावतात. अशा ठिकाणी राजाराम या तरुणाच्या घरी संध्यासारख्या तरुणीचे एकसारखे जाणे-येणे, वावरणे चालू असताना चाळीतली भोवतालची माणसे जरासुद्धा डोकावत कशी नाहीत? खाकरतखोकरत नाहीत किंवा एकमेकांकडे अर्थपूर्ण नजरेने पहातसुद्धा नाहीत. नंतर संध्या–बासू या प्रकरणावरही लग्नाच्या दिवसापर्यंत माणसं काही बोलताना आढळत नाहीत याचे आश्चर्य वाटते.

चित्रपटाला स्वाभाविक ओघ नाही. 'हा बघा राजाराम असा भोसळट आणि तो बघा बासू कसा जादा स्मार्ट' असे निरनिराळ्या प्रसंगातून अगदी ढोबळपणे दाखवत चित्रपट संथपणे पुढे सरकतो. आपल्यासमोर एखादे कथाविश्व 'उलगडले' आहे असे न वाटता केवळ दोन माणसांची अगदी एकपदरी हकीगत आपल्याला 'सांगितली' आहे असे वाटते

## कृत्रिम शेवट


चित्रपटाचा शेवट फारच खटकतो. संध्याला सोडून बासू गल्फला निघून जातो. लग्नाच्या फंदात पडण्याची त्याची नाही तरी इच्छा नसतेच हे त्याच्या बोलण्यावरून कळते. यामुळे तो हरला असे म्हणता येत नाही. (तरी आजी नातवाला सांगते, जिंकलं बाबा कासवच शेवटी हे पटत नाही.) संध्या राजारामला हवी असते. त्याला ती मिळते. राजारामही त्याच्या परीने जिंकतोच. जो तो आपापल्या मार्गाने जातो. हा खरा सुंदर शेवट होता; पण संध्या शेवटी राजारामला सांगते, तिचा आणि बासूचा संबंध येऊन गेला आहे 'शायद...' या 'शायद'मध्ये ती माँ बननेवाली असण्याची शक्यता अभिप्रेत आहे. तरीही राजाराम तिचा स्वीकार करतो. यामुळे ओव्हरस्मार्ट असलेला बासू टिपिकल फिल्मी खलनायकी रंगात बुडतो आणि भोळसट एकमार्गी राजारामचा चांगुलपणा जवळजवळ हौतात्म्याच्या पदापाशी येऊन पोहोचतो. यामुळे चित्रपटाचा शेवट अगदी सवंग वाटतो.

श्री. शं. गो. साठे यांची मूळ नाट्यसंहिता 'ससा आणि कासव' आणि 'कथा' या चित्रपटाची कथा यात खूपच फरक आहे. पात्रांची नावेही बदलली आहेत. नाटकातील श्रीधर चित्रपटात राजाराम झाला. नाटकातील मुकुंद चित्रपटात बासू झाला. कुसुमची संध्या झाली. त्र्यंबकराव, गिरिजा, उषा ही नाटकातील मुख्य पात्रे चित्रपटात गाळलीच गेली. मूळ नाटकात नसलेली अनेक पात्रे चित्रपटात आहेत. अनेक प्रसंगही चित्रपटात नवीनच आहेत. मात्र दोन मित्रांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये नाटकाप्रमाणेच चित्रपटातही आलेली आहेत. नाटकामधे कुमुद मुकुंदाबरोबर पळून जाते. उषाही मुकुंदालाच सांगून आलेली असते. कुमुद पळून गेल्यावर श्रीधर उषाला विवाहासाठी विचारतो; पण उषा श्रीधरला म्हणते, माझा जीव मुकुंदात गुंतला आहे. तुमच्याबद्दल मला आदर मात्र खूप वाटतो; पण लग्न करावंसं वाटत नाही. श्रीधर दोघींकडून अव्हेरलाच जातो. नाटकातला हा शेवट सहजपणे येतो असे वाटते, म्हणून तो योग्य वाटतो, पटतो. चित्रपटात शेवटी राजारामचा चांगुलपणा अगदी ताणून धरला गेला आहे म्हणून चित्रपटाचा शेवट कृत्रिम वाटतो. नाटकात चाळीचे वातावरणही कोठे अलग न रहाता मुख्य विषयाशी एकरूप झाले आहे. कारण चाळीच्या वातावरणातूनच श्रीधरचे व्यक्तिमत्त्व घडलेले दिसते. बाकी नाटक आणि चित्रपट यांचा सर्वसाधारण परिणाम सारखाच होतो. नाटकाला चित्रपटात उठाव आला आहे असे वाटत नाही किंवा चित्रपट नाटकापेक्षा कमी दर्जाचा आहे असेही वाटत नाही.

वीरेंद्र सैनी यांचे छायाचित्रणही समाधानकारक वाटत नाही. त्याने योग्य वातावरणनिर्मिती झालेली दिसत नाही. चष्मेबद्दूर, आक्रित, आक्रोश, एखादे घर, रस्ता यांच्या दृश्यातून गावाचे व्यक्तिमत्त्व कळावे असे छायाचित्रण प्रभावी होते. येथे चाळ, ऑफिस, हॉटेल कोणत्याही स्थानाचे नेमके व्यक्तिमत्त्व कळू शकत नाही. त्या त्या ठिकाणचे निर्जीव दर्शन कॅमेरा घडवितो.

नासिरुद्दीन शहाचा 'अल्बर्ट पिंटोको गुस्सा क्यू आता है' प्रभावी अभिनय या चित्रपटात नाही. फरुक शेख, दीप्ती नवल या जोडीचाही चष्मेबद्दूरमधील रंगतदार अभिनय 'कथा' मधे दिसत नाही. लीला मिश्रा, नितिन सेठी, मल्लिका साराभाई, अरुण जोगळेकर, सुहासिनी देशपांडे, विनी जोगळेकर, बाळ कर्वे या इतर कलाकारांनी आपापल्या भूमिका उचित भानाने केल्या आहेत. शिरीष लिमये आणि सजल वाटवे यांनी चाळीतल्या तरुण जोडप्याच्या भूमिकेत फारच रंगत आणली आहे. त्यांची नवखेपणातली उत्कटता नंतर हळूहळू रुळून जाणे, राजारामच्या लग्नात सिनिऑरिटीच्या अधिकाराने वावरणे अशा बारीकसारीक छटा दाखविणे त्यांना सहज जमले आहे.

तसे पाहिले तर चित्रपटाचा मुख्य विषय जोरकस. सूक्ष्म कलादृष्टी असलेली संवेदनाक्षम अनुभवी पटकथालेखिका आणि दिग्दर्शिका. सुजाण अभिनेते आणि अभिनेत्री. चित्रपटाने कलेचे उंच शिखर गाठायला हवे होते; पण चित्रपट अतिसामान्य झाला आहे!



MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW-28


'एका कृतघ्न आणि विश्वासघातकी माणसाची रक्तपिपासा शमवण्यासाठी फासावर चढावे यासाठी माझा जन्म नाही. जंगली आणि खुनशी टोळक्यांनी मला अपमानित करावे यासाठीही मी जन्माला आलेलो नाही.'

फासावर जाण्यापूर्वी काही काळ भुत्तोंनी असे लिहून ठेवले होते. तरी भुत्तो शेवटी फासावर गेलेच ! पण आज पाकिस्तानची सत्तासूत्रे मात्र याच भुत्तोकथित खुनशी आणि जंगली टोळक्यांच्या हाती आहेत आणि या टोळक्यांच्याच हाती आज अणुबाँबही आहे.

# हा अणुबाँब पाकिस्तानने कसा हस्तगत केला ?

न्यूयॉर्क टाइम्स व बी. बी. सी. संबंधित दोन पत्रकारांनी चार खंडातल्या तेरा देशात अठरा महिने शोध घेतला आणि उघडकीला आली एक आंतरराष्ट्रीय हेरगिरीची आणि कटकारस्थानांची रहस्यमय सत्यकथा–

# दि इस्लामिक बाँब

लेखक : स्टीव्ह वेसमन
हर्बर्ट क्रोस्ने

रूपांतर : मो. ग. तपस्वी, दिल्ली

**माणूस :** पुढील अंकापासून

वाचकांनी आपली मागणी त्वरित जवळच्या विक्रेत्याकडे नोंदवावी.